
सोलापूर
तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित
धाराशिव | शुक्रवार, २ जानेवारी २०२६ | वर्ष ३ रे अंक ३०३ | पाने १२ | किंमत रु. ६/-
■ RNI No. MAHMAR/2023/86468 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026.
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



भूतकाळ उज्ज्वल आहे, भविष्यकाळ भव्य आहे, पण वर्तमानकाळात टिकून आपण त्यावर मात केली नाही तर ना त्या भूतकाळाच्या उज्ज्वलतेचा उपयोग ना त्या भविष्यकाळाच्या भव्यतेचे भाग्य.

**- मोरोपंत पिंगळे**
रा. स्व. संघाचे पूर्व सह सरकार्यवाह

## विनम्र अभिवादन



नरकेसरी बॅरिस्टर मो. वा. अभ्यंकर यांचा आज स्मृतिदिन

# बंडखोरांना रोखण्यासाठी मुख्यमंत्री ॲक्शन मोडवर!

## भाजपातील मूळ निष्ठावंत दुखावल्याचा परिणाम

**तभा वृत्तसेवा | विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १ जानेवारी :**

राज्यातील २९ महापालिकेच्या निवडणूक प्रचाराचा ज्वर वाढत असताना राज्यात व केंद्रातील सत्तेत सर्वाधिक वाटा असलेल्या भाजपाला अनपेक्षितपणे मोठ्या प्रमाणात बंडखोरीच्या समस्येला सामोरे जावे लागत आहे. तिकीट न मिळाल्याने नाराजांनी पक्ष शिस्तीची पर्वा न करत उघडपणे बंडाचे निशाण फडकविल्याने चर्चेचा विषय बनला आहे. त्यांची समजूत काढून रोखण्यासाठी आता राज्यातील भाजपाचे सर्वोच्च नेते व राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे स्वतः मैदानात उतरले आहेत. नाराजाशी स्वतः बोलून त्यांना माघारीसाठी प्रवृत करीत आहेत.

मुंबईसह राज्यभरातील ठिकठिकाणी प्रमुख बंडखोराशी संवाद साधत आहे. त्यांना अर्ज मागे घेण्यासाठी प्रयत्न करत आहेत. अर्ज माघारीसाठी शुक्रवार दि. २ जानेवारी पर्यत मुदत असल्याने त्यासाठी युद्धस्तरावर प्रयत्न सुरु आहेत. भाजपाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांत ही सर्वात जास्त जागा जिंकण्यासाठी मोठी तयारी केली आहे. त्याचाच एक भाग म्हणून मोठया प्रमाणात विरोधी पक्षातील नेत्यांना प्रवेश दिला आहे. त्यापैकी अनेकांना तिकीट मिळाल्याने भाजपातील मुळ निष्ठावंत काहीसे दुखावले गेले आहेत. पक्षाने डावलल्याने नगरसेवक होण्याच्या स्वप्नांचा चुराडा झाला. त्यामुळे अनेकांनी अपक्ष म्हणून अर्ज भरल्याने पक्षापुढे संकट उभे ठाकले आहे.. ज्या साहेबांसाठी पायाला भिंगरी लावून फिरलो. कार्यकर्ते जमा केले. पक्षाच्या सतरंज्यापासून ते मंडप टाकण्याची कामं केली. पक्षासाठी खस्ता खाल्या.

अनेक कार्यक्रम राबवले. त्याला मंत्रिमहोदय उद्धघटनासाठी आले पण उमेदवारी कापली गेल्यानंतर ते साहेब फोन सुद्धा घेत नसल्याचा टाहो ते फोडत आहेत. त्यामध्ये अनेकांन भोवळ आली.



कुणाला भावनावेग आवरता आला नाही. या सर्व नाराजीची दखल स्वतः मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतली आहे. बंडखोरांशी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांकडून संपर्क करण्यात येत आहे. पक्षातील निष्ठावंतांशी स्वतः मुख्यमंत्री बोलले आहेत.निवडणुकीत माघार घेण्याबाबत मुख्यमंत्र्यांचा अनेक अपक्षांसोबत संवाद झाल्याची माहिती आहे.बंडखोरी शमवण्यासाठी मुख्यमंत्र्यांकडून बंडखोरांना राजकीय पुनर्वसनाचा शब्द दिल्याचीही माहिती समोर येत आहे. तर काही बंडखोरांना शांत करण्याची जबाबदारी स्थानिक नेत्यांवर सोपविली आहे. स्थानिक बंडखोरी वेळीच रोखण्यासाठी स्थानिक नेते आता अनेक बंडखोरांच्या घरी जाऊन त्यांना समजावून सांगत असल्याचे समजते. या नेत्यांनी त्यांना भाजपची पक्ष शिस्तसह संयमाची आठवण करुन दिल्याचे समजते. त्यांच्या कुटुंबियांशी ही बडी नेते संवाद साधत आहेत. त्यातील काहींनी तर आपल्याला किती वर्षानंतर पक्षाने न्याय दिला याची उजळणी करत आहेत.

## सोलापूर महानगरपालिका निवडणूक
# तब्बल २३० अर्ज अवैध

- १४६० पैकी १२३० अर्ज वैध
- काही उमेदवारांनी गुरुवारी अर्ज घेतले मागे
- आज माघारीनंतर होणार निवडणूक चित्र स्पष्ट

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ जानेवारी-**

सोलापूर मानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी दाखल झालेल्या १४६० उमेदवारी अर्जांची छानन्नी प्रक्रिया रात्री १० च्या सुमारास पूर्ण झाली. यामध्ये सुमारे २३० अर्ज नामंजूर ठरले असून १२३० अर्ज वैध ठरविण्यात आले आहेत. दरम्यान गुरुवारी काही उमेदवारांनी आपले अर्ज मागे घेतले.मागील तीन दिवस प्रचंड गजबजलेले नॉर्थकोट परिसर आज तुलनेने शांत दिसून आला. सलग दोन दिवसांच्या तणावपूर्ण बंदोबस्तानंतर पोलिस यंत्रणेलाही काहीसा विसावा मिळाला आहे.




सोलापूर महापालिका निवडणूक अंतर्गत अर्ज छाननी प्रक्रियेच्या दिवशी मात्र नॉर्थकोट परिसरात अक्षरशः रणसंग्रामाचे वातावरण होते. एकमेकांच्या अर्जांवर आक्षेप घेण्यावरून उमेदवार, कार्यकर्ते व समर्थकांमध्ये जोरदार वादविवाद झाले. अनेक वेळा परिस्थिती चिघळत असल्याने पोलिसांना हस्तक्षेप करावा लागला. त्यामुळे दिवसभर तणावाचे वातावरण होते.दरम्यान, उद्या दुपारपर्यंत उमेदवारी अर्ज माघार घेण्याची अंतिम मुदत असून, त्यानंतरच कोण कोणाच्या विरोधात निवडणूक लढवणार याचे स्पष्ट चित्र समोर येणार आहे. सध्या अनेक प्रभागां मध्ये उमेदवारांची संख्या मोठी असल्याने माघारीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. या साऱ्या गोंधळात आणखी भर पडली ती प्रमुख राजकीय पक्षांच्या अधिकृत याद्यांच्या गोंधळाची. बहुतेक सर्वच पक्षांनी आपल्या उमेदवारांची घोषणा रीतसर प्रसारमाध्यमांमध्ये केलेली नाही.

या सगळ्या प्रक्रियेत प्रशासनाच्या संथ कारभारावरही नाराजी व्यक्त होत आहे. एकूण किती उमेदवारी अर्ज दाखल झाले याची अधिकृत आकडेवारी तब्बल १९ तासांनंतर, बुधवारी जाहीर करण्यात आली. छाननी रात्री पूर्ण होऊनही उर्वरित वैध उमेदवारांची प्रभागनिहाय यादी आज दुपारी १२ वाजल्यानंतरच प्रसारमाध्यमांकडे पाठविण्यात येऊ लागली. या दिरंगाईमुळे उमेदवार व त्यांच्या समर्थकांना मोठ्या प्रमाणात मानसिक त्रास सहन करावा लागत असल्याची भावना व्यक्त होत आहे. एकूणच, अर्जछाननीनंतरचा गोंधळ ओसरला असला तरी माघारीनंतरच सोलापूर महानगरपालिका निवडणुकीचे खरे राजकीय गणित स्पष्ट होणार आहे. सध्या मात्र सर्वांचे लक्ष उद्याच्या अंतिम मुदतीकडे लागले आहे.

# ठाकरेंवर आरोप करणाऱ्या शिंदे सेनेतच घराणेशाहीचे लोण!

**तभा वृत्तसेवा | विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १ जानेवारी:**

देशाचे लक्ष लागून राहिलेल्या मुंबई महापालिकेत सत्ता मिळवण्यासाठी महायुतीतील शिवसेना शिंदे गटाने जय्यत तयारी केली आहे. त्याचाच एक भाग म्हणून कोणताही धोका न पत्करता नेत्यांच्या मुला-मुलींना आणि त्यांच्या नातलगाना मैदानात उतरवले आहे.

विजयाची जास्ती जास्त खात्री असल्याने त्यांनाच उमेदवारी देण्यात आली आहे. त्यामध्ये शिंदे गटाने ८ विद्यमान आमदार- खासदारांच्या कुटूंबियात तिकीट दिले आहे. तर भाजपाने विद्यमान लोकप्रतिनिधीच्या कुटूंबियांना थेटपणे उमेदवारी देण्याचे टाळले आहे. त्याऐवजी त्यांचे अन्य नातेवाईक आणि माजी आमदार- खासदाराच्या मुलामुलींना तिकीट दिले आहे. काही वर्षांपूर्वीपर्यत विरोधकांकडून काँग्रेसवर घराणेशाहींबद्दल टीका केली जात होती. मात्र आता सर्वच राजकीय पक्षांमध्ये ही घराणेशाही पाहायला मिळत आहे. नगरपालिका निवडणुकीत नांदेडमधील लोहा नगरपालिकेत चक्क एकाच घरातील ६ जणांना भाजपने उमेदवारी दिली होती. त्याबाबत सोशल मीडियावरून जोरदार टीका झाली. निवडणुकीत त्या सर्व ६ जणांचा पराभव झाला. त्यानंतर भाजपने महापालिका निवडणुकांत यु टर्न घेत आमदार, खासदार आणि मंत्र्यांच्या मुलांना महापालिका निवडणुकीत उमेदवारी न देण्याचा निर्णय भाजपने घेतला. या नेतेमंडळींच्या नातलगांना मैदानात उतरवले आहे. तर, दुसरीकडे शिंदेंच्या पक्षातील ८ आमदार, खासदारांची मुले आणि नातेवाईकांना मुंबईत उमेदवारी दिली आहे. . ठाकरेंच्या शिवसेनेवर घराणेशाही आणि सोन्याचा चमचा घेऊन जन्माला आलेले असे म्हणत टीका करणाऱ्या एकनाथ शिंदेंनी आपल्याच पक्षात घराणेशाही पुढे नेल्याचे पाहायला मिळत आहे. मुंबईत वॉर्ड क्रमांक १९१ मधून माजी आमदार सदा सरवणकर यांची कन्या प्रिया गुरव-सरवणकर यांना तर वॉर्ड क्रमांक १६९ मधून आमदार मंगेश कुडाळकर यांचा मुलगा जय कुडाळकर यांना तिकीट दिले आहे. तसेच, चांदिवलीमधून वॉर्ड क्रमांक १६३ मधून आमदार दिलिप मामा लांडे यांची पत्नी शैला लांडे यांना तर चेंबूरमधून वॉर्ड क्रमांक १५३ मधून आमदार तुकाराम कांते यांची सून तन्वी काते यांना उमेदवारी दिली आहे. अणुशक्ती नगर वॉर्ड क्रमांक १४६ मधून आमदार तुकाराम काते यांची सून समृद्धी काते यांना मैदानात उतरवले आहे. भांडुप वॉर्ड ११३ मधून आमदार अशोक पाटील यांचा मुलगा रुपेश पाटील यांना तर जोगेश्वरी पूर्व वॉर्ड ७३ मधून खासदार रविंद्र वायकर यांच्या कन्या दिप्ती वायकर यांना उमेदवारी दिली असून धारावीतून वॉर्ड क्रमांक १८३ मधून शिवसेनेचे माजी खासदार राहुल शेवाळे यांची भावजय वैशाली नयन शेवाळे यांना उमेदवारी दिली आहे.

**८ आमदार, खासदारांची मुले रिंगणात!**



# सामाजिक सद्भावनेद्वारे आव्हानांचा सामना शक्य

## सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांचे प्रतिपादन

◆ **रायपूर, १ जानेवारी**

सर्व भारतीय लोक आपापली आस्था आणि आचरणासह सद्भावनेने एकत्र नांदतात. अशा सामाजिक सद्भावनेद्वारे जीवनातील मोठ्या आव्हानांचाही सामना करणे शक्य होते, असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी केले.

संघ शताब्दीनिमित्त रायपूर येथील श्रीराम मंदिरात सामाजिक सद्भावना बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. बैठकीला विविध जाती, समाज, पंथाचे शेकडो प्रतिनिधी हजर होते. त्यांना संबोधित करताना सरसंघचालक म्हणाले, भारतातील लोकांमध्ये सामाजिक सद्भावना हा स्थायी भाव आहे. भारतीय घरात काम करणाऱ्यालाही घरातील लहान मुले 'काका' म्हणातात, त्याला आदरार्थी संबोधून सन्मान दिला जातो. हा सद्भाव कित्येक दशकांपासून चालत आलेल्या परंपरेचा भाग बनला आहे.



सामाजिक एकता ही प्रचंड मोठी ताकत आहे. ब्रिटिश स्वेच्छेने भारत सोडून गेले नाहीत, आपल्या लोकांनी एकजूट होऊन स्वातंत्र्यासाठी संघर्ष केला. आपल्या या एकता आणि अखंडतेच्या काही धाग्यांना आपण विसरलोय्, त्यामुळे दृष्टिकोनात भेदाभेद आला. इंग्रजांना आपली एकता आवडली नाही, तर त्यांनी त्याचीही व्यवस्था केली. त्यांनी लोकांमध्ये कायम भेदाभेद राहील, अशी फूट पाडली. पण, आपण त्यांच्या या प्रयत्नांना देखील निष्फळ केले. जिथे सद्भावना मजबूत असते, तिथे फूट पाडणाऱ्यांची मात्रा चालत नाही.

**लव्ह जिहाद, धर्मांतरणाबाबत प्रबोधन व्हावे**

आज आपल्यासमोरही अनेक आव्हाने आहेत. प्रत्येक समाजाच्या स्वत:च्या काही आकांक्षा आहेत. आपण आजवर आपली विविधता सांभाळून अस्मितेचे रक्षण केले. आम्ही समाज आणि देश म्हणून एक आहोत, ज्याच्या मागे सामाजिक सद्भावनाच आहे. जे लोक या भावनेला सहन करू शकत नाहीत, ते आपल्या सद्भावनेवर आक्रमण करतात. पण, या स्थितीत आपल्याला एकत्र राहून सामना करायला हवा. हे समाजात सांगूनच जनजागृती करावी लागेल. लव्ह जिहाद, धर्मांतरण व्यसन आदीं संदर्भात प्रबोधन व्हायला हवे. माणूस एकाकी पडला की, त्याची एकटेपणाची भावना व्यसनाकडे ढकलते. यउलट, सामाजिक एकतेने सुरक्षिततेची भावना येते, असेही सरसंघचालक म्हणाले. (वृत्तसंस्था)

### कुटुंबात प्रबोधन महत्त्वाचे

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने शताब्दीनिमित्त दिलेल्या पंचसूत्रीत कुटुंब प्रबोधनाचाही समावेश आहे. याविषयी सरसंघचालक म्हणाले की, घरात आपल्या कुटुंबाचे प्रबोधन व्हायला हवे. आठवड्यातून किमान एक दिवस ठरवून सर्व कुटुंबीयांनी एकत्र आले पाहिजे. भजन, भोजन एकत्र घेतले पाहिजे. नंतर सर्वांनी मिळून काही विषयांवर चर्चा करावी. असा मंगल संवाद कुटुंबात व्हायला हवा. यातूनच आपण समाजाला किती वेळ देऊ शकतो, याचाही विचार करावा, असे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी सुचविले.

## महत्त्वाचे



### वर्षाच्या पहिल्या दिवशी बाजार सपाट

**मुंबई :** २०२६ या नव्या वर्षातील पहिल्याच दिवशी भारतीय शेअर बाजारात संमिश्र कल पाहायला मिळाला. तंबाखूजन्य उत्पादनांवरील अबकारी कराचा मोठा फटका आयटीसी शेअर्सला बसला. एकूणच बाजार मात्र सपाट राहिला. मुंबई बाजाराचा निर्देशांक ३२ अंकांनी घसरून ८५,१८८ वर बंद झाला. निफ्टी १७ अंकांच्या वाढीसह २६,१४७ वर स्थिरावला. निर्देशांकातील ३० पैकी २२ शेअर्स वाढले होते. यामध्ये वीज कंपनी एनटीपीसी अव्वल ठरली.

# बांगलादेशात आणखी एका हिंदूवर हल्ला

## चाकूने वार करून पेट्रोल टाकून जाळले

◆ **ढाका, १ जानेवारी**

बांगलादेशात हिंदूंवरील अत्याचाराची मालिका कायम आहे. शरियतपूर जिल्ह्यातील दामुद्या परिसरात बुधवारी रात्री एका हिंदूवर नृशंस हल्ला करण्यात आला. दुकान बंद करून घरी परतत असताना गुंडांनी त्याला मारहाण केली. नंतर धारदार शस्त्रांनी वार केले आणि शेवटी पेट्रोल टाकून पेटवून दिले. त्याने तलावात उडी घेऊन जीव वाचवला. त्याला गंभीर अवस्थेत ढाक्यात हलवण्यात आले आहे.

खोकन चंद्र दास, असे या व्यावसायिकाचे नाव आहे. ते केनेश्वर युनियनच्या केउरभंगा बाजारात औषधे आणि मोबाईल बँकिंगचा व्यवसाय करतात. बुधवारी रात्री साडेनऊ वाजता दुकान बंद करून दिवसभर जमा झालेली रोकड घेऊन ते ऑटोरिक्षाने परतत होते. त्यावेळी दामुद्या-शरियतपूर मार्गावरील बाजाराजवळ गुंडांनी ऑटो रोखून त्यांच्यावर भीषण हल्ला केला.

पहिले खोकन चंद्र दास यांना मारहाण करण्यात आली. त्यानंतर धारदार शस्त्रांनी वार



करण्यात आले. त्यात ते गंभीर जखमी झाले. इतक्यावर समाधान न झाल्याने गुंडांनी अंगावर पेट्रोल टाकून त्यांना पेटवून दिले.अचानक झालेल्या या हल्ल्यामुळे परिसरात खळबळ उडाली. जीव वाचवण्यासाठी खोकन चंद्र दास यांनी जवळच्या तलावात उडी घेतली. लोकांनी आरडाओरडा केल्यानंतर हल्लेखोरांनी घटनास्थळावरून पळ काढला. प्राथमिक उपचारानंतर त्यांना ढाक्याला हलवण्यात आले.

**आरोपींची ओळख पटली**

या प्रकाराची माहिती मिळताच पोलिस घटनास्थळी पोहोचले, अशी माहिती दामुद्या पोलिस ठाण्याचे प्रभारी मोहम्मद रबीउल हक यांनी दिली. यातील दोन आरोपींची ओळख पटली आहे. रब्बी आणि सोहाग अशी त्यांची नावे असून, ते स्थानिक आहेत. त्यांचा शोध घेतला जात असल्याचे हक यांनी सांगितले. (वृत्तसंस्था)

# १३ उमेदवार बिनविरोध नगरसेवक

◆ **मुंबई, १ जानेवारी**

राज्यात सध्या महापालिका निवडणुकीचे वातावरण चांगलेच तापले आहे. उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या नाट्यातून पुढे येत आता अर्जांची छाननी केली जात असून यात राजकीय पक्ष एकमेकांना धक्के देत आहेत. काही ठिकाणी बिनविरोध विजयाची गुलाल उधळणदेखील सुरू झाली आहे. राज्यभरात १३ उमेदवार बिनविरोध नगरसेवक बनले आहेत.

कल्याण-डोंबिवली महानगर पालिकेत महायुतीने मतदानापूर्वीच काही जागांवर विजय मिळविला. भाजपाचे पाच आणि शिवसेनेचे चार उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत. त्यामुळे १२२ सदस्य संख्या असलेल्या कल्याण-डोंबिवलीत सत्तास्थापनेसाठी आवश्यक असलेल्या ६२ जागांपासून महायुती आता ५३ जागा दूर आहे. (वृत्तसंस्था)

## भाजप उमेदवार पूजा मोरे रडल्या

पुणे : भारतीय जनता पक्षाच्या उमेदवार पूजा मोरे-जाधव यांनी गुरुवारी आपला उमेदवारी अर्ज मागे घेतला. पक्षाच्या कार्यकर्त्यांचा रोष आणि सोशल मीडियावर सुरू असलेल्या खालच्या पातळीवरील राजकारणामुळे त्यांनी हा निर्णय घेतल्याचे सांगितले. उमेदवारी अर्ज मागे घेताना आपल्या भावनांना वाट मोकळी करून दिली.






सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



# सोने बुकींगच्या नावाखाली महिलेला साडेचार लाखांचा गंडा

तभा वृत्तसेवा
बार्शी, दि.१ जानेवारी-




मुलीच्या लग्नासाठी सोने खरेदी करण्याच्या उद्देशाने एका सोन्याच्या दुकानात पैसे जमा केलेल्या विधवा महिलेची तब्बल ४ लाख ३५ हजार रुपयांची फसवणूक झाल्याची धक्कादायक घटना बार्शी शहरात उघडकीस आली आहे. या प्रकरणी संबंधित दुकानातील कामगाराविरोधात बार्शी शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे.

संशयित कामगार युवराज भालचंद्र जंगम (वय ५०, रा. कुरुंदवाड, जि. कोल्हापूर) याच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नीता अतुल दळवी (वय ४१, रा. सुभाषनगर, बार्शी) या गृहिणी असून त्या नर्स म्हणून कार्यरत आहेत. पतीचे २०१५ साली निधन झाल्यानंतर त्या आई वडील व मुलीसोबत माहेरी वास्तव्यास आहेत. मुलगी साक्षीच्या लग्नासाठी सोने खरेदी करण्याच्या उद्देशाने दळवी यांनी १० फेब्रुवारी २०२५ रोजी रामचंद्र भगवान बुड्ढुख या सोन्याच्या दुकानात ६ तोळे सोने बुक केले. यावेळी दुकानातील कामगार युवराज भालचंद्र जंगम याच्याकडे त्यांनी ४० हजार रुपये रोख दिले. त्यानंतर फेब्रुवारी ते जुलै २०२५ या कालावधीत त्यांनी बँक ऑफ इंडिया, बार्शी येथील खात्यातून तसेच गुगल पे द्वारे एकूण ३ लाख ९५ हजार रुपये संबंधित कामगाराच्या फोन पे खात्यावर पाठवले. दरम्यान, पैसे जास्त झाल्याने सोने देण्याची मागणी केली असता आरोपी युवराज जंगम याने उडवाउडवीची उत्तरे देत आणखी पैसे भरण्याची मागणी केली. नंतर तो अचानक दुकानात येणे बंद झाले.

सदर दुकानाचे मालक ऋषिकेश बुड्ढुख यांनी सदर बाबत विचारणा केली असता म ला काहीही माहित नसून तो सध्या कामगार युवराज हा आई आजारी असल्याने गावी गेल्याचे सांगण्यात आले. मात्र, अनेक दिवस उलटूनही तो परत न आल्याने आणि फोन बंद असल्याने दळवी यांना फसवणूक झाल्याचे लक्षात आले. संपूर्ण ४ लाख ३५ हजार रुपये देऊनही न सोने मिळाले, न पैसे परत मिळाले, असे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

वारंवार दिशाभूल करून आपली फसवणूक करण्यात आल्याचा आरोप करत दळवी यांनी युवराज भालचंद्र जंगम (वय ५०, रा. कुरुंदवाड, जि. कोल्हापूर) याच्याविरुद्ध तक्रार दाखल केली आहे. या प्रकरणाचा पुढील तपास बार्शी शहर पोलीस करीत असून, आरोपीचा शोध सुरु आहे.

# नुतन वर्षाच्या मुहूर्तावर स्वामी दर्शनासाठी वटवृक्ष मंदीरात भक्तांचा महापूर

**मंदिर समितीच्या वतीने चेअरमन इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली भाविकांसाठी राबविली गेली सुलभ दर्शन प्रणाली**

तभा वृत्तसेवा
अक्कलकोट दि. १ जानेवारी-

आज १ जानेवारी सन २०२६ नुतन वर्षाच्या पावन पर्वावर श्री स्वामी समर्थांच्या दर्शनासाठी भक्तांनी मोठ्या श्रद्धेने गर्दी केली होती. श्री स्वामी समर्थांच्या व श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान मधील ऐतिहासिक प्रत्यक्ष व स्वामी समर्थांचे देहरूपी सहवास लाभलेल्या वटवृक्षाच्या दर्शनासाठी भाविकांनी केलेली गर्दी व लागलेल्या रांगा या विक्रमी भाविकांच्या उपस्थितीचे साक्ष देत होत्या.

दर्शन रांग थेट फत्तेसिंह चौक, भारत गल्ली, देशमुख गल्ली मार्गे डबरे गल्ली पर्यंत लांबली होती. सर्व स्वामी भक्तांचे स्वामी दर्शन सुलभ व जलद पद्धतीने व्हावे याकरिता मंदिर समितीचे चेअरमन महेश इंगळे यांनी स्वतः पहाटे ४ पासूनच दिवसभर व रात्री ११ पर्यंत मंदिरात उपस्थित राहून दर्शनाचे विविध नियोजन करताना निदर्शनास येत होते. भाविकांना टप्प्याटप्प्याने दर्शनास सोडण्यासोबतच वयोवृद्ध व विकलांग भाविकांना व्हील चेअरच्या मार्फत स्वामी दर्शनाची सेवाभावी दर्शन प्रणाली राबविण्यात आली. हे दृश्य पाहून महेश इंगळे कुटुंबियांची स्वामी भक्तीची ताकद अनुभवायला मिळाली. याप्रसंगी बोलताना मंदिर समितीचे चेअरमन व नगरसेवक महेश इंगळे यांनी हजारो भक्तांनी मनोभावे, संयमाने व श्रद्धेने स्वामींचे दर्शन घेतले. श्री स्वामी सम र्थ आपल्या भक्तांना कधीही रिकाम्या हाताने पाठवत नाहीत, अशी भक्तांची भावना आहे. नववर्षाच्या आरंभी स्वामींच्या चरणी मस्तक ठेवून दर्शन घेतल्याने जीवनात सुख, शांती, आरोग्य व यश प्राप्त होते असा भक्तांचा दृढ विश्वास आहे. सर्व स्वामी भक्तांनी श्री स्वामी समर्थांचे दर्शन घेतल्यानंतर सर्व भाविकांचे मनोकामना श्री स्वामी समर्थ नक्कीच पूर्ण करतील असा विश्वास महेश इंगळे यांनी व्यक्त करत सर्व भाविकांना या नूतन वर्षात सुख, समृद्धी, ऐश्वर्य लाभो असे सांगून सर्व भाविकांना नूतन वर्षाच्या शुभेच्छा दिल्या. असा हा स्वामी कृपेचा अनुभव, जो प्रत्येक भक्ताच्या मनात आनंद व श्रद्धा अधिक दृढ करणारा ठरला.



यावेळी मोहनराव पुजारी, मंदार महाराज पुजारी, व्यंकटेश पुजारी, प्रथमेश इंगळे, मंदिर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त म हेश गोगी, श्रीशैल गवंडी, गिरीश पवार, विपुल जाधव, श्रीकांत मलवे, अमर पाटील, श्रीकांत मलवे,सागर गोंडाळ, दर्शन घाटगे, आदित्य गवंडी, तन्मय इचगे आदींसह मंदिर समितीचे सर्व सेवेकरी, कर्मचारी यांनी भाविकांचे दर्शन सुलभ होणे कामी परिश्रम घेतले.

## महत्त्वाचे

### उमेदवारीसाठी अशोक चव्हाणांनी ५० लाख घेतले; माजी नगरसेवकाचा आरोप

नांदेड, दि १ जानेवारी



माजी मुख्यमंत्री तसेच भाजपचे खासदार अशोक चव्हाण यांच्यावर उमेदवारीसाठी ५० लाख रुपये घेतल्याचा खळबळजनक आरोप करण्यात आला आहे. विशेष म्हणजे हा आरोप चव्हाण यांचे जुने सहकारी व कट्टर समर्थक म्हणून ओळखले जाणारे माजी नगरसेवक भानुसिंह रावत यांनी केला आहे. त्यांनी केलेल्या या आरोपामुळे राजकीय वर्तुळात एकच खळबळ उडाली आहे. नांदेड महापालिकेची निवडणूक ही प्रथमच अशोक चव्हाण यांच्या नेतृत्वात लढवली जात आहे. अशोक चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली उमेदवारी जाहीर करण्यात आली असताना अनेक इच्छुकांचे तिकीट कापण्यात आले आहे. यात चव्हाण यांचे कट्टर समर्थक तथा माजी नगरसेवक भानुसिंह रावत यांचा देखील समावेश आहे. मुलाचे तिकीट कापल्याने भानुसिंह रावत यांनी नाराजी व्यक्त करत अशोक चव्हाण यांनी उमेदवारीसाठी प्रत्येकाकडून ५० लाख रुपये घेतल्याचा आरोप केला आहे. तसेच प्रभाग क्रमांक १६ मधून आपल्या मुलासाठी भाजपकडून उमेदवारी मागितली होती. परंतु, कुठलेही ठोस कारण न देता ऐनवेळी उमेदवारी नाकारात आम च्यावर अन्याय केल्याचाही आरोप रावत यांनी केला आहे.

### नागनळळी आश्रमशाळेत उडगी केंद्राची शिक्षण परिषद उत्साहात संपन्न

अक्कलकोट, दि १ जानेवारी

नागनळळी येथील आश्रमशाळेत उडगी केंद्राची शिक्षण परिषद उत्साहपूर्ण वातावरणात यशस्वीरीत्या पार पडली. या परिषदेचे अध्यक्ष संस्थेचे सचिव जावेद पटेल होते. प्रमुख पाहुणे म्हणून केंद्रप्रमुख श्रीमंत पुजारी व शालेय पोषण आहार अधीक्षक पंडित गुरव यांची उपस्थिती लाभली. कार्यक्रमाचे आयोजन व समन्वय मुख्याध्यापक रईस शेख यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे तसेच नवनिर्मित श्री मल्लिकार्जुन प्राथमिक शिक्षक सोसायटी, अक्कलकोट चे चेअरमन बसवराज गुरव, संचालक अमोल शिंदे, वासुदेव देसाई, शोभा स्वामी व शरणप्पा फुलारी यांचा सत्कार अध्यक्ष जावेद पटेल यांच्या हस्ते करण्यात आला. शिक्षण परिषदेमध्ये विविध महत्त्वाच्या विषयांवर तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. श्री लक्ष्मण वाघमोडे (मातनहळळी) यांनी जयंत नारळीकर व वैज्ञानिक दृष्टिकोन या विषयावर सविस्तर माहिती देत वैज्ञानिक विचारसरणीचे महत्त्व अधोरेखित केले. श्री लक्ष्मण म्हेत्रे (सातन दुधनी) यांनी निपुण भारत चाचणी बाबत शिक्षकांना अनमोल मार्गदर्शन केले. तसेच श्री वसीम मळ्ळी (बासलेगाव) यांनी तंबाखूमुक्त शाळा अभियान यासंदर्भात प्रभावी मार्गदर्शन करून जनजागृतीचे महत्त्व स्पष्ट केले. या शिक्षण परिषदेमुळे शिक्षकांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित होण्यास, शैक्षणिक गुणवत्ता वाढीस तसेच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सकारात्मक चर्चा व विचारमंथन घडून आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शंभूलिंग बशेट्टी,सूत्रसंचालन मोहन गुरव आभार संजय कवटगी यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रशालेतील शिक्षक मल्लिनाथ चिचोळी, काशिनाथ सालोटगी, दिगंबर नांदवटे, विश्वास डमरे यांनी परिश्रम घेतले.



### ओन्ली समाजसेवा बहुउद्देशीय संस्थेच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन

बार्शी, दि १ जानेवारी

ओन्ली समाजसेवा बहुउद्देशीय संस्था, बार्शी या संस्थेच्या दिनदर्शिका २०२६ चे प्रकाशन बार्शी नगरपरिषदे बार्शीचे मुख्याधिकारी तैमूर मुलाणी यांच्या हस्ते व उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजाराम नस्टे, कर अधिकारी विठ्ठल पाटोळे व आरोग्य विभाग प्रमुख शब्बीर वस्ताद यांच्या उपस्थितीत बार्शी नगरपरिषद या ठिकाणी संपन्न झाले. याप्रसंगी मनोगत व्यक्त करताना तैमूर मुलाणी यांनी ओन्ली समाजसेवा बहुउद्देशीय संस्थेच्या विविध शैक्षणिक व सामाजिक उपक्रमाचे कौतुक केले आणि पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या. सदर कार्यक्रमामध्ये संस्थेच्या महिला समितीच्या अध्यक्षा व मेंबर सौ. सायरा मुल्ला यांची बार्शी नगरपरिषदेच्या नूतन नगरसेविका म्हणून निवड झाल्याबद्दल त्यांचे संस्थेच्यावतीने सन्मान करण्यात आला. या प्रकाशन कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष राहुल वाणी, उपाध्यक्ष संतोष शेळगावकर, सचिव अजय तिवारी, सहसचिव नागनाथ सोनवणे खजिनदार माणकोजी ताकमाते, संस्थेचे सदस्य प्रा. डॉ .चंद्रकांत उलभगत, सुरेंद्र जंगम, सुनील नवले, सुनील फल्ले, रेखा विधाते, सुजाता अंधारे, रागिनी झेंडे, रेखा सरवदे, अलका हाडगे, अनुसया आगलावे, आशाताई स्वामी हे उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचलन व आभार प्रदर्शन प्रा. डॉ. चंद्रकांत उलभगत यांनी केले.

# नवीन वर्षाचे अनोख्या पद्धतीने स्वागत; दिव्यांग महिलेला तीन चाकी सायकल भेट

तभा वृत्तसेवा,
अकलूज, दि.१ जानेवारी-



नवीन वर्षाचे स्वागत जल्लोष, फटाके किंवा समारंभातून न करता सामाजिक बांधिलकी जोपासत केल्याचे एक प्रेरणादायी उदाहरण अकलूज येथे पाहायला मिळाले. रत्नप्रभादेवी मोहिते पाटील दिव्यांग सेवाभावी संस्था, विजयसिंह मोहिते पाटील दिव्यांग सेवाभावी संस्था व प्रहार संघटनेच्या संयुक्त विद्यमाने तरंगफळ (ता. माळशिरस) येथील दीव्यांग महिला जगुबाई रामहरी गेंड यांना तीन चाकी सायकल भेट देऊन नववर्षाचे आगळ्या-वेगळ्या पद्धतीने स्वागत करण्यात आले.

तरंगफळ गावच्या रहिवासी असलेल्या जगुबाई गेंड यांना दैनंदिन हालचालींसाठी मोठ्या अडचणी येत होत्या. ही बाब लक्षात घेऊन संबंधित संस्थांच्या पुढाकारातून अकलूज उपजिल्हा रुग्णालय येथे त्यांना तीन चाकी सायकल सुपूर्द करण्यात आली. या उपक्रमामुळे जगुबाई यांच्या जीवनात स्वावलंबनाचा नवा मार्ग खुला झाला असून त्यांच्या चेहऱ्यावर नववर्षाची खरी आनंदाची झळाळी दिसून आली.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेश सरचिटणीस व अल्पसंख्याक विभागाचे प्रदेश प्रमुख मुख्तारभाई कोरबू, प्रहार अपंग संघटनेचे जिल्हा संघटक शहाजी देशमुख, रत्नप्रभादेवी मोहिते पाटील दिव्यांग सेवाभावी संस्था तथा विजयसिंह मोहिते पाटील दिव्यांग सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष गोरख जानकर यांची उपस्थिती लाभली. तसेच बाळासाहेब लोखंडे, अमजद शेख यांच्यासह अनेक मान्यवर, कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते. यावेळी मान्यवरांनी दिव्यांग व्यक्तींना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी अशा उपक्रमांची आवश्यकता असल्याचे मत व्यक्त केले. गरजूंना मदतीचा हात देऊन साजरे केलेले असे सामाजिक नववर्षच खऱ्या अर्थाने प्रेरणादायी ठरते, असे प्रतिपादन उपस्थितांनी केले.

या अनोख्या व संवेदनशील उपक्रमाचे सर्व स्तरातून स्वागत होत असून, भविष्यातही अधिकाधिक दिव्यांग व्यक्तींना मदत करण्यासाठी अशा उपक्रमांची व्याप्ती वाढविण्यात येणार असल्याचा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे.

# वीरशैव लिंगायत समाजाच्या वतीने कैलास भूमी येथे वृक्षारोपण

तभा वृत्तसेवा
अकलूज, दि. १ जानेवारी-

अकलूज येथील वीरशैव लिंगायत समाज बांधव यांच्या वतीने नवीन वर्षाची सुरुवात लिंगायत समाज कैलास भूमी येथे श्रमदानातून वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.या परिसरात विविध प्रकारची झाडे लावण्यात आली आहे.



सध्या वृक्षतोड मोठ्या प्रमाणात होत असल्यामुळे वीरशैव लिंगायत समाजातील युवकांनी नवीन वर्षाची सुरुवात वृक्षारोपणाने केल्यामुळे भावी पिढीला याचा लाभ होणार आहे. या वृक्षारोपण कार्यक्रमासाठी अकलूज ग्रामपंचायतीचे माजी सदस्य त्र्यंबक (तात्या) गुळवे,वीरशैव लिंगायत समाज बहुउद्देशीय संस्थेचे खजिनदार आनंद (दादा) भिकलिंग तोडकरी,वीरशैव लिंगायत समाज बहुउद्देशीय संस्थेचे संचालक मल्लिकार्जुन (पिंटू) वैद्य देशमुख व सामाजिक कार्यकर्ते प्रभाकर बिराजदार यांनी या वृक्षारोपण कार्यक्रमासाठी विविध प्रकारची झाडे उपलब्ध करून दिली आहेत.

वृक्षारोपण कार्यक्रम अकलूज नगरपरिषदेचे नगरसेवक विलास गणपतराव क्षीरसागर, वीरशैव लिंगायत समाज बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष नागेश औदुंबर नष्टे, उपाध्यक्ष नितीन शंकरराव आर्वे, वीरशैव लिंगायत समाज मंडळाचे अध्यक्ष गोपाळ (राजाभाऊ) सोम नाथ गुळवे यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी मल्लिकार्जुन (पिंटू) वैद्य-देशमुख, पोलीस अधिकारी राजमाने, आनंद (दादा) तोडकरी, संतोष गुळवे, नागेश लिगाडे, सुजित बामनकर, डॉ.चंदन सरताळे, प्रभाकर बिराजदार, महालिंग राऊत, उमेश नडगिरे, महेश डिकोळे ओंकार बेलपत्रे पत्रकार, संजय लोहकरे व शशिकांत कडबाने उपस्थित होते.



# महाराष्ट्र रिक्षा सेनेच्या बार्शी शहर प्रमुखपदी राजेंद्र मुळे यांची निवड

तभा वृत्तसेवा
बार्शी, दि. १ जानेवारी

शिवसेना (उद्धव ठाकरे गट) संलग्न महाराष्ट्र रिक्षा सेनेच्या बार्शी शहर प्रमुखपदी राजेंद्र मुळे यांची निवड करण्यात आली आहे. महाराष्ट्र रिक्षा सेनेचे जिल्हा संघटक सुनील नामदेव जगताप यांनी मुळे यांना अधिकृत नियुक्तीपत्र प्रदान केले.

नियुक्तीपत्रात बार्शी शहरात महाराष्ट्र रिक्षा सेनेचे संघटन अधिक बळकट करून रिक्षा चालक व मालकांच्या न्यायहक्कांसाठी प्रभावीपणे कार्य करावे, अशा स्पष्ट सूचना देण्यात आल्या आहेत. या निवडीबद्दल आमदार दिलीपराव सोपल यांच्या हस्ते राजेंद्र मुळे यांचा सत्कार करण्यात आला. या सत्कार समारंभास महेशभैया धाराशिवकर (शहर प्रमुख, सोलापूर), सुरेशमामा जगताप (सोलापूर शहर संघटक), मारुती खानापुरे (शाखा प्रमुख), बाळासाहेब पवार (शहराध्यक्ष, सोलापूर), दिनेश नाळे (बार्शी शहर अध्यक्ष), नितीन भोसले (अध्यक्ष) यांच्यासह अजय घोडके, गणेश योगे, संतोष वायकर, मोहन नांदेडकर, महादेव गिराम, परशुराम ननवरे, गणेश चौधरी, राजू शेख, नितीन जाधव, सोहेल शेख, नरेंद्र गिराम, आनंद सुरवसे, शिरीष गिराम, गणेश खत्री, बबलू शेळके, राहुल वीर, लक्ष्मण बनसोडे तसेच अनेक रिक्षा चालक-मालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. निवडीनंतर बोलताना राजेंद्र मुळे यांनी रिक्षा चालक व मालकांच्या विविध समस्या, हक्क आणि मागण्यांसाठी संघटनेच्या माध्यमातून सातत्याने व प्रभावीपणे काम करण्याचा निर्धार व्यक्त केला.



# अन्नछत्र मंडळात गुरूवारी एक लाख भाविकांनी घेतला प्रसाद

तभा वृत्तसेवा
अक्कलकोट, दि १ जानेवारी

वर्षाआरंभा निमित्त अक्कलकोटमध्ये पुणे, मुंबईसह देश-विदेशातून भाविक आलेले होते. अन्नछत्र न्यासाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली अन्नछत्र मंडळाकडून येणाऱ्या भाविकांसाठी उत्कृष्ट नियोजन करण्यात आले होते. न्यासाकडून अन्नदानाची वेळ वाढविली होती.

अन्नछत्र मंडळात दिवसात १ लाखांहून अधिक भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला आहे. वर्षीआरंभी भाविकांच्या गर्दीने सर्वोच्चांक गाठला आहे.

**न्यासाचे नेटके नियोजन**

बाहेर गावामधून आलेल्या वाहनांची मैंदर्गी, बसलेगाव, व शहरातील मुख्य रस्त्यावर वाहनांची दुतर्फा गर्दी होत होती. हे लक्षात घेऊन न्यासाच्या मैंदर्गी रस्त्यावरील गेटने भाविकांना बाहेर जाण्यासाठी रस्ता मोकळा करण्यात आल्यामुळे वाहनांची गर्दी कमी झाली. न्यासाने पार्किंगची व्यवस्था चोख केलेली होती.

नेहमीच भक्तांना सुविधा देण्यामध्ये न्यास हे अव्वल असून भक्तांना कोणत्याच अडचणी येता कामा नये आशा उपाययोजना व दक्षता घेत असल्याने भक्तांना सुखकर पद्धतीने महाप्रसादाचा लाभ मिळाला.

# सोलापूर जिल्ह्यात रब्बीची सरासरी १०२ टक्के पेरणी

- यंदा मुबलक पाणीसाठ्यामुळे उन्हाळी पिकेही साधणार
- जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. १ जानेवारी-



जिल्ह्यात सप्टेंबर २०२५ मध्ये अतिवृष्टी झाल्याने जमिनीचा वापसा लवकर झाला नाही आणि यामुळे रब्बीच्या पेरणीला विलंब झाला आणि ज्वारी पेरणीची तारीख पुढे गेल्याने ज्वारी पिकाची पेरणी जिल्ह्यात कमी झाली आहे. तर जिल्ह्यात हरभरा, गहू, मोहरी, ऊस आदी पिकांचा टक्का वाढला आहे. तर यंदा कांद्याकडे शेतकऱ्यांनी जोर दिल्याचे दिसून येत आहे.

दरम्यान, आजतागायत जिल्ह्यात सरासरी १०२ टक्के पेरणी झाल्याची माहिती जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले यांनी दिली. दरम्यान, यंदा जिल्ह्यात चोहीकडे मुबलक पाणीसाठा असल्याने यंदा शेतकऱ्यांना उन्हाळी हंगामातील पिकेही साधतील, असा आशावाद जाणकार शेतकऱ्यांतून व्यक्त होत आहे. या झालेल्या पेरणीची तालुकानिहाय स्थिती पाहिली तर उत्तर सोलापूर ११३.८८ टक्के, दक्षिण सोलापूर १०२.८३, बार्शी १२०, अक्कलकोट ९१.१३, म होळ १०२.८३, माढा ७७.२७, करमाळा ९०.५२, पंढरपूर १२१.१८, सांगोला १०७.८, माळशिरस ११७.६६ आणि मंगळवेढा तालुक्यात १०६.०१ टक्के पेरणी झाली आहे. तर जिल्ह्यात उसाची सरासरी लागवड १ लाख ३१ हजार ६२६ हेक्टरवर झाली आहे.

जिल्ह्यात ज्वारी २ लाख ११ हजार ५७६ हेक्टरवर प्रत्यक्ष पेरणी झाली आहे. तर गहू ६६ हजार ६३३ हेक्टरवर पेरला आहे. मका ९२ हजार ६२७ हेक्टरवर पेरणी झाली. तर हरभरा ८१ हजार ७६३ हेक्टरवर पेरणी केला आहे. यंदा ज्वारी पेरणीस उशीर झाल्याने थोडी कमी प्रमाणात ज्वारी पेरणी केली गेली. तर मका आणि हरभरा क्षेत्र मोठ्या प्रमाणात वाढल्याचे दिसत आहे.

**करडईचा पेरणीचा टक्का घसरला**

२ ते ३ दशकापूर्वी करडईची गावोगाव मोठ्या प्रमाणात पेरणी होत असे. कमीत कमी २ ते ३ पट्टे तरी शेतकरी करडई करीत होता. करडईपासून भाजी मिळायची आणि त्याच्या काढणीनंतर त्याचे घाण्यातून तेल करून शेतकरीवर्ग आणत होता. मात्र आता युवा शेतकऱ्यांनी करडईकडे पाठ फिरविल्याचे दिसून येत असून, यंदा जिल्ह्यात अवघ्या २ हजार हेक्टरवर करडईची पेरणी झाली आहे. सुर्यफुल, तीळ, जवसाचीही प्रमाण जिल्ह्यात अत्यल्पच आहे.

**रानडुकरांच्या भीतीपोटी भुईमुगी गायब**

सोलापूर जिल्ह्यासह मराठवाड्यात पूर्वी भुईमुगाची पेरणीही मोठ्या प्रमाणात होत असे, जवळपास प्रत्येक शेतकऱ्यांच्या शेतात त्यांच्या कुटुंबाला शेंगा खाण्यापुरता तरी शेतकरीवर्ग भुईमुग करायचे. मोठे शेतकरी क्विंटलभर बियाणे पेरणी करीत होते. मात्र रानडुकरांच्या वैतागाने आता शेंगदाना उत्पादनही मोठ्या प्रमाणात घटले आहे. याचा कृषी विभागाने विचार करण्याची गरजही जाणकार शेतकरी व्यक्त करीत आहेत.



जे रामद्रोही झाले ते मुद्दाम हिंदू समाजात फूट पाडू इच्छित आहेत. आज ज्या प्रकारे ठाकरे गट व मनसे निवडक मुस्लिम मतांसाठी जिहादींशी हातमिळवणी करत आहेत, ते पाहता ते प्रभू श्रीराम व हिंदू समाजाच्या विरोधात गेल्याचे स्पष्ट होते.
**संजय निरुपम**, माजी खासदार


# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

शुक्रवार, २ जानेवारी २०२६ ३


उत्तर भारतीय महापौराची जेवढी मिरची ठाकरे गटाला लागली तेवढी बुरखेवाली महापौर बनले, या शक्यतेची का वाटली नाही? यांनी हिंदूमध्ये फूट पाडण्याची सुपारी घेतलेली दिसते.
**नितेश राणे**, भाजपा आमदार




# इराणमधील राजवटीविरोधात बंड

## २१ प्रांतांमध्ये हिंसक निदर्शने ● सरकारी इमारतींची तोडफोड ● पोलिसांसोबतच्या संघर्षात १९ ठार

◆ **तेहरान, १ जानेवारी**
इराणचे सर्वोच्च नेते अली खामेनी यांच्या राजवटीविरोधात इराणच्या लोकांनी बंड पुकारले असून, देशातील २१ प्रांतांमध्ये रस्त्यावर उतरून निदर्शने सुरू केली आहेत. अनेक भागात पोलिस आणि निदर्शकांमध्ये झालेल्या संघर्षात आतापर्यंत १९ नागरिकांचा मृत्यू झाला तर दीडशेपेक्षा अधिक जखमी आहेत. हुकूमशहाला मृत्युदंड द्या, अशी मागणी करणारे फलके हातात घेऊन लोक निदर्शने करीत आहेत. अनेक भागात सरकारी इमारती आणि वाहनांची तोडफोड, जाळपोळ करण्यात आल्याने परिस्थिती तणावपूर्ण आहे.

सत्तापरिवर्तनाच्या मागणीसाठी मंगळवारपासून राजधानी तेहरानसह देशाच्या २१ प्रांतांमध्ये सामान्य नागरिक रस्त्यावर उतरले आहेत. गुरुवारी काढण्यात आलेल्या रॅलीला रोखण्यासाठी पोलिसांनी बळाचा वापर केला असता, आंदोलन भडकले आणि नागरिकांनी सरकारी इमारती आणि वाहनांची जाळपोळ केली. यावेळी पोलिसांसोबत झालेल्या संघर्षात १९ नागरिकांचा मृत्यू झाला. इस्फहान, हमादान, बाबोल, देहलोरान, बाघमालेक आणि पायचान यासारख्या शहरांमध्ये निदर्शक रस्त्यावर उतरले आहेत. सर्वोच्च नेते अली खामेनी यांच्याविरोधात घोषणा देत, निर्वासित राजकुमार रेझा पहलवी यांना पाठिंबा दिला. निदर्शकांनी अनेक महामार्ग अडवले; तसेच राजधानी तेहरानमध्येही हजारो लोक रस्त्यावर उतरले आहेत. सुन्नी धर्मगुरू मोलवी अब्दोल हमीद म्हणाले की, खराब राहणीमान आणि सत्ताधाऱ्यांविरोधात रोष उठावाला चालना देत आहे. प्रसिद्ध चित्रपट निर्माते जाफर पनाही यांनी अशांततेचे वर्णन 'इतिहास पुढे नेण्यासाठी' असे केले आहे. ◆(वृत्तसंस्था)



### अर्थव्यवस्था डबघाईस

इराणचे चलन, रियाल, अमेरिकन डॉलरच्या तुलनेत इतिहासातील सर्वात कमी पातळीवर घसरले आहे. एका अमेरिकन डॉलरची किंमत १.४ दशलक्ष रियालवर पोहोचली आहे. आयात करण्यात येणाऱ्या वस्तूंचे दर गगनाला भिडल्याने महागाईने उच्चांक गाठला. अमेरिका आणि पाश्चात्य निर्बंधांमुळे इराणची अर्थव्यवस्था सध्या डबघाईस आली. पर्यायाने दैनंदिन वस्तूंच्या वाढत्या किमतींमुळे जनतेमध्ये व्यापक संताप निर्माण आहे. ■

### विद्यार्थी उतरले आंदोलनात

निदर्शने आता विद्यापीठांमध्ये पसरली आहेत आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी आंदोलनात सहभागी झाले. तेहरान विद्यापीठातील विद्यार्थी नेत्या सारीरा करीमी यांना त्यांच्या घरातून ताब्यात घेण्यात आले. त्यामुळे विद्यार्थी भडकले असून त्यांनी सरकारविरोधात दंड थोपटले. ■

### करवाढीच्या निर्णयाने संतापाचा कडेलोट

अर्थव्यवस्था सावरण्यासाठी इराणी सरकारने नवीन वर्षात जनतेवरील कर वाढवण्याची घोषणा केली होती. यामुळे आधीच महागाईने त्रस्त असलेल्या नागरिकांमध्ये संतापाची लाट पसरली. विशेष असे की, आंदोलनाचे नेतृत्व कुणाकडे नसताना सामान्य नागरिकांनी सुरू केलेल्या आंदोलनाने इराणचे सर्वोच्च नेते अली खामेनी यांच्या अडचणी वाढल्या आहेत. ■



# नवीन वर्षात रेल्वे वेळापत्रकात बदल

## प्रवाशांच्या सोयीसाठी ६२ वेगवान गाड्या

◆ **नवी दिल्ली, १ जानेवारी**
२०२६ या नवीन वर्षात रेल्वे प्रवासाची योजना आखताना एक्स्प्रेस आणि मेमू गाड्यांचे वेळापत्रक नक्की तपासा. रेल्वे ट्रेनचा वक्तशीरपणा सुधारण्यासाठी आणि वाहतूक सुरळीत करण्यासाठी नवीन वर्षाच्या १ जानेवारी २०२६ पासून वेळापत्रकात बदल करण्यात आले आहेत. घराबाहेर पडण्यापूर्वी वेळापत्रकांचे पुनरावलोकन करण्याचे आवाहन प्रवाशांना करण्यात आले आहे.

या नवीन वेळापत्रकामुळे सुमारे ६२ एक्स्प्रेसचा वेग वाढणार आहे. या बदललेल्या वेळापत्रकात पुणे आणि मुंबईतील अनेक ट्रेनचा समावेश आहे. रेल्वेकडून मिळालेल्या माहितीनुसार, अनेक प्रमुख प्रवासी ट्रेनच्या वेळेत बदल करण्यात आले आहेत, जे १ जानेवारी २०२६ पासून लागू होतील. क्रॉसिंगवरील ताण कमी करण्यासाठी आणि एकाच विभागात अनेक ट्रेन एकाच वेळी चालवण्यासाठी हे पाऊल उचलण्यात येत आहे. एकाच विभागात जास्त ट्रेन धावतात तेव्हा विलंब होण्याची शक्यता वाढते. नवीन वर्षाच्या वेळापत्रकात बदल हा या समस्येवर उपाय म्हणून केला जात आहे.

प्रवाशांच्या सोयी लक्षात घेऊन हा बदल करण्यात आल्याचे सांगितले जात आहे. यामुळे अनेक ट्रेनचा विलंब पूर्णपणे कमी होईल. प्रवाशांचा प्रतीक्षा वेळ बराच कमी होईल. रेल्वेच्या म्हणण्यानुसार, काही ट्रेन आता पूर्वीपेक्षा लवकर निघतील. यात्व्यतिरिक्त अनेक ट्रेनचे आगमन आणि सुटण्याच्या वेळा बदलण्यात आल्या आहेत.

प्रवाशांना एनटीईएस, आयआरसीटीसी संकेतस्थळ, रेल्वे हेल्पलाइन आणि जवळच्या स्टेशनवरून माहिती मिळू शकते. या बदलामुळे हावडा, शालिमार, टाटानगर आणि राउरकेला येथून निघणाऱ्या आणि थांबणाऱ्या २४ ट्रेन ५ ते १५ मिनिटे ते अर्ध्या तासाचा बदल करण्यात आला आहे. रेल्वेने स्पष्ट केले की, हे सुधारित वेळापत्रक ऑपरेशनल सोयीसाठी आणि तांत्रिक कारणांसाठी लागू केले जात आहे. ◆(वृत्तसंस्था)

# राजस्थान सीमेवर घुसखोराला अटक

◆ **जैसलमेर, १ जानेवारी**
जैसलमेर जिल्ह्यातील नाचना आणि नोक सेक्टरजवळ भारतीय सीमेत बेकायदेशीरपणे घुसण्याचा प्रयत्न करताना सीमा सुरक्षा दल अर्थात् बीएसएफने गुरुवारी पहाटे इशरत सैय्यद या ३५ वर्षीय पाकिस्तानी नागरिकाला अटक केली. अटक केलेला पाकिस्तानी नागरिक पंजाब प्रांतातील सरगोधा जिल्ह्यातील रहिवासी आहे. त्याच्याजवळ पाकिस्तानी चलन, चाकू आणि इतर वस्तू सापडल्या. बीएसएफने घुसखोराला पुढील तपासासाठी नोक पोलिसांना सोपवले. पोलिस आणि सुरक्षा संस्था या प्रकरणाचा तपास करत आहे.



**पूंछमध्ये आयईडी, मादक पदार्थ जप्त**

नवीन वर्षाच्या पहिल्याच दिवशी, जम्मू आणि काश्मीरमधील पूंछ जिल्ह्यातील भारत-पाकिस्तान नियंत्रण रेषेवरील खारी सेक्टरमध्ये ड्रोनचा वापर करून सीमेपलीकडून एक संशयास्पद बॅग टाकण्यात आली. ही हालचाल लक्षात येताच, सुरक्षा दलाने बॅग जप्त केली. त्यात तीन पॅकेटमध्ये मादक पदार्थ आणि एक आयईडी आढळून आले. यानंतर या भागात व्यापक प्रमाणात शोधमोहिम सुरू करण्यात आली. या घटनेमागील कट उलगडण्यासाठी सुरक्षा दलाने तपास सुरू केला आहे. ◆(वृत्तसंस्था)

## कुख्यात नक्षलवादी चकमकीत ठार

◆ **पाटणा, १ जानेवारी**
बिहारच्या बेगुसराय जिल्ह्यात सुरक्षा कर्मचाऱ्यांशी झालेल्या चकमकीत शिरावर ५० हजार रुपयांचे बक्षीस असलेला एक नक्षलवादी ठार झाला. त्याच्या दोन साथीदारांना अटक करण्यात आली आहे, अशी माहिती पोलिसांनी दिली. मृत व्यक्तीची ओळख प्रतिबंधित सीपीआय-माओवादीच्या उत्तर-बिहार केंद्रीय विभागीय समितीचा सचिव दयानंद मलाकार अशी पटली आहे. १४ हून अधिक गुन्हेगारी प्रकरणांमध्ये पोलिसांना हवा असलेला दयानंद मलाकार उर्फ छोटू नावाचा नक्षलवादी, बुधवारी सायंकाळी बेगुसरायच्या तेघरा परिसरात एसटीएफ आणि जिल्हा पोलिसांच्या संयुक्त पथकाशी झालेल्या चकमकीत ठार झाला, असे बिहार पोलिसांच्या विशेष कृती दलाने (एसटीएफ) जारी केलेल्या निवेदनात म्हटले आहे. मलाकार आपल्या साथीदारांसह लपला होता. ◆(वृत्तसंस्था)

# कोलकाता ते गुवाहाटी धावणार पहिली वंदे भारत स्लीपर ट्रेन

◆ **नवी दिल्ली, १ जानेवारी**
देशाला पहिली वंदे भारत स्लीपर ट्रेन मिळणार आहे. भारतीय रेल्वेने या स्लीपर ट्रेनचा मार्ग जाहीर केला आहे. ही वंदे भारत ट्रेन गुवाहाटी आणि कोलकाता दरम्यान धावेल. पंतप्रधान नरेंद्र मोदी या ट्रेनला हिरवा झेंडा दाखवतील. ही ट्रेन १७ किंवा १८ जानेवारी रोजी सुरू होण्याची अपेक्षा आहे.

रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी देशातील पहिल्या वंदे भारत स्लीपर ट्रेनची माहिती दिली आहे.

वंदे भारत स्लीपर ट्रेनमध्ये प्रवास करणाऱ्या प्रवाशांना आरामदायी बेड मिळतील, ज्यामुळे त्यांना लांब प्रवासादरम्यान प्रवास करताना झोपता येईल.

देशात चालणाऱ्या मागील वंदे भारत ट्रेनमध्ये खुर्चीची जागा होती, ज्यामुळे प्रवाशांना फक्त बसून प्रवास करता येत असे. ◆(वृत्तसंस्था)

### वंदे भारत स्लीपर ट्रेनचे भाडे किती असेल?

भारतीय रेल्वेने वंदे भारत स्लीपर ट्रेनचा मार्ग जाहीर केला आहे आणि भाडे जाहीर केले आहे. ही स्लीपर ट्रेन गुवाहाटी आणि हावडा दरम्यान धावेल. या ट्रेनमध्ये ३एसीचे भाडे २,३०० आहे, ज्यामध्ये जेवणाचा समावेश आहे. २एसी प्रवाशांसाठी भाडे ३,००० आहे आणि १ एसी प्रवाशांसाठी भाडे ३,६०० आहे. ■

## विप्रोच्या १९२ कोटींच्या ठेवी गोठवल्या

◆ **नवी दिल्ली, १ जानेवारी**
विन्झो या रिअल मनी ऑनलाईन गेमिंग ॲपच्या अकाऊंटिंग कंपनीवर छापेमारी करीत १९२ कोटी रुपयांच्या नवीन बँक ठेवी, म्युच्युअल फंड आणि मुदत ठेवी गोठवल्या, अशी माहिती अंमलबजावणी संचालनालय अर्थात् ईडीने गुरुवारी दिली.

अंकेक्षकाच्या कार्यालयीन ठिकाणांवर ३० डिसेंबर रोजी ही छापेमारी करण्यात आली. छापेमारीदरम्यान झेडओ गेम्स प्रा. लि.कडे (विन्झो प्रा. लि.ची पूर्ण मालकीची भारतीय उपकंपनी) असलेल्या सुमारे१९२ कोटी रुपयांच्या गुन्हेगारीतून मिळवलेल्या उत्पन्न बेकायदेशीर सावकारी प्रतिबंधक कायद्याच्या अंतर्गत गोठवण्यात आले, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. हा निधी बँक शिल्लक, मुदत ठेवी आणि म्युच्युअल फंडच्या स्वरूपात आहे. बंगळूरू कार्यालयात चौकशी केल्यानंतर नोव्हेंबरमध्ये विन्झोचे संस्थापक सौम्यसिंह राठोड आणि पवन नंदला ईडीने अटक केली होती. बंगळूरू न्यायालयाने काही दिवसांपूर्वी सौम्यसिंह राठोडला जामीन दिला होता, तर नंदला दिलासा देण्यास नकार दिला होता. ईडीने या प्रकरणात नोव्हेंबरमध्ये पहिल्या टप्प्यात छापेमारी केली होती आणि विन्झो गेम्सच्या मालकीचे सुमारे ५०५ कोटी रुपयांचे रोखे, मुदती ठेवी आणि म्युच्युअल फंड गोठवण्यात आल्याची माहिती दिली होती. ◆(वृत्तसंस्था)

# अणु प्रतिष्ठानांच्या यादींची देवाणघेवाण

## भारत-पाकिस्तानने सोपविली यादी

◆ **नवी दिल्ली, १ जानेवारी**
भारत आणि पाकिस्तानमधील दीर्घकाळ चाललेल्या परंपरेनुसार, दोन्ही देशांनी नवीन वर्षाच्या पहिल्या दिवशी त्यांच्या अणु प्रतिष्ठानांच्या यादींची देवाणघेवाण केली.

हे पाऊल द्विपक्षीय कराराचा एक भाग आहे जो दोन्ही बाजूंना एकमेकांच्या अणु सुविधांवर कोणताही हल्ला करण्यापासून रोखतो. गेल्या वर्षी मे महिन्यात झालेल्या लष्करी संघर्षानंतर दोन्ही शेजारी देशांमधील संबंध ताणलेले असताना ही देवाणघेवाण झाली आहे.

३१ डिसेंबर १९८८ रोजी दोन्ही देशांनी या करारावर स्वाक्षरी केली होती आणि २७ जानेवारी १९९१ रोजी तो लागू झाला. कराराच्या तरतुदींनुसार, दोन्ही देशांनी प्रत्येक कॅलेंडर वर्षाच्या १ जानेवारी रोजी त्यांच्या अणु प्रतिष्ठानांची माहिती सामायिक करणे आवश्यक आहे. ही देवाणघेवाण नवी दिल्ली आणि इस्लामाबादमधील राजनैतिक माध्यमांद्वारे एकाच वेळी झाली.

परराष्ट्र मंत्रालयाने आपल्या निवेदनात म्हटले आहे की, भारत आणि पाकिस्तानने गुरुवारी नवी दिल्ली आणि इस्लामाबादमध्ये एकाच वेळी राजनैतिक माध्यमांद्वारे भारत आणि पाकिस्तान यांच्यातील अणु प्रतिष्ठापने आणि सुविधांवरील हल्ल्यांना प्रतिबंधित करण्याच्या करारांतर्गत समाविष्ट असलेल्या अणु प्रतिष्ठापने आणि सुविधांची यादीची देवाणघेवाण केली. दोन्ही देशांमधील अशा यादींची ही सलग ३५ वी देवाणघेवाण आहे. पहिली १ जानेवारी १९९२ रोजी झाली होती. ही परंपरा तीन दशकांहून अधिक काळापासून चालू आहे, जी दोन्ही देशांच्या वचनबद्धतेचे प्रतीक आहे. गेल्या वर्षीच्या लष्करी घटना असूनही, यादींची ही देवाणघेवाण एक सकारात्मक चिन्ह म्हणून पाहिली जात आहे. ◆(वृत्तसंस्था)



शनिवारी, ३ जानेवारीला पौष पौर्णिमेपासून प्रयागराज येथील त्रिवेणी संगमावर माघ मेळ्याला प्रारंभ होणार आहे. याच दिवशी पहिले पवित्र स्नान होईल. १५ फेब्रुवारीपर्यंत म्हणजे महाशिवरात्रीपर्यंत माघ मेळा सुरू राहणार आहे. या मेळ्यासाठी उत्तर प्रदेश सरकारने जय्यत तयारी केली असून भाविकांसाठी संगमेतीरी हजारो तंबू तयार केले आहेत

## चित्रपट वार्ता

### दोन बदलांसह 'धुरंधर' पुन्हा प्रदर्शित

**मुंबई** : रणवीरसिंह अभिनित 'धुरंधर' चित्रपटाच्या प्रदर्शनाला जवळपास एक महिना पूर्ण होत आहे. चित्रपटाने अजूनही बॉक्स ऑफिसवर आपली मजबूत पकड कायम ठेवली आहे. पण आता एक महिन्यानंतर चित्रपटात काही बदल करण्यात आले आहेत. हे बदल माहिती आणि प्रसारण मंत्रालयाकडून मिळालेल्या निर्देशांनंतर झाले आहेत. माहिती आणि प्रसारण मंत्रालयाने चित्रपटातील दोन शब्द म्यूट करण्यास आणि एका संवादात बदल करण्यास सांगितले होते, त्यानंतर नवीन सुधारित चित्रपट १ जानेवारीपासून जगभरातील थिएटरमध्ये प्रदर्शित करण्यात आला आहे. देशभरातील चित्रपटगृहांना ३१ डिसेंबर रोजी वितरकांकडून एक ईमेल मिळाला, ज्यात त्यांना सूचित करण्यात आले होते की ते चित्रपटाचा डीसीपी बदलत आहेत. म्यूट केलेल्या शब्दांपैकी एक 'बलूच' हा शब्द आहे. ■



### प्रभाससोबत झळकणार तृप्ती डिमरी

**हैदराबाद** : अभिनेता प्रभासचा 'स्पिरिट' हा चित्रपट येणार असून यात मुख्य अभिनेत्री म्हणून तृप्ती डिमरी झळकणार आहे. निर्माता संदीप रेड्डी वांगा यांच्या 'स्पिरिट' चित्रपटाचा फर्स्ट लुक समोर आला आहे. चित्रपटाच्या या अधिकृत पोस्टरमध्ये प्रभास आणि तृप्ती डिमरीचा लुक रिव्हील करण्यात आला आहे. दोन्ही कलाकारांचा लुक तीव्र लुक पाहायला मिळत आहे. दिग्दर्शक संदीप रेड्डी वांगा यांनी त्यांच्या इंस्टाग्रामवर पोस्टर शेअर करत चाहत्यांना नवीन वर्षाच्या शुभेच्छा दिल्या. पोस्टरमध्ये प्रभास आणि तृप्ती एका खिडकीजवळ उभे दिसत आहेत. प्रभास लांब केस, दाट दाढी आणि मिशांसह शर्टलेस दिसत आहे. त्याच्या शरीरावर जखमांचे निशाण आहेत आणि खांद्यावर, हातावर आणि पाठीवर अनेक पट्ट्या बांधलेल्या आहेत. चित्रपटाचा नेमका विषय यातून स्पष्ट होत नसला तरी प्रभासच्या चाहत्यांसाठी त्याचे चित्रपट उत्सुकतेचाच विषय असतात. ■



### ए. आर. रहमानचे अभिनयात पदार्पण



**हैदराबाद** : ऑस्कर विजेते संगीतकार ए. आर रहमान लवकरच एका नवीन अवतारात प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहेत. दशकांपासून आपल्या संगीत प्रतिभेने प्रेक्षकांना मोहित करणारे रहमान पहिल्यांदाच कॅमेऱ्यासमोर अभिनय करताना दिसतील. प्रभुदेवा अभिनीत मूनवॉक या चित्रपटातून ते अभिनय क्षेत्रात पदार्पण करणार आहेत. मूनवॉक हा मनोज एन एस दिग्दर्शित आणि बिहाइंडवुड्स प्रॉडक्शन निर्मित एक विनोदी चित्रपट आहे. हा चित्रपट २०२६ रोजी प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे. विशेष म्हणजे, या चित्रपटात ए. आर रहमान एंग्री यंग दिग्दर्शकाची भूमिका साकारतील. या चित्रपटात त्यांनी पाच गाणीही गायली आहेत. आधी ते गाणी गाण्यापुरते झळकणार होते. मात्र, त्यांचा गाण्यातील अभिनय सर्वांनाच आवडला आणि दिग्दर्शकाने थेट त्यांना अभिनयाची विचारणा केली. त्यांनी ती मान्य केली. ■

# देशाला यावर्षी मिळणार आठ जलदगती महामार्ग

## चारही दिशांना जोडणार ● नूतन वर्षातील नव्या महत्त्वाकांक्षी योजना

◆ **नवी दिल्ली, १ जानेवारी**
२०२६ भारताच्या आधुनिक पायाभूत सुविधांच्या इतिहासात मैलाचा दगड ठरणार आहे. या वर्षात देशाला आठ नवीन अत्याधुनिक जलदगती महामार्ग मिळणार आहेत.

यामुळे भारतातील रस्ते प्रवास, व्यापार, लॉजिस्टिक्स आणि आर्थिक विकासाला अभूतपूर्व गती मिळणार आहे. उत्तर-दक्षिण आणि पूर्व-पश्चिम दिशांना जोडणाऱ्या या एक्स्प्रेसवे नेटवर्कमुळे औद्योगिक केंद्रे, बंदरे, धार्मिक स्थळे आणि पर्यटन हब यांच्यातील अंतर मोठ्या प्रमाणात कमी होणार आहे. तासांचा प्रवास काही मिनिटांत पूर्ण होईल, असा दावा करण्यात येत आहे.

**असे आहेत प्रस्तावित महामार्ग**

☞ १) **दिल्ली-मुंबई जलदगती महामार्ग**: देशातील सर्वात मोठ्या रस्ते प्रकल्पांपैकी एक असलेला हा महामार्ग सुमारे १,३५५ किमी लांबीचा आहे. दिल्ली, हरयाणा, राजस्थान, मध्यप्रदेश, गुजरात आणि महाराष्ट्रातून जाणारा हा मार्ग ६ ते ८ लेनचा असून भविष्यात १२ लेनपर्यंत विस्ताराची योजना आहे.

☞ २) **चेन्नई-बंगळुरू हरित जलदगती महामार्ग**: दक्षिण भारतातील दोन मोठ्या आर्थिक केंद्रांना जोडणारा २५८ किमी लांबीचा हा महामार्ग आहे. यामुळे कॉरिडोर आणि पोर्ट-आधारित लॉजिस्टिक्सला मोठी चालना मिळेल.

☞ ३) **रायपूर-विशाखापट्टणम महामार्ग**: ४६४ किमी लांबीचा, सहा लेनचा हा इकॉनॉमिक कॉरिडोर छत्तीसगड, ओडिशा आणि आंध्रप्रदेश या तीन राज्यांना जोडणार आहे. मध्य भारत ते पूर्व किनाऱ्यावरील बंदरांपर्यंत व्यापार जलद होईल.


☞ ४) **अहमदाबाद-धोलेरा महामार्ग**: गुजरातमधील गुंतवणूक हब धोलेरा एसआयआरला अहमदाबादशी जोडणारा १०९ किमी लांबीचा हा प्रकल्प औद्योगिक विकासासाठी महत्त्वाचा मानला जात आहे.

☞ ५) **दिल्ली-अमृतसर-कटरा महामार्ग** : दिल्लीच्या बहादुरगढ सीमेजवळून सुरू होणारा हा ६७० किमी लांबीचा जलदगती महामार्ग पंजाबमार्गे जम्मू-काश्मीरमधील कटरा येथे संपेल.

☞ ६) **दिल्ली-देहरादून महामार्ग** : सुमारे २१० किमी लांबीच्या या कॉरिडोरचा ट्रायल रन १ डिसेंबर २०२५ पासून सुरू झाला आहे. दिल्ली-देहरादून प्रवासाचा कालावधी ६ तासांवरून फक्त २.५ तासांपर्यंत कमी होणार आहे.

☞ ७) **गंगा महामार्ग (मेरठ-प्रयागराज)**: उत्तरप्रदेशातील ५९४ किमी लांबीचा हा ६ लेन एक्स्प्रेसवे १२ जिल्ह्यांतून जाणार आहे. प्रकल्पाचे सुमारे ९९ टक्के काम पूर्ण झाले असून, जानेवारी २०२६ मध्ये उद्घाटन होण्याची शक्यता आहे. यामुळे पश्चिम ते पूर्व यूपी प्रवास जलद होऊन व्यापार आणि पर्यटनाला चालना मिळेल.

☞ ८) **अमृतसर-जामनगर महामार्ग** : उत्तर-पश्चिम भारतातील महत्त्वाचा १,२५७ किमी लांबीचा इकॉनॉमिक कॉरिडोर भटिंडा, बाडमेर आणि जामनगरसारख्या ऊर्जा व औद्योगिक पट्ट्यांना जोडणार आहे. यामुळे अमृतसर-जामनगर प्रवासाचा वेळ २६ तासांवरून सुमारे १३ तासांपर्यंत कमी होईल. ◆(वृत्तसंस्था)



## मराठीवरून भाईंदर स्थानकावर तरुणाचा छळ

◆ **ठाणे, १ जानेवारी**
मुंबईच्या बाहेरील भाईंदर स्थानकावर गुरुवारी एका तरुणाने घोषणा केवळ इंग्रजी व हिंदीमध्येच का केल्या जात आहेत, मराठीत का नाही, असे विचारल्याबद्दल त्याला रेल्वे अधिकाऱ्यांनी ताब्यात ठेवून तीन तास त्रास दिला.

पश्चिम रेल्वेवर घोषणा तिन्ही भाषांमध्ये केल्या जातात, असे सांगत रेल्वे अधिकाऱ्यांनी हा दावा फेटाळून लावला.

जिग्नर पाटील असे नाव सांगणाऱ्या त्या तरुणाच्या म्हणण्यानुसार, त्याने 'मराठीचा वापर होत नाही' याबद्दल आपली तक्रार नोंदवण्यासाठी स्टेशन मास्तरकडे तक्रार वही मागितली. स्टेशन मास्तरने रागाने उत्तर दिल्याचे त्याने सांगितले. पाटीलने वाद घालणे सुरू ठेवताच रेल्वे सुरक्षा दलाला बोलावण्याची धमकी स्टेशन मास्तरने दिल्याचे म्हटले जाते.

मला स्टेशन मास्तरच्या खोलीत नेण्यात आले व तिथे सुमारे तीन तास थांबवून ठेवण्यात आले, असं त्यो तरुणाने सांगितले. ◆(वृत्तसंस्था)

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख...

# प्रश्न खूप झाले; उत्तरे शोधूया...

ऐतिहासिक व सांस्कृतिकदृष्ट्या समृद्ध असलेल्या सातारा नगरीत तब्बल ३२ वर्षांनी होत असलेल्या ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाला गुरुवारी सुरुवात झाली. गेल्या काही आठवड्यांपासून सुरू असलेल्या निवडणुकांच्या राजकारणाच्या रटाळ, काहीशा उद्वेगजनक आणि काहीशा निराशाजनक बातम्यांच्या गदारोळापासून मराठमोळ्या महाराष्ट्राचे लक्ष आता साहित्य आणि संस्कृतीच्या परंपरेची पालखी वाहून नेणाऱ्या सारस्वतांच्या मेळाव्याकडे लागले आहे. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतरचे हे दुसरे संमेलन असल्याने त्याची प्रतिष्ठा अधिक वृद्धिंगत झाली आहे. आजवरच्या जवळपास प्रत्येक साहित्य संमेलनात अनेक प्रकारचे वाद निर्माण झाले. यंदाचे ९९ वे साहित्य संमेलन त्यास अपवाद ठरले तर साहित्यशारदेची पालखी वाहून नेण्याची ही परंपरा शतकाच्या उंबरठ्यावर प्रगल्भ आणि समृद्ध झाली, असे म्हणता येईल.

'साहित्य संमेलन हा एक प्रचंड वार्षिक समारोह असून त्याच्या अध्यक्षपदासाठी सर्व महत्त्वाकांक्षी स्त्री-पुरुष साहित्यिकांची भयंकर चढाओढ लागत असे. साहित्याशी संबंध असलेल्या व नसलेल्यांचाही या चढाओढीत समावेश असल्याने त्यातून अनेकांच्या सात्त्विकपणाचे मुखवटे गळून पडतात', असा शेरा जुन्या पिढीतील प्रख्यात साहित्यकार व वात्रटिकाकार चिं. वि. जोशी यांनी १९५८ साली, 'अध्यक्षीय निवडणूक समारोह' या कथेतून मारला होता. वादाचा हा वारसा तेव्हापासूनच सुरू आहे, असे म्हणता येईल. त्या वाक्यातून वादाची मुळे उघडी पडली आणि तरीही ती हट्टाने खोलवर रुजत गेली. त्यामुळे संमेलनाआधी वाद झडावेत किंवा वाद निर्माण होण्याची शक्यताच नसेल तर कोणताही साहित्यबाह्य मुद्दा उकरून तो कुटत बसावा, असा जणू मराठी मनाचा बाणाच असला पाहिजे. राजकारणी नेत्यांनी संमेलनाच्या मंचावर हजेरी लावावी का, हा शाश्वत वादाचा मुद्दा, अन्य काहीच नसण्याच्या काळात पुढे येतो आणि वर्षानुवर्षे त्यावर चर्चा करूनही त्याचे उत्तर सापडत नाही, अशा चाचपडल्या अवस्थेतच अनेक संमेलने संपन्न होऊनही जातात. राजकारण आणि साहित्य व्यवहार यांच्यातील नात्याशी या वादाचे धागेदोरे जोडले गेलेले आहेत. 'मराठी भाषा फाटक्या वस्त्रांनिशी मंत्रालयाच्या दाराशी वर्षानुवर्षे ताटकळत उभी आहे,' अशी विदारक व लाजीरवाणी खंत कविवर्य कुसुमाग्रजांनी व्यक्त केली; त्यालादेखील आता चार दशकांहून अधिक काळ लोटला असावा. आता अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झाल्यानंतर मराठीची ती दुर्दैवी दशा संपून समृद्धीचे दिवस सुरू होतील, या अपेक्षांना धुमारे फुटत असताना होणाऱ्या या साहित्य संमेलनात त्या दृष्टीने काही समजूतदार, प्रगल्भ आणि परंपरेच्या नकोशा समजुतींना मूठमाती देणारे काही घडावे ही मराठीजनांची अपेक्षा आहे. अंगावरच्या फाटक्या वस्त्रांची जागा संपन्न वस्त्रांनी घ्यावी, डोईवरच्या काटेरी मुकुटाची जागा समृद्धीची प्रतीके मिरविणाऱ्या सुवर्णमुकुटाने घ्यावी आणि मराठीने मंत्रालयाच्या दारासमोर ताटकळत उभे राहण्याऐवजी मंत्रालयाने मराठीला सन्मानाच्या पायघड्या घालाव्यात, असे दिवस अभिजाततेमुळे येऊ घातले आहेत. त्या अपेक्षांचे सोने होईल, असे काही संमेलनाच्या मंचावरून घडेल, अशीही मराठीजनांची अपेक्षा आहे. उद्धाराच्या अपेक्षेने मायमराठीला मंत्रालयाच्या दाराशी ताटकळावे लागेल, हे वास्तव आपण कित्येक वर्षे नाईलाजाने स्वीकारलेले होते. त्यामुळे राजकारण किंवा सत्ताकारण आणि मराठी साहित्य व्यवहार हे एकमेकांपासून कधी स्वतःस अलग करतील, ही समजूत आता कायमची पुसली तरच त्यासंदर्भातील वादास मूठमाती मिळेल. तसे व्हावे हीदेखील माय मराठीची अपेक्षा आहे. कारण मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृतीची अभिवृद्धी व्हावी यासाठी प्रयत्न करण्याचा खरा काळ सुरू झाला आहे. असे प्रयत्न करण्याची भाषाप्रेमींची इच्छा सुफळ संपूर्ण झाली, तर संमेलनांच्या परंपरेला वेगळी झळाळी येईल, यात शंका नाही.

सुमारे दीडशे वर्षांपूर्वी १८७८ साली सुरू झालेल्या साहित्य संमेलनाच्या परंपरेने यंदा ९९ व्या संमेलनाचा टप्पा गाठला, पण अनेक वर्षांपासून समोर असलेल्या प्रश्नांची उत्तरे शोधण्यातच बराचसा काळ गेला आणि पुढे त्यात प्रश्नांची भरच पडत गेली. प्रत्येक संमेलनाच्या मावळत्या अध्यक्षाने नव्या अध्यक्षाच्या खांद्यावर प्रश्न आणि समस्यांचे ओझे सोपवावे आणि तीच परंपरा पुढेही जपली जावी, असेच साहित्य संमेलनांबाबत होत गेल्याचे दिसते. आजवरच्या साहित्य संमेलनांत केवळ प्रश्न मांडले गेले. ते अगदीच अनाठायी आहे असे नाही, पण एखाद्या तरी साहित्य संमेलनाने अगोदर मांडल्या गेलेल्या प्रश्नाची उकल केली असती, तर नव्या प्रश्नांची यादी मर्यादित ठेवता आली असती. यंदाच्या साहित्य संमेलनात उद्घाटनाच्या दिवशी, आज 'जागतिक प्रकाशन व्यवहारात मराठी प्रकाशन व्यवहार कोठे आहे,' या विषयावरील परिचर्चेतून या यादीत नवी भर पडणार असावी. आशेचा एक किरण म्हणजे उत्तराच्या शोधासाठी काहीसा अवसर या संमेलनाच्या आखणीने राखून ठेवला आहे. 'मराठी कोशवाङ्मयाच्या विस्ताराच्या दिशा' या विषयावर होणाऱ्या परिसंवादात पुन्हा मर्यादांवर चर्चा न होता, विस्ताराच्या नव्या दिशा शोधण्याचा आशादायक प्रयत्न व्हावा, अशी अपेक्षा गैर ठरणार नाही.

मराठी साहित्य, भाषा, कविता, लोकजीवन, संस्कृती, परंपरांच्या चिंतेत आता एका नव्या चिंतेची भर पडली आहे. 'मराठी समाज विचारभ्रष्ट होत आहे का, या अवस्थेतून त्याला बाहेर काढण्याची क्षमता आजच्या मराठी साहित्याकडे आहे का?' या परिसंवादातही नवा प्रश्नच मांडला गेला आहे. मुळात ते खरोखरीच तसे आहे की, साहित्यविश्वास तसा आभास होत आहे, याचा अगोदर शोध घ्यावा लागेल. त्यासाठी या विश्वात झपाट्याने पसरत चाललेल्या आभासी समजुतींच्या आहारी न जाता प्रामाणिकपणे व तटस्थतेने या प्रश्नाकडे पाहावे लागेल. कारण प्रश्नावर चर्चा करण्याची परंपरा कोठे तरी थांबली पाहिजे, शंभर साहित्य संमेलने भरवूनही केवळ प्रश्नांवरच चर्चा होत असेल, तर उत्तरांचा शोध सुरू केव्हा होणार आणि उत्तरे केव्हा सापडणार, याचाही विचार आता व्हायला हवा. 'मराठी साहित्यविश्वात भयकथा, रहस्यकथा, गूढकथांचा दुष्काळ आहे का' हाही एक चर्चेचा विषय या निमित्ताने मंचावर येणार आहे. जुन्या पिढीतील काही नामवंत लेखकांमुळे या साहित्य प्रकाराने मराठी साहित्यविश्वात आपले स्थान निर्माण केले होते, हे खरेच आहे. त्यानंतर ती परंपरा फारशी जपली गेली नाही, हेही खरे आहे. त्यामुळे 'दुष्काळ आहे' हे या प्रश्नावरील उत्तर असणार हेदेखील ओघानेच येते. मग पुन्हा त्या प्रश्नावरच चर्चा करण्यात काय हशील आहे? उलट, या दुष्काळमुक्तीसाठी संमेलनाचा मंच काय करणार त्यावर या चर्चेतून विचारमंथन व्हायला हवे. तसे होईल ही अपेक्षा करण्यात गैर नाही.

'मागे वळून पाहणे' ही मराठी संस्कृतीची सवय आहेच. ती चांगली आहे यातही शंका नाही. पण प्रत्येक इतिहास हा भविष्याची दिशा दाखविणारा ठरतो, असे म्हटले जाते. मागे वळून पाहिल्यानंतर जे काही दिसते, त्यापासून शिकून पुढच्या वाटा अधिक मोकळ्या करण्याच्या मानसिकतेची जोड या सवयीला मिळाली पाहिजे. स्त्री चळवळीच्या ५० वर्षांच्या वाटचालीकडे मागे वळून पाहताना, पुढच्या वाटचालीला संमेलनातून काय दिशा मिळते, याचीही मराठीजनांस उत्सुकता आहे. या चर्चेकडून त्या उत्तराची अपेक्षा आहे. कारण अभिजात दर्जा मिळाल्यानंतरच्या मराठीसमोरील संधी आणि आव्हानांची चर्चाही या संमेलनाच्या निमित्तनने होऊ घातली आहे. हा केवळ मराठी भाषेसमोरील आव्हानांचा किंवा संधींचा मुद्दाच नाही. तो मराठी संस्कृतीचादेखील मुद्दा आहे. मराठी संस्कृतीची जोपासना करणाऱ्या घटकांत मराठी भाषेचा- मग ती बोली भाषा असो की लिखित भाषा- मुद्दा महत्त्वाचा आहे. प्रत्येक दहा मैलावर भाषेचा लहेजा बदलतो असे म्हणतात; तरीही मराठी संस्कृतीचा एकसंधपणा मात्र टिकून असतो. तो तसाच राहिला पाहिजे, यासाठी भाषेची लय, लहिजा यांचे सारे सौंदर्य जपून आणि प्रत्येक लहेजाचा आदर राखून संस्कृतीचे संवर्धन व्हावे यासाठीही संमेलनांच्या मंचावर उत्तर शोधले गेले पाहिजे. प्रश्न अनेक आहेत, त्याची चर्चा करण्याची परंपरा आता संपावी आणि उत्तरांचा व उपायांचा शोध सुरू व्हावयास हवा. त्यासाठी शंभराव्या संमेलनाच्या उंबरठ्यावर उभे राहून त्याचा सुमुहूर्त करावयास हरकत नाही.

---

## प्रासंगिक

**कांचन गडकरी**

# सेवासदन : शिक्षण सेवेचे समृद्ध शतक

**दि. २ जानेवारी २०२६ रोजी सेवासदन शिक्षण संस्था १०० व्या वर्षात पदार्पण करीत आहे. त्यानिमित्त संस्थेच्या अध्यक्ष कांचन गडकरी यांचा लेख...**

> सेवासदन संस्थेचा भाग होणे, हा माझ्या सार्वजनिक जीवनातील समृद्ध टप्पा आहे. रमाबाई रानडे यांच्या विचारांचा आणि कार्याचा वारसा चालविणाऱ्या संस्थेचे नेतृत्व करणे, हे आपणच एका शाळेत प्रवेश घेण्यासारखे होते. अ. रा. गोखले-सुशीलाबाई गोखले यांच्या संस्कारात वाढलेल्या शिक्षण संस्थेमध्ये प्रवेश घेऊन माझ्या आयुष्याचा एक नवा अध्याय सुरू झाला. अनेक ऋतू बघितलेले सेवासदन नावाचे एक भव्य वृक्ष अन् त्याची सावलीही आता १०० वर्षांची होतेय. त्या वृक्षाच्या सावलीत काम करणे, हा मी माझाच गौरव समजते.

२००७ पासून मी संस्थेची अध्यक्ष आहे. पूर्वी कार्यकारिणीत होते; संस्थेत सक्रिय नव्हते. बापूसाहेब भागवत, वासंती भागवत आणि रोहिणी गोडबोले यांच्या आग्रहामुळे संस्थेत महत्त्वाची जबाबदारी स्वीकारली. पुढच्या काळात ज्युनियर कॉलेज, सीबीएसई शाळा, सिनियर कॉलेज, एनडीए अभ्यासक्रम सुरू झाला. परिसर सुंदर झाला. शाळेची लोकप्रियता वाढली. १०० वर्षांच्या या प्रवासात संस्थेने अफलातून प्रगती केली, पण हा मार्ग सोपा नव्हता. अनेक संघर्षांवर, अडचणींवर मात करून हा टप्पा गाठला आहे. मी अध्यक्षपदाची जबाबदारी स्वीकारली तेव्हा माझ्यासाठी एक व्यासपीठ तयार होते. अ. रा. गोखले यांनी शाळा सुरू केली, पण त्यांच्यासह जुन्या लोकांनी अतिशय कष्टातून सेवासदन नावाचे कुटुंब उभे केले होते. मी त्या कुटुंबात नव्याने सामील झाले होते. संस्थेतील जुनी-जाणती मंडळी आजही संस्थेसाठी झटत आहेत; त्यांनी नवे बदल करण्यासाठी, नवे उपक्रम सुरू करण्यासाठी मोलाची साथ दिली. त्यामुळे आज संस्थेने जे भव्य रूप धारण केले आहे, त्याचे श्रेय त्याच मंडळींनी जाते.

माझ्या सासुबाई कै. भानुताई गडकरी यांनी संस्थेतून मॉंटेसरीचे ट्रेनिंग घेतले होते. 'टीम वर्क' हे या संस्थेचे सर्वांत वैशिष्ट्य आहे. कुठलीही जबाबदारी पालकत्व घेऊन करण्याची कमालीची वृत्ती संस्थेत काम करणाऱ्या प्रत्येकाची आहे. एकमेकांबद्दलचा विश्वास, आपुलकी आहे. याचमुळे संस्था एवढ्या वर्षांचा समृद्ध प्रवास करू शकली. एखाद्या संस्थेतील प्रत्येक व्यक्ती शतसंवत्सरी सोहळा उत्तमरीत्या साजरा करण्याचा ध्यास घेऊन कार्य करीत असेल, तर यापेक्षा मोठे यश तरी कुठले असावे. मी अनेक संस्थांमध्ये काम केले, पण शैक्षणिक संस्थेचे काम केलेले नव्हते. त्यातही रमाबाई रानडे यांच्या विचारांचा वारसा घेऊन पुढे जाणाऱ्या संस्थेचे नेतृत्व करायचे म्हणजे आव्हानच होते. रमाबाई रानडे यांच्याबद्दल प्राथमिक माहिती मला होती. दरम्यानच्या काळात त्यांच्या जीवन चरित्रावरील पुस्तकं वाचली. त्यामुळे सोपे झाले. महत्त्वाचे म्हणजे संस्थेतील प्रत्येकाने मला समजून घेतले आणि सामावून घेतले. माझ्यापेक्षा बापूसाहेब आणि वासंती भागवत वयाने आणि अनुभवाने मोठे आहेत. त्यांची मला उत्तम साथ मिळतेय. सेवासदन हा तर या मंडळींचा श्वास आहे. सतत काहीतरी नवीन करण्याचा ध्यास त्यांच्या मनात असतो. रमाबाई रानडे शिक्षण-प्रबोधन पुरस्कार सुरू करण्याची कल्पना बापूसाहेब भागवतांनीच मांडली. हा पुरस्कार एखाद्या व्यक्तीला न देता शिक्षण क्षेत्रात समर्पित वृत्तीने काम करणाऱ्या संस्थेला देण्याचा निर्णय झाला. रमाबाई रानडे यांचे काम खूप मोठे आहे, पण त्यांच्या नावाने एकही पुरस्कार नव्हता. २०१६ पासून आम्ही हा पुरस्कार सुरू केला. पहिल्या वर्षी अर्ज मागवले, पण नितीनजींनी आम्हाला अर्ज मागवण्यापेक्षा चांगल्या संस्थांचा शोध घेण्याचा सल्ला दिला. हा पुरस्कार शिक्षण क्षेत्रात प्रतिष्ठेचा मानला जातो.

बदलत्या काळानुसार संस्थेतही अनेक नवे बदल झालेत. डिजिटल शिक्षण देणे, स्मार्ट बोर्ड उपलब्ध करून देण्यात आले. उत्तम नागरिक घडविण्याच्या दृष्टीने जे जे काही करता येईल, ते संस्था करीत असते. त्यामुळेच शिक्षक-पालकांमध्ये उत्तम संवाद आहे. बहुतांश मुलं गरीब कुटुंबातील आहेत. त्यामुळे त्यांच्या पालकांचंही भावनिक पालकत्व घेण्याची जबाबदारी संस्थेतील प्रत्येकाने स्वीकारली आहे. पाचवी ते दहावी या सहा वर्षांच्या कालावधीत प्रत्येक वर्षी एक स्तोत्र विद्यार्थ्यांना पाठ झाले पाहिजे, असा आमचा प्रयत्न असतो. या स्तोत्रांचे स्वर, संस्कार आणि महत्त्व विद्यार्थ्यांच्या माध्यमातून त्यांच्या कुटुंबापर्यंत पोहोचत असते. काही मुलांचे पालक अशिक्षित आहेत, मोलमजुरी केल्याशिवाय कुटुंबाचा गाडा रेटणे शक्य नाही. अशा घरांमध्ये संध्याकाळी दिवे लागल्यानंतर, घरात कुणी पाहुणे आल्यानंतर मुलं मोठ्यांना वाकून नमस्कार करतात, तेव्हा खऱ्या अर्थाने संस्थेतून मिळणाऱ्या संस्काराचे दर्शन पालकांना घडते.

लोणावळ्यातील मनशक्ती केंद्राचे कार्यक्रम सेवासदन संस्थेतील विद्यार्थी, त्यांचे पालक आणि शिक्षकांसाठी आयोजित केले जात आहेत. उत्तम नागरिक, आदर्श शिक्षक आणि जबाबदार पालक घडविण्याच्या दृष्टीने हा अतिशय महत्त्वाचा उपक्रम ठरणार आहे. कार्यशाळांमध्ये व्यक्तिमत्त्व विकास, बाल मानसशास्त्र, ज्ञान-विज्ञान, एकाग्रता यांचे प्रशिक्षण दिले जाते.

सेवासदनने मुलींची सैनिकी शाळा सुरू करायला हवी, अशी कल्पना बापूसाहेब भागवत यांनी मांडली आहे. नाशिकला अशी शाळा आहे, पण इकडे नाही. त्यामुळे आपल्या भागातील मुलींना सैनिकी प्रशिक्षण देण्याच्या दृष्टीने हे अत्यंत महत्त्वाचे ठरणार आहे. संस्थेच्या कार्यकारिणीत, शिक्षकांमध्ये, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांमध्ये कुणाचाही वाढदिवस असेल तर त्याने एक पुस्तक शाळेला द्यायचे, असा उपक्रम आम्ही राबवितो.

२ जानेवारी २०२५ पासून पुढचे वर्ष सेवासदन संस्था शतसंवत्सरी वर्ष साजरे करणार आहे. हे वर्ष नव्या निर्धाराचे, नव्या निश्चयाचे असणार आहे. वर्षभरात वैविध्यपूर्ण उपक्रमांच्या माध्यमातून पुढचा प्रवास सुरू होणार आहे. या प्रवासातील प्रत्येक टप्पा समृद्ध व्हावा, यादृष्टीने आम्हाला पाऊल टाकायचे आहे. विद्येमुळे विनम्रता येते; विनयामुळे पात्रता येते. पात्रतेमुळे धन प्राप्त होते, धनातून धर्म घडतो आणि धर्मामुळे सुख मिळते. शिक्षण सेवा हा आमचा धर्म आहे आणि या धर्माचे योग्यरीत्या पालन करून आम्हाला आदर्श निर्माण करायचा आहे.

'विद्या ददाति विनयं, विनयाद्याति पात्रताम् ।
पात्रत्वाद्धनमाप्नोति, धनाद्धर्मं ततः सुखम् ॥'

(अध्यक्ष, सेवासदन शिक्षण संस्था)

---

## वेध

**प्रफुल्ल व्यास**

# श्रद्धेच्या पुनर्जागरणाचा नवा अध्याय

इंग्रजी नववर्षाच्या स्वागतालाही आता केवळ पार्ट्या, मद्य आणि जल्लोष इतकाच अर्थ उरलेला नाही तर वर्धेसारख्या ठिकाणी सामूहिक हनुमान चालीसा, सुंदरकांड, नामस्मरण, भजन-कीर्तन यांचा नाद उमटू लागला आहे. अयोध्या असो वा शिर्डी, शेगाव, तुळजापूर, अक्कलकोट, तिरुपती बालाजी आदी धार्मिक स्थळांवर नववर्षाच्या पहिल्या दिवशी भाविकांची उसळलेली गर्दी हे केवळ दर्शन किंवा मौजमजा, सहल नव्हे तर सश्रद्धेचे प्रतीक आहे. आज जी पिढी साठीत आहेत त्यांनी आपल्या उमेदीच्या काळात (अपवाद वगळता) आमचा देवापेक्षा आमच्या हातावर विश्वास सांगत 'दोन हस्तक आणि एक मस्तक' सांगितले जात होते. त्याही पुढे जाऊन अंधश्रद्धेलाही त्यांच्याच काळात थोडी चेतना मिळाली होती. विज्ञानाची कास धरत श्रद्धेला मागासपणा म्हटले जाऊ लागले होते. काळाच्या ओघात समाजाने काही अनुभव घेतले आणि हातावरच्या विश्वासाला संकटात आधार देणाऱ्या देवाच्या शक्तीचीही तितकीच गरज असल्याची जाणीव होऊ लागली. परिणामी देवांना, देवळांना 'गोल्डन डे' येऊ लागले. 'एक लोटी जल, सारे समस्या का हल' या विश्वासाने महादेवाच्या मंदिरात रांग लागू लागली हा सकारात्मक बदल आमची पिढी अनुभवते आहे. मराठी नववर्षाचे स्वागत करताना घराघरांत गुढी उभारली जाते. वर्धेतून गुढीपाडव्याच्या पहाटे 'पाडवा पहाट' हा कार्यक्रम सोशॉलिस्ट चौकात करण्याचा एक प्रघात पडला आणि त्याला ५ हजाराच्यावर वर्धेकर येतात. नागपूर, अमरावतीतही असाच कार्यक्रम होतो. हे सर्व केवळ परंपरा म्हणून नाही तर अभिमान म्हणून साजरे होत आहे. मराठी नववर्ष म्हणजे आपली कालगणना, आपला इतिहास, आपली संस्कृती! जसे इंग्रजी नववर्ष साजरे करणे वाईट नाही तसेच आपले मराठी नववर्षाचे विस्मरण होणे उचित नाही, याची जाणीव समाजाला होऊ लागली आहे. दोन्हीचा सुवर्णमध्य साधण्याची कला आजच्या पिढीला म्हणजे आमच्या भविष्याला साध्य होऊ लागली आहे. इंग्रजी नववर्षाच्या पहिल्या दिवशी वर्धेत सामूहिक हनुमान चालीसाचे आयोजन ही केवळ एक धार्मिक घटना नाही. ती सामूहिकतेची, संघटनाची सार्वजनिक श्रद्धा ठरते आहे. १६ वर्षांपूर्वी एका राम मंदिरातून सुरू झालेला हनुमान चालीसा जवळपास ७०० मंदिरांपर्यंत पोहोचला आहे.



दरवर्षी १ जानेवारी रोजी गल्लीगल्ली, मोहल्यामोहल्यातील मंदिरांमध्ये हनुमान चालीसा होऊ लागला. सुंदरकांडाच्या पठनातून रामकथेचा संदेश मनावर कोरला जातो. यावर्षी नववर्षाच्या स्वागताला अयोध्येतही प्रचंड गर्दी होती. शिर्डीत साईंच्या चरणी नतमस्तक होणारी गर्दी असो, शेगावला गजानन महाराजांच्या दर्शनासाठी लागलेल्या रांगा, कोल्हापूर, तुळजापूरला मातेच्या दर्शनासाठी आलेले कुटुंब असोत की अक्कलकोटला स्वामी समर्थांच्या नामस्मरणात तल्लीन झालेले भाविक असो; या सर्वात श्रद्धेचा एकसमान धागा असून तो आता जगण्याचा अर्थ शोधतो आहे. आज शेगाव येथे दर्शनाला सात तास लागले तर सप्तशृंगी येथे ३० हजार भक्तांनी दर्शन घेतले. माणूस आज पुन्हा अर्थ शोधतोय् आयुष्याचा, कष्टांचा, यश-अपयशाचा! विज्ञानाने सुविधा, वायुगती, माहिती दिली. मात्र, समाधान हिरावून घेतले. त्यानंतर एकत्र वादळ आलं. स्पर्धा आली. ताण वाढला, एकटेपणा वाढल्याने देव आठवला. त्यामुळे आजचा सामूहिक हनुमान चालीसा होणारा दिवस उगवला! इंग्रजी नववर्षाच्या स्वागताला सामूहिक प्रार्थना, भजन, नामस्मरण जोडले जाणे ही सकारात्मकताच म्हणावी लागेल. देवळं पुन्हा गजबजत आहेत; त्याचबरोबर समाजकार्य, शिक्षण, आरोग्य, सेवा यातही धार्मिक संस्थांचा सहभाग वाढतो आहे. शिर्डी, शेगाव, अक्कलकोटसारख्या ठिकाणी केवळ दर्शन नाही तर अन्नछत्र, रुग्णसेवा, शिक्षणाची सोय दिसते. हीच खरी श्रद्धा जी केवळ मागते नाही तर देतेसुद्धा. पूर्वी ज्याला सण-उत्सव कंटाळवाणे वाटत होते, तोच तरुण आज ढोल-ताशांच्या तालावर नववर्षाचे स्वागत करतो आहे, सामूहिक हनुमान चालीसात सहभागी होतो आहे.

देवळं ओस पडली अशी खंत व्यक्त केली जात होती. ती खंत इतिहासजमा होताना दिसते आहे. आता पुढे पुन्हा एक चळवळ सक्रिय करावी लागणार आहे ती म्हणजे वाढदिवसावर पाश्चात्त्यांचे आक्रमण! मेणबती विझवणे आणि केक तोंडाला फासणे या किळसवाण्या प्रकारातून बाहेर पडण्यासाठी, पाडण्यासाठीचा गतिरोधक ओलांडायाचा आहे... बघा जमले तर २१ व्या शतकातली नवीन उपलब्धी होईल.

९८८०९०३७६५

---

## दखल

**मोरेश्वर बडगे**

# शरद पवारांच्या मनात काय?

राज्यातील २९ महापालिका निवडणुकांच्या उमेदवारी अर्ज भरण्याच्या अखेरच्या दिवशी पाहायला मिळालेला अभूतपूर्व गोंधळ सुसंस्कृत राजकारणाला लाजवणारा होता. कित्येक वर्षांनंतर महापालिकांच्या निवडणुका लागल्या. त्यामुळे त्या लढण्यासाठी इच्छुकांची अस्वस्थता समजण्यासारखी आहे. पण एवढा गोंधळ कोणी अपेक्षिला नव्हता. ज्यांना उमेदवारी मिळाली ते खुश आहेत. ज्यांना मिळाली नाही ते जमेल त्या मार्गाने आपली नाराजी काढत आहेत. साऱ्याच राजकीय पक्षांमध्ये जागावाटपाची बोलणी शेवटच्या दिवसांपर्यंत रखडली होती. महायुतीच्या तिकिटाला सोन्याचा भाव आहे. त्यामुळे अनेक ठिकाणी भाजपा आणि एकनाथ शिंदे यांची शिवसेना एकमेकांविरोधात उभे दिसतात. महाविकास आघाडीमध्येही गोंधळाचे असेच चित्र आहे. बंडखोरीला उधाण आले आहे. पुण्यात तर अजित पवारांची राष्ट्रवादी भाजपाच्या विरोधात उभी ठाकली आहे. मात्र, निकालानंतर सर्वांना महायुतीतच यायचे आहे, याची दोघांनाही कल्पना आहे. १५ दिवसांचा हा खेळ आहे. मात्र प्रचार करताना साऱ्याच नेत्यांची अडचण होणार आहे. एक चित्र स्पष्ट दिसते. याही निवडणुकीत विरोधी पक्ष कुठेही मजबुतीने दिसत नाही. नुकत्याच झालेल्या नगर परिषद निवडणुकीत हेच चित्र होते, तसल्याच निवडणुका पुन्हा होताना दिसतील. तेव्हाही महायुतीतले मित्र पक्षच एकमेकांशी टक्कर देत होते. आताही तेच दिसेल. दिसायला हा गोंधळ दिसतो. पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची ही रणनीती आहे. जिंकून येईल तो आपला हा फॉर्म्युला आहे.

२९ महापालिकांमध्ये निवडणुका असल्या, तरी खरी चुरस मुंबईमध्ये आहे. गेली २५ वर्षे मुंबई महापालिका ठाकरे कुटुंबाकडे एकहाती होती. पुढेही ती आपल्याकडे ठेवण्यासाठी उद्धव ठाकरे यांची केविलवाणी धडपड सुरू आहे. गेल्या निवडणुकीत युतीचे सरकार असताना भाजपा आणि शिवसेना विरोधात लढले होते. तेव्हा एकसंध शिवसेनेला ८४ जागा मिळाल्या होत्या तर भाजपाला ८२. दोन जागांचा फरक होता. आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबईची निवडणूक प्रतिष्ठेची केली आहे. कुठल्याही परिस्थितीत मुंबईत भाजपाचा महापौर बसवायचा यासाठी फडणवीस यांनी फार आधीपासून व्यूहरचना केली आहे. भाजपाला तोंड देऊ पाहणाऱ्या उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेची दयनीय अवस्था आहे. शिवसेना फुटली आहे. शिवसेना हा पक्ष, त्याचे निवडणूक चिन्ह... सारे काही एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेकडे आले आहे. मुख्यमंत्री होण्याच्या हव्यासापायी उद्धव ठाकरेंनी भाजपाला दगा दिला. महाविकास आघाडी करून ते शरद पवारांच्या मांडीवर बसले. ती महाविकास आघाडी आज मोडीत निघाली आहे. काँग्रेस प्रकाश आंबेडकर यांच्या वंचित बहुजन आघाडीसोबत लढते आहे. शरद पवारांची मुंबईमध्ये फारशी ताकद नाही. मुंबईचा निकाल काय लागणार हे उघड आहे. १३ महिन्यांपूर्वी झालेल्या विधानसभा निवडणुकीत भाजपाला ४६ टक्के मतं मिळाली होती. शिवसेनेला २३ टक्के तर मनसेला अवघ्या ७ टक्के मतांवर समाधान मानावे लागले होते. आताही हीच टक्केवारी चालणार. संकटकाळाची कुमक म्हणून उद्धव ठाकरेंनी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे सुप्रीमो राज ठाकरे यांच्याशी युती केली आहे. ठाकरे बंधूंनी मराठी अस्मिता हा निवडणुकीचा मुद्दा केला आहे. जुलैमध्ये हे भाऊ एक मंचावर आले होते. तेव्हाच ते कामाला लागले असते तर 'ठाकरे ब्रँड' म्हणून आज चांगली हवा तयार झाली असती. पण निवडणूक युती जाहीर करायला दोघांनी खूप वेळ घेतला. ठाकरे बंधू एकत्र आले याचा खूप गाजावाजा झाला. पण जागावाटपात राज ठाकरेंच्या वाट्याला अवघ्या ५२ जागा आल्या. मुंबईतल्या २२७ जागांपैकी फक्त ५२ जागा. आपल्या भावाची ही पत केली उद्धव ठाकरेंनी. युतीत ठाण्यामध्ये मनसेला २७, नाशिक व पुण्यात प्रत्येकी २५ जागा लढायच्या आहेत. मुंबईमध्ये फडणवीस यांनी एकनाथ शिंदेंना सोबत घेतले आहे. काँग्रेसने वंचितला सोबत घेतले असले तरी फायदा भाजपा-शिंदे सेनेलाच होताना दिसतो आहे. कारण दलित आणि मुस्लिम मतं विभागली जाणार आहेत. लोकसभा निवडणुकीत मुस्लिम मतं ठाकरेंना मिळाली होती. यावेळी तो सारा फायदा ठाकरेंना मिळणार नाही. शिंदे यांच्यामुळे ठाकरेंची मराठी मतं विभागली जाणार आहेत. शरद पवारांच्या करिष्म्यावर ठाकरे विसंबून होते. पण पवारांचा उद्धव ठाकरे यांच्यातला 'इंटरेस्ट' केव्हाच गेला आहे. शरद पवार यांनी पुणे महापालिकेत पुतण्याशी युती केली आहे. दोन्ही राष्ट्रवादी एकत्र भाजपाशी लढत आहेत. शरद पवार पूर्वीचे राहिलेले नाहीत. पुतण्यासोबतच्या त्यांच्या बैठका वाढल्या आहेत. मतचोरीच्या मुद्यावर शरद पवार बोलत नाहीत हे एव्हाना तुमच्या लक्षात आले असेल. ईव्हीएमबद्दल आपली तक्रार नाही, हे आता सुप्रिया सुळेही सांगू लागल्या आहेत. सुप्रिया सुळे यांच्या बोलण्यातला फरकही लक्षात घेण्यासारखा आहे. 'आम्ही व्यावसायिक राजकारणी आहोत' असे त्या मीडियाशी बोलताना म्हणाल्या. पवार कुटुंब कुठल्या दिशेने निघाले आहे याचे हे ट्रेलर आहे. उद्योगपती गौतम अंबानी सदैव विरोधी पक्षांच्या रडारवर असतात. धारावी पुनर्विकास, बंदर तसेच विमानतळ अदानींना दिले म्हणून काँग्रेस आणि उबाठा यांनी अदानी यांच्यावर हल्लाबोल चालवला आहे. त्याच गौतम अदानी यांचे नुकतेच पवार कुटुंबाने बारामतीत जंगी स्वागत केले. महापालिका निवडणुकीच्या धामधुमीच्या तोंडावर हा सोहळा झाला. शरद पवार, अजित पवार यांच्यापासून सारे पवार झाडून या स्वागताला होते. दोन्ही राष्ट्रवादी पुण्यात वेगवेगळे लढणार असे सुरुवातीला जाहीर झाले होते. मात्र, गौतम अदानी यांच्या भेटीनंतर किल्ली फिरली. दोन्ही राष्ट्रवादी एकत्रच नव्हे तर आता दोन्ही राष्ट्रवादीचे विलीनीकरण होणार अशी हवा आहे. महापालिका निवडणुकीच्या निकालानंतर हे घडू शकते. शरद पवारांनी एनडीएसोबत जाण्याची तयारी केली आहे. त्यांचा जीव मुलीमध्ये अडकला आहे. ५० वर्षे राजकारणात राहूनही आपण आपल्या मुलीला 'सेटल' करू शकलो नाही, याची खंत शरद पवारांना टोचते आहे. आता पुढची साडेतीन वर्षे निवडणुका नाहीत. या काळात मुलीची काय अवस्था होईल, याची या बापाला कल्पना आहे. वयाच्या ८५ व्या वर्षी हा बाप थकला आहे, दमला आहे. शरद पवार सत्तेशिवाय राहू शकत नाहीत, असा त्यांचा आतापर्यंतचा रेकॉर्ड आहे. शाहू-फुले-आंबेडकर विचारधारेच्या गोष्टी ते करतात. मात्र 'जिधर बम उधर हम' हीच त्यांची विचारधारा राहिली आहे. त्याच अंतर्गत सुप्रिया सुळे लवकरच केंद्रात मंत्री झालेल्या दिसतील. भाजपासोबत बसण्याच्या हालचाली फार आधीपासून सुरू आहेत. ८० तासांचे सरकार काकाच्याच आशीर्वादाने उभे झाले होते. उद्धव ठाकरे पुढे आल्याने तो प्रयोग बारगळला. अजितदादा वैतागले होते. त्यातूनच राष्ट्रवादीचे दोन तुकडे झाले. आपला पक्ष फुटतो आहे हे शरद पवारांनी कळत होते. पवारांनी अनेक पक्ष फोडले, घरं फोडली. त्यांना आपल्या घरात काय चाललंय ते कळत नसेल अशातला भाग नाही. शरद पवारांनाच ते घडवून आणायचं होतं. यातला पहिला अंक झाला आहे. पुढचा अंक लवकरच पार पडेल. मात्र, संभ्रमावस्था हा पवारांचा स्वभावविशेष आहे. त्या हिशोबाने अजूनही ते उघडपणे पुढे यायला मागेपुढे पाहत आहेत. त्यांच्या मनात काय चाललंय याचा थांगपत्ता लागत नाही. त्यामुळेच एकत्रीकरण लांबतंय का? याची त्यांच्याच सहकाऱ्यांमध्ये चर्चा आहे.



९८५०३०४१२३

(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)

---

### कुमार विश्वास यांनी उलगडले भाजपाच्या तीन पिढ्यांचे 'कार्यसूत्र'

प्रसिद्ध कवी डॉ. कुमार विश्वास यांनी लखनौ येथील कार्यक्रमात भारतीय जनता पक्षाच्या तीन पिढ्यांमधील कार्यशैलीतील बदलाचे अत्यंत मार्मिक विश्लेषण केले. त्यांनी कचरा (अव्यवस्था) साफ करण्याच्या एका साध्या उदाहरणातून भारतीय राजकारणातील हा वैचारिक प्रवास मांडला.

पहिली पिढी : अटलबिहारी वाजपेयी (संस्कार आणि संयम) : अटलजींचे नेतृत्व हे आदर्शवाद आणि लोकशाही मूल्यांचे प्रतीक होते. कुमार विश्वास यांच्या मते, ही अशी पिढी होती जिथे ''शेजाऱ्याने कचरा टाकला तरी तो आपण स्वतः साफ करावा'' इतकी सहनशीलता आणि सुसंस्कृतपणा होता. या काळात विरोधापेक्षा समन्वयाला आणि स्वतःच्या आचरणातून आदर्श उभा करण्याला महत्त्व दिले गेले.

दुसरी पिढी : नरेंद्र मोदी आणि राजनाथ सिंह (शिस्त आणि जबाबदारी) : दुसऱ्या पिढीने व्यवस्थेत उत्तरदायित्व आणले. या नेतृत्वाने स्पष्ट भूमिका घेतली की, ''कचरा ज्याने टाकला आहे, त्यानेच तो साफ केला पाहिजे.'' पंतप्रधान मोदींच्या कार्यकाळात प्रशासकीय शिस्त आणि कामाचा जाब विचारण्याची पद्धत रूढ झाली. ही पिढी केवळ स्वतः काम करण्यावर मर्यादित न राहता, चुका करणाऱ्याला त्याची जबाबदारी स्वीकारायला लावणारी ठरली.

तिसरी पिढी : योगी आदित्यनाथ (निर्णायक आणि कठोर प्रशासन) : आजच्या तिसऱ्या पिढीचे नेतृत्व, विशेषतः मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, अधिक आक्रमक आणि परिणामकारक भूमिकेत आहेत. विश्वास यांच्या शब्दात, ''हे नेतृत्व केवळ कचरा साफ करत नाही, तर कचरा टाकणाऱ्या प्रवृत्तीलाच साफ करते.'' गुन्हेगारी आणि भ्रष्टाचाराविरोधात झीरो टॉलरन्सचे धोरण स्वीकारून प्रशासकीय वचक निर्माण करण्याचे काम या पिढीने केले आहे.

निष्कर्ष : कुमार विश्वास यांनी या विश्लेषणातून हे अधोरेखित केले की, उत्तर प्रदेशसारख्या मोठ्या राज्यात झालेला सकारात्मक बदल हा केवळ योगायोग नसून ती प्रबळ राजकीय इच्छाशक्ती आहे. नेतृत्वाच्या बदलत्या शैलीमुळे व्यवस्था कशी अधिक कणखर आणि जबाबदार बनते, हे त्यांनी आपल्या भाषणातून स्पष्ट केले.

**अविनाश देशपांडे**/९२८४६७९६२३

## वाचक पत्रे

### सेवा सुविधांचे विकेंद्रीकरण व्हावे

रस्ते, मेट्रो, मोनो, विमानतळ, जलवाहतूक, डबल डेकर बस, उन्नत भुयारी मार्ग, सागरी महामार्ग, एक्सप्रेस वे, फ्री वे या व अशा अनेक सुविधा प्रकल्प, महाप्रकल्प हे केवळ मुंबई, ठाणे या जिल्ह्यांच्या ठरावीक भागातच आकार घेत आहेत. विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील जनतेला या सुविधा आणि प्रकल्प केवळ टीव्ही आणि फोटोतच पाहायला मिळतात. जर मुंबई, ठाणे यासारख्या शहरी भागांना सुविधा मिळत असतील तर आम्हाला का मिळत नाही असा प्रश्न ग्रामीण भागातील जनतेला पडला आहे. एकीकडे मुंबई, ठाण्याला इतक्या अत्याधुनिक सुविधा मिळत असताना सीमा भागातील नागरिकांना रस्ते, पाणी, वीज, शाळा, महाविद्यालये, दवाखाने यासारख्या मूलभूत सुविधाही मिळत नाही. देशाला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे उलटूनही पायाभूत सुविधा मिळत नसल्याने सीमा भागातील गावे कर्नाटक, गुजरात, तेलंगणात जाण्यासाठी उत्सुक आहे. सेवा सुविधांचे ठरावीक विकेंद्रीकरण झाल्याने ही वेळ आली आहे. सेवा सुविधांचे ठरावीक भागातच विकेंद्रीकरण झाल्याने सीमा भागातील व उर्वरित महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील जनतेची नाराजी स्वाभाविक आहे. सेवा सुविधांचे हे केंद्रीकरण राज्याचा समतोल विकासाला बाधक आहे म्हणूनच सेवा सुविधा केवळ एका भागापुरतेच मर्यादित न राहता संपूर्ण राज्याला मिळायला हव्यात. सेवा सुविधांचे विकेंद्रीकरण व्हायला हवे.

**श्याम ठाणेदार**/९९२२५४६२९५

### रोजगार उपलब्ध होणे आवश्यक

आपल्या भारतासारख्या प्रचंड लोकसंख्या असलेल्या देशामध्ये रोजगाराच्या असंख्य संधी उपलब्ध व्हायला पाहिजेत. प्रत्येक सुशिक्षित तरुणांच्या हाताला काम असलेच पाहिजे. त्यासाठी उद्योगांची उभारणी करणे अत्यंत महत्त्वाचे ठरते. परंतु उद्योगधंदे वाढीसाठी गुंतवणुकीची गरज असते; त्यानुषंगाने जगभरातील गुंतवणूकदार भारताकडे आकर्षित होण्यासाठी सरकारही प्रयत्नशील असायला पाहिजे. त्यातूनच देशातील क्रयशक्तीचा योग्य वापर होऊ शकेल. माहिती आणि तंत्रज्ञान या क्षेत्रातील उद्योगांमध्ये सध्या एआयचा वापर वाढत चालल्यामुळे त्याचा प्रतिकूल परिणाम तरुणांच्या नोकऱ्यावरही होणार असल्याचा अंदाज आहे. एआय तंत्रज्ञान आज जगातील तंत्रज्ञान क्षेत्रातील परवलीचा शब्द झाला आहे. त्यामुळे या क्षेत्रातही भारताने मागे राहून चालणार नाही. आगामी २०३० पर्यंत देशात अमेझॉनसारखी दिग्गज कंपनी पस्तीस अब्ज डॉलरची गुंतवणूक करणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. आणि त्यातून अडोतीस लाख रोजगार निर्माण होणार असे म्हटले आहे. एआयचा कंपनीचा भर असला तरी त्यामुळे रोजगारांची संख्या कमी होणार नसल्याची ग्वाही दिली जात आहे.

देशातील छोट्या उद्योजकांना देखील सरकारकडून विशेष प्रोत्साहनाची गरज आहे. कारण असे छोटे उद्योगही देशांतर्गत रोजगार निर्मितीसाठी महत्त्वाची भूमिका बजावत असतात. आपल्याच देशात पुरेसे रोजगार उपलब्ध झाल्यास परदेशात जाणाऱ्या सुशिक्षितांचा ओघ कमी होऊ शकेल. सध्याच्या काळात जगावर वर्चस्व गाजवण्यासाठी उद्योग-व्यवसाय यांचाच उपयोग केला जात आहे. ज्यामध्ये सध्या चीन आणि अमेरिका यासारखी राष्ट्रे भारताच्याही पुढे आहेत.

**प्रा. मधुकर चुटे**/९४२०५६६४०४

## महत्वाचे...

### चाकू हल्ल्यात जखमी, दोघांविरुद्ध गुन्हा

**सोलापूर, दि. १ जानेवारी-**

शहरात सार्वजनिक रस्त्यावर झालेल्या वादातून चाकू हल्ल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दि. २९ डिसेंबर रोजी रात्री ११.४५ वाजण्याच्या सुमारास सोलापूर येथील आरोपींच्या राहत्या घराजवळील सार्वजनिक रस्त्यावर ही घटना घडली. फिर्यादी इस्माईल जहाँगीर शेख राहणार गोंदुताई विडी घरकुल, कुंभारी यांचे भाऊजी रस्त्याने जात असताना आरोपी गुलाब हुंडेकरी व शाहिन मिर्झा यांनी तु हमारे इजाजज के बिना कैसे क्या लेके जाता तेरे भानको असे म्हणत शिवीगाळ केली. यावेळी आरोपी गुलाब हुंडेकरी याने खिशातील चाकू काढून फिर्यादी इस्माईल शेख यांच्या उजव्या हातावर दोन वार करून जखमी केले. या घटनेनंतर जखमी फिर्यादीने एमआयडीसी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली असून आरोपींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलिस हेड कॉन्स्टेबल कटके हे करीत आहेत.

### बिशीच्या पैशाच्या वादातून मारहाण

**सोलापूर, दि. १ जानेवारी-**

शहरातील विद्यानगर, शेळगी परिसरात बिशीच्या पैशाच्या वादातून एका कुटुंबावर हल्ला झाल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात आरोपींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दि. २९ डिसेंबर रोजी दुपारी ३.३० वाजण्याच्या सुमारास, विद्यानगर, सोलापूर येथे ही घटना घडली. या घटनेची नोंद दि. ३० डिसेंबर रोजी रात्री १०.३३ वाजता करण्यात आली आहे. या प्रकरणातील फिर्यादी बंदेनवाज रफिक सय्यद राहणार विद्यानगर, शेळगी, सोलापूर याने आरोपी आरीफ शेख, आरीफ शेख याची पत्नी व इतर ७ ते ८ अनोळखी व्यक्तींवर तक्रार दाखल केली आहे. फिर्यादी व त्यांचा भाऊ रियाज हे त्यांच्या राहत्या घरासमोर असताना, बिशीच्या व्यवहारातील १० हजार रुपयांच्या पैशावरून वाद झाला.यावेळी आरोपींनी एकत्र येत फिर्यादी व त्यांच्या भावाला शिवीगाळ व दमदाटी केली. त्यानंतर लोखंडी रॉड व लाकडी बांबूने मारहाण करून गंभीर जखमी केल्याचे फिर्यादीत नमूद आहे. या प्रकरणाचा तपास पोलिस हेड कॉन्स्टेबल वाघमारे करीत आहेत.

### मार्केट यार्ड परिसरात बसच्या धडकेत वृद्धाचा मृत्यू; बस चालकावर गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. १ जानेवारी-**

मार्केट यार्ड परिसरात रस्ता ओलांडत असताना भरधाव बसच्या धडकेत एका ६५ वर्षीय वृद्धाचा मृत्यू झाल्याची घटना २९ डिसेंबर रोजी सकाळी सुमारे ९.०६ वाजण्याच्या सुमारास घडली. या प्रकरणी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या अपघातात सुधीर सुभाष सोनकर राहणार मड्डी वस्ती, भवानी पेठ, सोलापूर यांचे निधन झाले. ते दवाखान्याला जाण्यासाठी रस्ता क्रॉस करत असताना आरोपी बसचालकाने निष्काळजीपणे बस चालवून त्यांना जोराची धडक दिली. या अपघातात त्यांच्या डोक्याला गंभीर मार लागून ते गंभीर जखमी झाले होते. त्यांना उपचारासाठी घेऊन गेले असता उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाला.या प्रकरणी आरोपी बसचालक श्रावण उध्दव बोरुळे राहणार वागदरी, ता. उमरगा, जि. धाराशिव याच्याविरोधात गुन्हा नोंदविण्यात आला आहे. या घटनेचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक जगताप हे करीत आहेत.

### तरुणावर कोयत्यासारख्या लोखंडी हत्याराने हल्ला

**सोलापूर, दि. १ जानेवारी-**


शहरात तरुणावर कोयत्यासारख्या लोखंडी हत्याराने हल्ला केल्याची घटना घडली असून या प्रकरणी एकाविरुद्ध एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दि. ३० डिसेंबर रोजी दुपारी २ वाजण्याच्या सुमारास शंकरलिंग नगर, सोलापूर येथे ही घटना घडली. या प्रकरणी शंकर लकप्पा कोळी वय २२, राहणार समाधान नगर, अक्कलकोट रोड, सोलापूर यांनी फिर्याद दिली आहे.यामध्ये आरोपी शशिकांत शंकर बागलकोटे राहणार समाधान नगर, सोलापूर याने फिर्यादीशी वाद घालत तुला लई मस्ती आली आहे का असे म्हणत शिवीगाळ केली. त्यानंतर आरोपीने हातातील लोखंडी कोयत्यासारख्या दिसणाऱ्या हत्याराने फिर्यादीच्या डाव्या हाताच्या अंगठ्यावर व कोपऱ्यावर हल्ला करून जखमी केले. तसेच कोयत्याच्या धार नसलेल्या बाजूने छातीवर मारहाण करून दुखापत केल्याचे फिर्यादीत नमूद आहे. या प्रकरणी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेचा पुढील तपास पोलिस हेड कॉन्स्टेबल नवले करीत आहेत.

# जिल्ह्यात नव्या वर्षातही विविध प्रकल्पांना चालना

### जिल्हा भूसंपादन समन्वयक अमोलसिंह भोसले

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ जानेवारी-**

आजतागायत जिल्ह्याच्या दाही दिशांना अनेक विकासकामांचा श्रीगणेशा झाला आहे; यातील काही कामे पूर्ण झाली आहेत तर काही कामे ७० ते ८० टक्के झाली असून, उर्वरित कामांना या नव्या वर्षात पूर्ण विराम मिळून जिल्हावासियांना त्याचा मोठा फायदा होत राहणार आहे. इतकेच नाहीतर नव्या वर्षातही कोट्यवधींचे नवीन प्रकल्प उभारण्याची शक्यता जिल्हा भूसंपादन समन्वयक अमोलसिंह भोसले यांनी नव्या वर्षांच्या प्रथम दिवशी दिली.



जिल्ह्यात २०२५ साली आलेल्या विविध प्रकल्पांमध्ये राष्ट्रीय महामार्गासाठीही अनेक ठिकाणच्या जमिनी भूसंपादन करण्यात आल्या. यामध्ये सांगली ते सोलापूर क्र. १६६, संत ज्ञानेश्वर महाराज पालखी मार्ग क्र. ९६५, संत तुकाराम महाराज पालखी मार्ग क्र. ९६५ तर अहमदपूर करमाळा टेंभुर्णी राष्ट्रीय महामार्ग क्र. ५६१, सोलापूर-अक्कलकोट-गुलबर्गा क्र. १५०, सोलापूर ते येडशी नवीन क्र. ५२, सोलापूर- हैद्राबाद-संगारेड्डी रा. म. क्र. ९, पुणे-सोलापूर, सोलापूर-विजापूर हे मार्ग भूसंपादित होवून तयारही झाले आहेत. तर यासाठी ४ हजार ४४५ कोटी रूपये खर्च झाले आहेत. राष्ट्रीय महामार्ग (सा. बां. वि.) भूसंपादन प्रकल्पांमध्ये अक्कलकोट-दुधनी महामार्ग क्र. १५०, पंढरपूर-टेंभुर्णी, मंगळवेढा-पंढरपूर, सांगोला-जत, नळदुर्ग-अक्कलकोट महामार्ग बांधणी झाली आहे. तर यावर गतवर्षात ४२.२३ कोटीचा खर्च झाला आहे.

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या महामार्गासाठीही काही ठिकाणी जमीन भूसंपादन करण्यात आली आणि यासाठी १२९ कोटी ७८ लाखाचा आवश्यक आहे. रेल्वे प्रकल्पासाठी जमीन भूसंपादन करण्यासाठी सोलापूर-तुळजापूर-धाराशिव या रेल्वे मार्गासाठी १८८.२९ हे. आर जमीन संपादित करून यासाठी ५८६ कोटी ०३ लाख एकूण निधी लागला. महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळ भूसंपादित प्रकल्पांमध्ये कासेगाव (ता. पंढरपूर) एमआयडीसी आणि मोडनिंब एमआयडीसीसाठी १५९.१७ हे. आर. जमीन भूसंपादित करायची असून, यासाठी आवश्यक निधी ४५ कोटी लागणार आहे. महाराष्ट्र शक्तीपीठ द्रुतगती महामार्गासाठी जमीन भूसंपादित करायची असून, यासाठी ३ हजार १७३ कोटी निधीची गरज आहे.

सोलापूर समांतर जलवाहिनीचेही काम १०० टक्के पूर्ण झाले आहे. सुरत-चेन्नई या महामार्गाचे काम अर्धे झाले असून, यासाठीही अजून काही निधीची गरज आहे. तर सोलापूर शहरातील दोन उड्डाणपुलासाठी १४५.११ लाखाचा निधी अपेक्षित आहे. यातील जुना पुना ते पत्रकार भवन आणि जुना बोरामणी नाका ते मोरारका बंगला इथपर्यंत उड्डाणपुलांच्या निर्मितीचे काम लवकरच सुरू होणार आहे. या उड्डाणपुलासाठी खाजगी मालमत्तांची भूसंपादन प्रक्रिया पार पडली असून, काही शासकीय जागांचा विषय पेंडिंग असून, त्यावरही लवकरच तोडगा निघणार असल्याची माहितीही संबंधित खात्याकडून मिळाली. दरम्यान, आता नवीन चालू आर्थिक वर्षातही मोठ्या प्रमाणात विकासकामे मार्गी लागण्याची शक्यताही भोसले यांनी वर्तविली.



## महाराष्ट्र रिक्षा सेनेच्या बार्शी शहर प्रमुखपदी राजेंद्र मुळे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ जानेवारी-**

महाराष्ट्र रिक्षा सेनेच्या बार्शी शहर प्रमुखपदी राजेंद्र मुळे यांची निवड करण्यात आली. या निवडीचे नियुक्ती पत्र देण्यात आले. शिवसेना उध्दव बालासाहेब ठाकरे पक्षाचे शहर प्रमुख महेश धाराशिवकर, रिक्षा सेनेचे जिल्हा प्रमुख सुरे जगताप व शाखा प्रमुख मारुती खानापुरे उपस्थित होते. त्यांना पुढील कार्यस रिक्षा सेनेच्या वतीने व उद्धव बाळासाहेब ठाकरे सेनेच्या वतीने त्याना शुभेच्छा देण्यात आल्या.

## सदर बझार परिसरातून २० वर्षीय तरुणी बेपत्ता

**सोलापूर, दि. १ जानेवारी-**

शहरातील उत्तर सदर बझार पोलीस ठाण्याच्या हद्दीतून २० वर्षीय तरुणी बेपत्ता झाल्याची घटना समोर आली असून याप्रकरणी सदर बझार पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे.

यावेळी बेपत्ता तरुणी दि. २६ डिसेंबर रोजी सकाळी नेहमीप्रमाणे सात रस्ता येथील भाग्यश्री लॅब येथे कामावर जाते असे सांगून घरातून निघाली होती. ती रोज रात्री सुमारे ९.३० वाजता घरी परतत असते, मात्र त्या दिवशी ती घरी न परतल्याने कुटुंबीयांनी नातेवाईक, मित्रमंडळी तसेच इतर ठिकाणी शोध घेतला.तरीही ती अद्याप सापडलेली नसल्याचे तक्रारीत म्हटले आहे. या घटनेचा पुढील तपास सदर बझार पोलीस ठाण्याचे अधिकारी करीत असून, संबंधित तरुणीबाबत कोणालाही माहिती मिळाल्यास तात्काळ कळवण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे.

### सारा तेंडुलकर 'लाइटस्टाईल बाय 'पीएनजी'ची नवीन ब्रँड ॲम्बेसेडर

**सोलापूर :** पीएनजी ज्वेलर्सच्या समकालीन व हलक्या वजनाच्या फाईन ज्वेलरी ब्रँड 'लाइटस्टाईल बाय पीएनजी' ने सारा तेंडुलकरला आपली ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून घोषित केले आहे.'लाइटस्टाईल बाय पीएनजी'च्या या निर्णयामुळे भारतातील नवीन पिढीतील दागिनेप्रेमी असलेल्या ग्राहकांशी ब्रँडचे नाते अधिक दृढ करणे हा यामागील हेतू आहे.या सहयोगामुळे पीएनजी ज्वेलर्सच्या वारसागत ग्राहकांपासून भविष्यातील ग्राहकांपर्यंतचा दुवा म्हणून 'लाइटस्टाईल'ची भूमिका अधिक महत्त्वाची ठरणार आहे.

पीएनजी ज्वेलर्सचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक डॉ. सौरभ गाडगीळ म्हणाले,लाइटस्टाईल बाय पीएनजी ही आमच्या विद्यमान ग्राहकांना आणि भविष्यातील ग्राहकांना जोडण्याची दीर्घकालीन आणि जाणीवपूर्वक आखलेली योजना आहे.सारा तेंडुलकर म्हणाली,लाइटस्टाईल, सहजता आणि वैयक्तिक स्टाईल प्रतिबिंबित करणारा ब्रँड आहे, जी मला अधिक आकर्षित आणि स्वाभाविक वाटते.

### शिक्षक पतसंस्थेच्या अध्यक्षपदी फुले

**सोलापूर :** सोलापूर जिल्हा प्राथमिक शिक्षक सहकारी संस्थेच्या अध्यक्ष व उपाध्यक्षपदाच्या निवडी निवडणूक निर्णय अधिकारी दतात्रय भवर यांच्या अध्यक्षतेखाली झाली. अध्यक्षपदी संभाजी फुले व उपाध्यक्षपदी रवींद्र पाटील यांची बिनविरोध निवड करण्यांत आली.

चिटणीस उमाकांत घाडगे यांनी स्वागत केले. नूतन अध्यक्ष फुले व उपाध्यक्ष पाटील यांचा तसेच संस्थेचे मावळते अध्यक्ष तानाजी गुंड व उपाध्यक्ष शितल चव्हाण यांचा बाळासाहेब काळे, अंकुश काळे, उत्तमराव जमदाडे, मच्छिंद्रनाथ मोरे, शिवानंद भरले, बब्रुवाहन काशीद, जोतीराम बोंगे, रावसाहेब जाधवर यांच्या हस्ते सत्कार झाला. प्रास्ताविक रामचंद यादव यांनी केले. यावेळी संचालक विरभद्र यादवाड, अनिरुद्ध पवार, शिवाजी पाटील, रमेश घंटेनवरु, तानाजी गुंड, रामचंद यादव, शेखर कोरके, संजय चेंळेकर आदी उपस्थित होते.

### नावात बदल

माझे जुने नाव **तोटप्पा शिवानंद मोटगी** असे होते. ते आता बदलून **तोटप्पा शिवप्पा मोटगी** असे ओळखले जाईल. अक्कलकोट येथील मे. कार्यकारी दंडाधिकारी यांचेसमोर **प्रतिज्ञापत्र क्र. ७०५३/२०२५ दिनांक २३/०१/२०२५**

### पावती हरवली

श्री बाळासाहेब व्यंकटराव पाटील, रा. भातंबरे यांचे नावे असलेली बुलढाणा अर्बन को. ऑप क्रेडिट सोसायटी लि. शाखा बार्शी यांच्या गोदामात माल ठेवल्याची गोदाम पावती क्र. ६६२९९४ बार्शी ते भातंबरेच्या दरम्यानप्रवास करत असताना हरवली आहे. कृपया सापडल्यास खालील पत्त्यावर आणून द्यावी ही विनंती.

**संपर्क- श्री. बाळासाहेब व्यंकटराव पाटील रा. भातंबरे, ता. बार्शी, जि. सोलापूर**

## पी.एस. टेक्निकल हायस्कूलमध्ये शिक्षण प्रदर्शन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ डिसेंबर-**

पी. एस. इंग्लिश मिडियम टेक्निकल हायस्कूल येथे शिक्षण प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रदर्शनात शाळेतील विद्यार्थ्यांनी विज्ञान, गणित, हस्तकला,चित्रकला, भाषा आणि माहिती तंत्रज्ञान इत्यादी विविध संकल्पनांवर आधारित नावीन्यपूर्ण आणि उपयुक्त प्रकल्पांचे सादरीकरण शास्त्रीय स्पष्टीकरणासह आत्मविश्वासाने केले.




शिक्षण प्रदर्शनाचे उद्घाटन एसपीएम स्कूलच्या मुख्याध्यापिका संगीता कोळी यांच्या हस्ते करण्यात आले.प्रदर्शनास श्राविका संस्थेच्या सीईओ देवई शहा, मुख्याध्यापिका स्वाती कांबळे, पर्यवेक्षक जयेश शिरढोणे यांचे मार्गदर्शन लाभले. पर्यवेक्षिका कल्पना रमावत, समन्वयक अर्चना अक्कलकोटे आणि समस्त पालकवर्ग यांनी उत्स्फूर्तपणे भेट देऊन विद्यार्थ्यांच्या कार्याचे कौतुक केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मीनाक्षी सग्गम, रशिदा शेख यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन पटेल तर आभार गाजूल यांनी मानले.

### जाहीर नोटीस

सहाय्यक निबंधक सहकारी संस्था करमाळा ता. करमाळा जि. सोलापूर यांचेकडून सर्व संबंधितांना जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था करमाळा ता. करमाळा जि. सोलापूर यांच्चे कार्यक्षेत्रातील खाली नमुद केलेल्या सहकारी संस्था या कार्यालयाने महाराष्ट्र सहकारी संस्था अर्थिनयम १९६० मधील तरतुदीनुसार अवसायनात घेतलेल्या आहेत, सर्व संबंधिताना या नोटीशीद्वारे सूचित करण्यात येते की, खालील सहकारी संस्थांबाबत कोणाचे दावे / आक्षेप / हरकती असतील तर या कार्यालयाकडे नोंदवाव्यात, लेखी आक्षेप / हरकत नोंदविण्याची अंतिम मुदत दिनांक ०२/०२/२०२६ पर्यंत राहील त्यानंतर दाखल झालेले दावे / आक्षेप यांचा विचार केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी. तरी खालील अवसायनातील सहकारी संस्थेच्या सभासदांनी खाली नमूद केलेल्या ठिकाणी. दिवशी, वेळी होणाऱ्या शेवटच्या सर्वसाधारण सभेस उपस्थित राहावे.

**सभेची विषय सुची पुढीलप्रमाणे** :- १. अवसायकाचे कामकाज आढावा व जमा खर्चास मंजुरी देणे. २. संस्थेचे येणे-देणे बाबत हरकतींचा विचार करून येणे-देणे अतिंम करणे ३. संस्थांची नोंदणी रद्द करणेबाबत निर्णय घेणे ४. इतर आयत्या वेळीचे विषय.

| अ. क्र. | संस्थेचे नाव | अवसायकाचे नाव | अ, क्र | संस्थेचे नाव | अवसायकाच नाव |
|---|---|---|---|---|---|
| १ | जयजवान जयकिसान ग्रा.बि.शे. करमाळा | यु.एच. बेंढारी | १४ | संगमेश्वर मजूर मर्या. करमाळा | व्ही.एस. माने |
| २ | सौ. नंदिनी जगताप महिला ना. पत. मर्या. करमाळा | यु.एच. बेंढारी | १५ | स्वामी समर्थ नागरी सहकारी पतसंस्था मर्या., करमाळा, ता. करमाळा, जि. सोलापूर | व्ही.एस. माने |
| ३ | जीवनदानी ग्रा.बि.शे. सह.सं.मर्या., घोटी | यु.एच. बेंढारी | १६ | करमाळा म्युन्सीपल सर्व्ह. को. ऑप. क्रेडीट सोसा. लि. करमाळा | व्ही.एस. माने |
| ४ | दिगंबर बागल ग्रा.बि.शे. सह.सं.मर्या., करमाळा | यु.एच. बेंढारी | १७ | धनस्मृती टेक्सटाईल्स् कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्या., झरे ता. करमाळा | व्ही.एस. माने |
| ५ | शंभुराजे नागरी सह. पतसंस्था मर्या. करमाळा | ए.एस. महारनवर | १८ | डॉ. मोहनलाल दोशी नागरी सह. पतसंस्था म.करमाळा | व्ही.एस. माने |
| ६ | श्रीराम नागरी सह. पतसंस्था मर्या. करमाळा | ए.एस. महारनवर | १९ | जय श्री दंत्त सर्वसाधारण सहकारी संस्था म. करमाळा | व्ही.एस. माने |
| ७ | विघ्नहर्ता नागरी सह. पतसंस्था मर्या. करमाळा | ए.एस. महारनवर | २० | भैरवनाथ सर्वसाधारण सहकारी संस्था मर्या १० पिंपळवाडी, ता. करमाळा | व्ही.एस. माने |
| ८ | शहीद जवान नवनाथ गात ना.सह. पत मर्या. करमाळा | ए.एस. महारनवर | २१ | लक्ष्मी बहुउदेशिय सर्वसाधारण सहकारी संस्था मर्या., वडगाव उत्तर ता. करमाळा | यु.एच. बेंढारी |
| ९ | संत सावता ग्रा.बि.शे. सह.सं. मर्या. वरकुटे | ए.एस. महारनवर | २२ | ओमसाई बहू. सह. संस्था म. करमाळा | यु.एच. बेंढारी |
| १० | गणराज ग्रा.बि.शे. सह.सं.मर्या. केम | ए.एस. महारनवर | २३ | समृध्दी ग्रामिण बिगरशेती सहकारी पतसंस्था जेऊर | यु.एच. बेंढारी |
| ११ | शिवरत्न नागरी सह. पत मर्या. करमाळा | ए.एस. महारनवर | २४ | जयविजय नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित करमाळा | यु.एच. बेढारी |
| १२ | रत्नप्रभादेवी मोहिते-पाटील ना.पत. मर्या. | ए.एस. महारनवर | २५ | श्री दत्त पाणी पुरवठा सहकारी संस्था मर्यादित मांगी | यु.एच. बेंढारी |
| १३ | राजीव गांधी औद्योगीक सहकारी संस्था मर्यादित करमाळा | यु.एच.बेंढारी | २६ | मातोश्री पाणीपुरवठा सहकारी संस्था मर्यादित फिसरे | यु.एच. बेढारी |

संस्थेच्या शेवटच्या सर्वसाधारण सभेची तारीख दिनांक ०२/०२/२०२६ वेळ दुपारी १.०० वाजता, ठिकाण - सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था करमाळा, ता. करमाळा, जि. सोलापूर
दिनांक ०१/०१/२०२६

**सही/-**
**(एम.एल. शिंदे)**
**सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था तालुका करमाळा जिल्हा सोलापूर**



## नवीन वर्षाची सुरुवात निराधारांना आधार देत आस्था फाउंडेशनचा मानवतेचा उपक्रम

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १ जानेवारी-**

नवीन वर्षाचे स्वागत आनंद, उत्सव आणि जल्लोषात करतो; मात्र या उजेडातही काही आयुष्य अजून अंधारात आहेत. रस्त्याच्या कडेला कुणी न पाहता जगणारे निराधार वृद्ध आजही ''आपले कुणी आहे का?'' हा प्रश्न मनात घेत दिवस घालवतात. सोलापूर मधील निराधार वृद्धाश्रमामध्ये आजीच्या सोबत ३१ डिसेंबर साजरा करण्यात आला, त्यावेळी त्या निराधार आश्रम आजींना च्या चेहऱ्यावर हास्य उमटले व आज्यांनी खूप बरं वाटले त्यांना आपले कोणते आहे ह्या मनात ठेवून त्यांच्या चेहऱ्यावर हास्य उमटले

सोलापूरमध्ये आस्था फाउंडेशनने अशा आयुष्यांसाठी नव्या वर्षाची सुरुवात माणुसकीच्या दीपाने केली. उपाशीपोटी गेलेल्या रात्री, एकटेपणाने घालवलेले दिवस आणि ''आता जावे तरी कुठे?'' ही वेदना, या साऱ्यावर मायेचा स्पर्श करून निराधार वृद्धांना आधार दिला.सुरक्षित निवारा, उपचार, अन्न आणि आपुलकीचे शब्द मिळताच त्यांच्या डोळ्यांत पुन्हा आशेचा प्रकाश झळकला. प्रेमाचा स्पर्श आणि विश्वासाचा हात लाभल्यावर आयुष्याच्या अंधारात हरवलेला आत्मविश्वास नव्या वर्षासोबत उजळून निघाला. या उपक्रमात संस्थापक विजयकुमार छंचुरे व समर्पित कार्यकर्त्यांनी तत्परतेने मदतीचा हात पुढे करून सुरक्षितता, उपचार, भोजन तसेच आवश्यक साहित्य उपलब्ध करून दिले. ''माणुसकी अजून जिवंत आहे'' हे हृदयस्पर्शी दृश्य ठरले. आजही आपल्या आजूबाजूला अनेक निराधार, एकाकी आणि आधारविहीन व्यक्ती आहेत, ज्यांना फक्त मदत नाही आपुलकीची गरज आहे. त्यांच्या आयुष्यातील अंधार दूर करण्यासाठी एक क्षण थांबणे, एक पाऊल पुढे टाकणे आणि मदतीचा हात पुढे करणे हे आपल्या सर्वांच्या हातात आहे.

निराधार आश्रमामध्ये कार्यक्रमासाठी आस्था रोटी बँकेचे कार्यकर्ते उपस्थितीत होते कांचन हिरेमठ, सविता जोशी, पुष्कर पुकाळे, विद्या सिंघम, विनोद भोसले, अनिता ताली कोटी, सुरेखा पाटील, अविनाश मार्चला, वीरेश शरणार्थी, दत्तात्रेय दळवी, चंद्रकांत जोशी, व आस्था रोटी बँकेचे सर्वेसर्वा विजय छंचुरे यावेळी हे सर्वजण उपस्थितीत होते. वात्सल्य आस्था निराधार आश्रम चे व्यवस्थापिका राधा घटे व रजनी भाटिया यावेळी उपस्थितीत होते.

### जाहीर नोटीस

Email ID: ddircitysurvey@gmail.com
क्र. ना.भू. १/अपील एस.आर.६५८२/२०२४
पुणे. दि. ३०/१२/२०२५

**अपर जिल्हाधिकारी तथा उपसंचालक भूमि अभिलेख संलग्न जमाबंदी आयुक्त (नागरी भूमापन) पुणे यांचे न्यायालयात**

प्रति,
अपीलदार श्री. अनिल बाळकृष्ण टाकळीकर, रा. ५४३, उत्तर सदर बझार, सोलापूर विरुद्ध जाबदार क्र.१. सुधाबेन विनुभाई पटेल, रा. १३४ रेल्वे लाईन तुकाराम अपार्टमेंट, सोलापूर व इतर

**विषय :** महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ कलम २४७ अन्वये अपील अर्ज. मौजे मजरेवाडी, ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर येथील सर्व्हे नं. १२७/२ब/२अ, २ब या मिळकतीबाबत.

मौजे मजरेवाडी, ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर येथील सर्व्हे नं. १२७/२८/२अ, २ब या मिळकतीबाबत. जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, सोलापूर यांनी त्यांचेकडील क्र. भूमापन/अपील/एस.आर.२६८३/२०२१, दिनांक १२/०४/२०२४ रोजी निर्णय दिला आहे. सदर निर्णयावर नाराज होऊन प्रस्तुत अर्जदार यांनी उपसंचालक भूमि अभिलेख, पुणे प्रदेश, पुणे या कार्यालयाकडे दिनांक ११/०७/२०२४ रोजी अपील अर्ज दाखल केला असून त्यातील जाबदार क्र.३) सिध्देश्वर आण्णाराव पाटील, रा. न्यु संतोष नगर, जुळे सोलापूर, भाग १, सोलापूर. क्र.४) शांताबाई मल्लिकार्जुन मळसिध्दनवरु रा. २४०/३ निलम नगर, MIDC अक्कलकोट रोड, सोलापूर. क्र.६) राहुल बाळासाहेब अनंतपुरकर, रा. प्लॉ.नं. १ कल्याणी अपार्टमेंट, होटगी रोड, सोलापूर. क्र. ११) रविंद्रभाई उर्फ रविंद्रकुमार डाह्याभाई पटेल रा. ७३२ न्यु पाच्छा पेठ, साळुंक चेंबर्स, ब्लॉक नं. ४, १ ला मजला, अशोक चौक, सोलापूर. क्र.१२) सिध्दाराम शामराव कोरे, रा. ११०४ न्यू पाच्छा पेठ, सोलापूर. क्र. १६) बाळासाहेब शिवप्पा अनंतपुरकर, रा. फ्लॉ. नं. १ कल्याणी अपार्टमेंट, होटगी रोड, सोलापूर. क्र.१९) दत्तात्रय मुरलीधर वाघमारे रा. ५० बुधवार पेठ, सम्राट चौक, भाजी मार्केट शेजारी, सोलापूर. क्र.२२) दत्तात्रय महादेव गावडे, रा. ब्लॉ.नं. बी-१८, जाई-जुई नगर, विजापूर रोड, सोलापूर. क्र. २४) वंदना तानाजी जाधव, रा. ए-१ कृषी कमर्शियल कॉम्प्लेक्स, सोलापूर. क्र.२८) विशाल बसवेश्वर कोरशेट्टी. क्र.२९) गुरुदेवी बसवेश्वर कोरशेट्टी. क्र.३०) सुरेखा चंद्रशेखर मुचंडी, अ.क्र. २८ ते ३० रा. ५७ जोडभावी पेठ, सोलापूर. क्र.३१) अहमद गुलाब नदाफ, रा. ४०ब दोंदे नगर, शिक्षक सोसायटी, जुळे सोलापूर. क्र.३२) संदीप संपतराव बोळे रा. एफ-१०, सरस्वती रेसिडेंसी, गोविंदविहार मंगल कार्यालयाजवळ, जुळे सोलापूर, सोलापूर. क्र.४३) सचिन रेवणसिध्द काळे, रा. ११९ नेहरु नगर, विजापूर रोड, सोलापूर. क्र.४६) अनघा गिरीष कणेकर, रा. ७ विकास नगर, होटगी रोड, सोलापूर, क्र.४८) गणेश सिद्रामप्पा आलुरे, रा. जोडभावी पेठ, सोलापूर यांना अपीलात नमुद पत्यावर नोटीस पाठवूनही जाबदार सुनावणीस हजर होत नाहीत. त्यामुळे सदरच्या मिळकतीबाबत वरील जाबदार यांनी अथवा त्यांचे कायदेशीर वारसांनी किंवा त्यांचे प्रतिनिधी यांनी ही नोटीस प्रसिध्दीपासून ३० दिवसात अगर दिनांक २०/०१/२०२६ रोजी दुपारी १२.०० वाजता या न्यायालयात हजर राहून आपले म्हणणे द्यावे अन्यथा आपले काही म्हणणे नाही असे समजून अपीलाची सुनावणी घेणेत येईल व निर्णय घेतला जाईल याची नोंद घ्यावी.

जाबदार यांना अथवा त्यांचे कायदेशीर वारस यांना प्रस्तूत अपीलातील सुनावणीकामी हजर राहणेसाठी सदरची जाहीर नोटीस प्रसिध्द केली असे.

**सुनावणीचा पत्ता-**
**अपर जिल्हाधिकारी तथा उपसंचालक भूमि अभिलेख संलग्न जमाबंदी आयुक्त (नागरी भूमापन) पुणे कार्यालय नवीन प्रशासकिय इमारत, ३ रा मजला, दालन नं. ३०५, विधानमवन समोर, पुणे-०१**

(शिक्का)

**सही/-**
**(अजम भुंगे)**
**कार्यालय अधीक्षक ना.भू.१ जमाबंदी आयुक्त कार्यालय, पुणे**

मा.उ.सं.भू.अ. संलग्न ज.आ.
(ना.मु.) पुणे यांचे मान्यतेने

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## मी पुन्हा कधीच खेळू शकणार नसल्याचे वाटत होतेय; चेतन सकारियाचे प्रतिपादन

**नवी दिल्ली** - तीन वर्षांपूर्वीपर्यंत चेतन सकारिया हा भारताच्या उदयोन्मुख वेगवान गोलंदाजांपैकी एक मानला जात होता, परंतु दुखापतीमुळे बराच काळ विश्रांती घेतल्यानंतर त्याला वाटू लागले की तो पुन्हा कधीच खेळणार नाही. चालू देशांतर्गत हंगामात विजय हजारे चषकामध्ये चेतन सकारियाने सौराष्ट्राकडून एक सामना खेळला, फेब्रुवारी २०२४ नंतरचा त्याचा पहिलाच सामना होता. जेव्हा मी दुखापतग्रस्त झालो तेव्हा मला वाटले होते की मी कधीही पुनरागमन करू शकणार नाही. आता, या देशांतर्गत हंगामात खेळताना मला खूप चांगले वाटते. सौराष्ट्राकडून गोलंदाजी करताना खूप छान वाटते, असे चेतनने सांगितले. या वेगवान गोलंदाजाला २०२४ च्या सुरुवातीला डाव्या मनगटाची दुखापत झाली होती, ज्यातून सावरण्यासाठी बराच वेळ लागला, तो मानसिकदृष्ट्या थकवणारा काळ होता, ते माझ्यासाठी खूप आव्हानात्मक होते, असे तो म्हणाला.

## सिडनी कसोटीसाठी ऑस्ट्रेलिया संघ कायम

**सिडनी** : ऑस्ट्रेलियाने अॅशेस मालिकेतील आगामी सिडनी अंतिम कसोटीसाठी बॉक्सिंग-डे कसोटीतील संघात कोणताही बदल केलेला नाही, तथापि, एससीजी येथील परिस्थितीमुळे अंतिम एकादशमध्ये बदल होऊ शकतात. हा सामना ४ जानेवारी रोजी सिडनी क्रिकेट मैदानावर सुरू होणार आहे. ही घोषणा गुरुवारी दुपारी करण्यात आली, जेव्हा गत आठवड्यात इंग्लंडकडून चार गडी राखून झालेल्या पराभवानंतर ऑस्ट्रेलियन संघ सिडनीमध्ये पहिल्या सराव सत्रासाठी एकत्र आला होता. मेलबर्न कसोटी दोन दिवसांतच संपली होती, ज्या खेळपट्टीला नंतर आयसीसीने असमाधानकारक ठरवले. या पराभवामुळे ऑस्ट्रेलियाला जवळपास १५ वर्षांत मायदेशात लाल चेंडूच्या क्रिकेटमध्ये इंग्लंडकडून पहिल्यांदाच पराभव पत्करावा लागला, जिथे एमसीजीवर दोन दिवसांत ३६ बळी पडले. तथापि, हा निकाल इंग्लंडसाठी अधिक महत्त्वाचा होता, कारण ऑस्ट्रेलियाने पर्थ, ब्रिस्बेन आणि अॅडलेड येथील पहिल्या तीन कसोटी जिंकून आधीच अॅशेस मालिका जिंकली होती.

## मुष्टियोद्धा अँथनी जोशुआला रुग्णालयातून सुटी

**नवी दिल्ली** : माजी जागतिक हेवीवेट मुष्टियोद्धा विजेता अँथनी जोशुआला नायजेरियातील एका प्राणघातक कार अपघातानंतर काही दिवसांनी रुग्णालयातून सुटी देण्यात आली आहे. या अपघातात त्याच्या दोन जवळच्या मित्रांचा मृत्यू झाला. सोमवारी लागोस-इबादान द्रुतगती मार्गावर जोशुआचा एका प्राणघातक रस्ते अपघातात सहभाग होता. चार जणांना घेऊन जाणारे वाहन एका उभ्या असलेल्या ट्रकवर आदळले, परिणामी जोशुआचे जवळचे मित्र आणि संघाचे सदस्य, सिना घामी आणि लतीफ आयोडेले यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. तथापि, जोशुआ आणि आणखी एका प्रवाशाला तातडीने लागोस येथील विशेष वैद्यकीय सुविधेत दाखल करण्यात आले. दोघांचीही प्रकृती स्थिर आहेत आणि त्यांना कोणत्याही आपत्कालीन वैद्यकीय हस्तक्षेपाची आवश्यकता नाही, अशी सखोल वैद्यकीय तपासणीनंतर, वैद्यकीय व्यावसायिकांनी पुष्टी केली आहे.

## डोपिंगमधील दोषी कुस्तीपटू ऋतिकाला टॉप्समधून वगळले

**नवी दिल्ली** : डोपिंगमध्ये दोषी आढळलेल्या कुस्तीपटू ऋतिका हुडाला क्रीडा मंत्रालयाच्या महत्त्वाकांक्षी टार्गेट ऑलिम्पिक पोडियम स्कीम (टॉप्स) द्वारे समर्थित खेळाडूंच्या अद्ययावत यादीतून वगळण्यात आले आहे, तर परनीत कौर आणि अभिषेक वर्मा यांच्यासारख्या कम्पाऊंड तिरंदाजांना मुख्य गटात पदोन्नती देण्यात आली आहे. दुसरीकडे, डेकॅथ्लॉनपटू तेजस्विन शंकरला टॉप्सद्वारे समर्थित खेळाडूंच्या अद्ययावत यादीतील विकास गटात स्थान मिळाले आहे. गत वर्षी ही यादी १७९ वरून ९४ पर्यंत मोठ्या प्रमाणात कमी करण्यात आली होती, ज्यामुळे २०२४ पॅरिस ऑलिम्पिकचे चक्र संपले होते. परंतु, गत एका वर्षातील कामगिरी प्रतिबिंबित करण्यासाठी ही यादी पुन्हा तयार करण्यात आली आहे. आता मुख्य गटातील खेळाडूंची संख्या किंचित वाढून ११८ झाली आहे, ज्यात ५७ सक्षम आणि ६१ पॅरा-अॅथ्लिटचा समावेश आहे. आशियाई स्पर्धेत पदक जिंकलेल्या आणि पॅरिसमध्ये स्पर्धा केलेल्या हुडाने गत वर्षी जुलैमध्ये निवड चाचणीदरम्यान डोप चाचणीत अपयश मिळवले होते.

## स्टीफनोसने निवृत्तीचा विचार केला होता

**अथेन्स** : दुखापतीने ग्रासलेल्या २०२५ च्या हंगामात निवृत्तीचा विचार केला होता, असे ग्रीसचा स्टार टेनिसपटू स्टीफनोस सितसिपासने उघड केले. जागतिक क्रमवारीत तिसऱ्या क्रमांकापर्यंत पोहोचलेल्या या २७ वर्षीय स्टीफनोसने २०२१ च्या फ्रेंच ओपन आणि २०२३ च्या ऑस्ट्रेलियन ओपन या दोन्ही स्पर्धांमध्ये नोवाक जोकोविचविरुद्ध उपविजेतेपद पटकावले होते. ऑगस्टमध्ये यूएस ओपनमधून दुसऱ्या फेरीत बाहेर पडल्यापासून केवळ दोन डेव्हिस चषक सामने खेळल्यानंतर आता जागतिक क्रमवारीत ३६ व्या क्रमांकावर असलेल्या स्टीफनोसने सांगितले की, सध्या सुरू असलेल्या वैद्यकीय उपचारांमुळे मला प्रगती दिसत आहे. ■

# राष्ट्रीय क्रीडा प्रशासन कायदा अंशतः लागू



◆ **नवी दिल्ली, १ जानेवारी**

राष्ट्रीय क्रीडा प्रशासन कायदा गुरुवारी अंशतः लागू झाला. या अंमलबजावणीमुळे सर्वशक्तिमान राष्ट्रय क्रीडा मंडळ (एनएसबी) आणि क्रीडा वाद सोडवण्यासाठी मध्यस्थी न्यायाधिकरणाची निर्मिती करण्याचा मार्ग मोकळा झाला.

हा कायदा गत वर्षी १८ ऑगस्ट रोजी अधिसूचित करण्यात आला होता आणि क्रीडा मंत्री मनसुख मांडवीय यांनी तो देशातील सर्वात मोठा क्रीडा सुधारणा म्हणून वर्णन केला आहे.

अंमलात आणल्या जाणाऱ्या तरतुदी राष्ट्रीय ऑलिम्पिक समिती, राष्ट्रीय पॅरालिम्पिक समिती, राष्ट्रीय क्रीडा महासंघ (एनएसएफ) व प्रादेशिक क्रीडा महासंघांसह राष्ट्रीय क्रीडा संस्थांच्या स्थापने आणि प्रशासन संरचनेशी संबंधित आहेत. ''कलम १ ते ३, कलम ४ मधील उप-कलम (१), (२) आणि (४), कलम ५ मधील उप-कलम (१) आणि (२), कलम ८ मधील उप-कलम (५), कलम ११ मधील उप-कलम (१), कलम १४ आणि १५, कलम १७ मधील उप-कलम (१) ते (७) आणि (१०), कलम ३० आणि ३१ आणि कलम ३३ ते ३८ मधील तरतुदी लागू होतील,'' असे मंत्रालयाच्या प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे.

कायद्याच्या तरतुदींनुसार निवडणुका झाल्यानंतर, सर्व संस्थांना किमान दोन खेळाडू (एसओएम) सह १५ पेक्षा जास्त सदस्यांसह कार्यकारी समित्या स्थापन करणे बंधनकारक असेल.

एनएसबीमध्ये एक अध्यक्ष आणि असे सदस्य असतील जे केंद्र सरकारद्वारे नियुक्त केले जातील आणि त्यांची नियुक्ती 'क्षमता, सचोटी व प्रतिष्ठा' असलेल्या आणि सार्वजनिक प्रशासन, क्रीडा प्रशासन, क्रीडा कायदा आणि इतर संबंधित क्षेत्रात विशेष ज्ञान किंवा व्यावहारिक अनुभव असलेल्या व्यक्तींमधून केली जाईल.

'हा कायदा टप्प्याटप्प्याने अंमलात आणण्याचा उद्देश वैधानिक क्रीडा प्रशासन चौकटीत सुरळीत संक्रमण सुनिश्चित करणे आहे', असे मंत्रालयाने म्हटले आहे.

मंत्रालयाने आधीच राष्ट्रीय क्रीडा महासंघांना (एनएसएफ) ज्यांच्या निवडणुका येत्या काही महिन्यांत होणार आहेत त्यांना कायद्याच्या पूर्ण अंमलबजावणीची प्रक्रिया डिसेंबरपर्यंत पुढे ढकलण्याची परवानगी दिली आहे. याचा अर्थ असा की, अखिल भारतीय फुटबॉल महासंघाच्या निवडणुका वर्षाच्या अगदी उशिरा होतील. प्रस्तावित तीन सदस्यीय एनएसबीला एनएसएफना संलग्नता देण्याचा अधिकारच नाही, तर त्यांच्या आर्थिक कामकाजावर लक्ष ठेवण्याचा आणि कायदा पूर्णपणे लागू झाल्यानंतर कोणत्याही गैरवर्तनासाठी त्यांना दंड करण्याचा अधिकार देखील असेल. ◀(वृत्तसंस्था)

# बांगलादेशी क्रिकेटपटू मुस्तफिजुरला केकेआर संघातून बाहेर काढा

### अध्यात्मिक गुरु देवकीनंदन ठाकूर यांचा शाहरुख खानच्या केकेआरला इशारा

◆ **मुंबई, १ जानेवारी**

जर कोलकाता नाईट रायडर्सने बांगलादेशी क्रिकेटपटू मुस्तफिजुर रहमानला संघातून बाहेर काढले नाही, त्याचा करार रद्द केला नाही, तर खेळ होईल, खूप मोठा खेळ होईल, असा इशारा अध्यात्मिक गुरू देवकीनंदन ठाकूर यांनी केकेआर व्यवस्थापनाला इशारा दिला.

शेजारील देश बांगलादेशमध्ये हिंदूंच्या लक्षित हत्यांदरम्यान आगामी इंडियन प्रीमियर लीग हंगामासाठी बांगलादेशी खेळाडू मुस्तफिजुर रहमानला शाहरुख खानच्या कोलकाता नाईट रायडर्सने खरेदी केल्याचा मुद्दा अध्यात्मिक गुरू देवकीनंदन ठाकूर यांनी मुंबईतील एका मेळाव्यात उपस्थित केला. मुस्तफिजुर रहमानला केकेआर या आयपीएल संघाने ९.२० कोटी रुपयांना विकत घेतले.

आम्ही म्हटले होते, याची तुम्हाला कल्पना आहे. बांगलादेशचा कोणताही





क्रिकेटपटू भारतात आला नाही पाहिजे. मात्र कोणत्या आयपीएल संघात बांगलादेशी आहे, याचा आम्ही शोध घेतला. एक बांगलादेशी क्रिकेटपटू आहे, जो आयपीएलमध्ये विकत घेतला आहे. शोध घेण्यासाठी कुठेच जायचे नाही, मुंबईतच एका संघाचा मालक आहे, आम्ही ऐकले आहे की, त्याचे त्या लोकांवर खूप प्रेम आहे, जे हिंदूंना दुःख देतात व तो मुंबईतच राहतो. त्या बांगलादेशी क्रिकेटपटूला कोणी विकत घेतले, हे आपण ऐकले आहे की, त्याला पाकिस्तानवर खूप प्रेम आहे, असे देवकीनंदन ठाकूर आपल्या अनुयासांशी संवाद साधताना म्हणाले.

अजूनही वेळ आहे, सावध व्हा, सुधारा, नाहीतर वेळ उलट्या दिशेने वाहू लागेल (तो पैसा कुठे जाईल व त्याचा वापर कशासाठी होईल?) सर्व हिंदू लोकांना मारले जाईल, आणि तो पैसा कोण देत आहे, जो स्वतःला भारतात हिरो म्हणवतो. जर केकेआरने मुस्तफिजुर रहमानला संघातून बाहेर काढले नाही, तर खेळ होईल, एक मोठा खेळ होईल, असा देवकीनंदन ठाकूर यांनी पुनरुच्चार केला.

एक प्रमुख आध्यात्मिक गुरु असलेले देवकीनंदन ठाकूर हे निंबार्क संप्रदायाशी संबंधित आहेत. भागवत पुराणावर ओघवती प्रवचने (कथा) देण्यासाठी आणि भक्तिमय कीर्तन करण्यासाठी ते सर्वत्र ओळखले जातात. विश्व शांती सेवा चॅरिटेबल ट्रस्टच्या माहितीनुसार, वयाच्या १३ व्या वर्षी, आपल्या सद्‌गुरुंच्या आश्रयाने आणि आशीर्वादाने, त्यांनी लहानपणीच संपूर्ण श्रीमद् भागवत महापुराण अभ्यासले आणि मुखोद्‌गत केले. ◀(वृत्तसंस्था)

## मुंबई इंडियन्स महिला संघाचा नववर्षाचा जल्लोष

**नवी दिल्ली** - मुंबई इंडियन्सच्या महिला प्रीमियर लीग संघाच्या खेळाडूंनी आणि कोचिंग स्टाफने कॅम्पमध्येच एका शानदार सोहळ्याने नवीन वर्षाची सुरुवात केली. फ्रॅन्चायझीने स्पर्धेच्या चौथ्या हंगामापूर्वी शिबिरात सहभागी झालेल्या व प्रशिक्षण सुरू केलेल्या सर्व सदस्यांसाठी एका पार्टीचे आयोजन केले होते. मुंबई इंडियन्सने आपल्या समाज माध्यम हॅण्डलवर या जल लोषाचा एक व्हिडीओ सामायिक केला आहे, यात खेळाडू, मुख्य प्रशिक्षक लिसा कीथली व गोलंदाजी प्रशिक्षक झुलन गोस्वामी केक कापत, नाचताना आणि आनंद साजरा करताना दिसत आहेत. दोन वेळच्या विजेत्या मुंबई इंडियन्सने गत शुक्रवारपासून आपल्या प्रशिक्षण शिबिराला सुरुवात केली आहे. डब्ल्यूपीएलचा चौथा हंगाम दोन ठिकाणी होणार आहे.

# ऑस्ट्रेलियाचा टी-२० विश्वचषक संघ जाहीर

**मेलबर्न, १ जानेवारी**

भारत व श्रीलंकेत होणाऱ्या आगामी टी-२० विश्वचषकासाठी गतविजेत्या ऑस्ट्रेलियाने आपला १५ सदस्यीय संघ जाहीर केला असून ऑस्ट्रेलियन निवडकर्त्यांनी संघात फिरकी गोलंदाजांना प्राधान्य देण्यात आले आहे. २०२१ च्या विश्वचषक स्पर्धेच्या विजेत्यांनी गुरुवारी टी- २० क्रिकेटमधून निवृत्त झालेल्या मिचेल स्टार्कच्या अनुपस्थितीत एकाही डावखुऱ्या वेगवान गोलंदाजाची निवड न करण्याचा निर्णय घेतला. गत १२ टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यां ध्ये न खेळलेल्या कूपर कॉनलीचा संघात समावेश हा एक



आश्चर्याचा धक्का आहे. स्टार्कने गत सहा आयसीसी टी-२० स्पर्धांपैकी केवळ एकच स्पर्धा चुकवली होती, परंतु गत वर्षीच्या अखेरीस त्याने आंतरराष्ट्रीय स्तरावर या फॉरमॅटमधून निवृत्ती घेतली. ऑस्ट्रेलिया ११ फेब्रुवारी रोजी कोलंबोध्ये आयर्लण्डविरुद्ध स्पर्धेची सुरुवात करेल, त्यानंतर १३ फेब्रुवारी रोजी कोलंबोध्ये झिम्बाब्वेविरुद्ध खेळेल, त्यानंतर १६ फेब्रुवारी रोजी कॅण्डीमध्ये श्रीलंकेविरुद्ध व २० फेब्रुवारी रोजी ओानविरुद्ध सामने खेळेल. पॅट कमिन्सच्या पाठीच्या दुखापतीची या महिन्याच्या अखेरीस होणारी तपासणी तो स्पर्धेत खेळणार की नाही हे निश्चित करेल. जोश हेझलवूड व टिम डेव्हिड हे दोघेही हॅस्ट्रिंगच्या दुखापतीतून सावरत आहेत. आयसीसीच्या नियमांनुसार, ३१ जानेवारीपर्यंत संघात बदल करण्याची परवानगी आहे. ऑस्ट्रेलिया या महिन्याच्या अखेरीस पाकिस्तानविरुद्ध तीन सामन्यांची टी-२० मालिका खेळणार आहे. ऑस्ट्रेलियाचे गटस्तरीय सामने श्रीलंकेत खेळले जाणार आहेत, परंतु जर संघ पात्र ठरला, तर सुपर एटमधील काही सामन्यांसाठी संघ भारतात प्रवास करेल.

**ऑस्ट्रेलिया संघ** : मिचेल मार्श (कर्णधार), झेव्हियर बार्टलेट, कूपर कॉनली, पॅट कमिन्स, टिम डेव्हिड, कॅमेरॉन ग्रीन, नॅथन एलिस, जोश हेझलवूड, ट्रॅव्हिस हेड, जोश इंग्लिस, मॅथ्यू कुहनेन, ग्लेन मॅक्सवेल, मॅथ्यू शॉर्ट, मार्कस स्टोइनिस, अॅडम झॅम्पा.



## फुटबॉल स्पर्धेत सोशल महाविद्यालयास विजेतेपद

**सोलापूर, दि. १ जानेवारी-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ आंतरमहाविद्यालयीन फुटबॉल स्पर्धेत सोलापूर सोशल महाविद्यालाने विजेतेपद पटकाविले.

हिराचंद नेमचंद वाणिज्य महाविद्यालयतर्फे वालचंद क्रीडा संकुल झालेल्या या स्पर्धेत सोशलने स्वेरी कॉलेज पंढरपूरचा ४-० असा पराभव करून उपांत्य फेरी गाठली. उपांत्य फेरीत वालचंद अभियांत्रिकीचा २-० अशी मात केली.

अंतिम सामन्यात संगमेश्वर महाविद्यालयाचा २-० ने नमविले. या स्पर्धेत सोशलतर्फे कर्णधार अल्तमश वलसंकर, रेहान मुल्ला, आबिद शेख, अबू हुरेरा सालार, दानियाल दिवान, समीउल्ला आरेवाले व गोलरक्षक रहमान बच्चेभाई यांनी सुरेख खेळाचे प्रदर्शन केले विजयी संघास महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण व क्रीडा संचालक डॉ.मुश्ताक शेख व तलहा शेख यांचे मार्गदर्शन लाभले. विजयी संघाचे महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.आय. जे.तांबोळी यांनी अभिनंदन केले.

# नवले सिंहगडच्या वार्षिक क्रीडा सप्ताहास सुरवात

### माजी विद्यार्थी आंतरराष्ट्रीय खेळाडू मालप-होमकर यांच्या हस्ते उद्घाटन

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर,**
**दि. १ जानेवारी-**

सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळ संचलित एन बी नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या वार्षिक क्रीडा सप्ताह अर्थात एन्थुझिया२०२५चे माजी विद्यार्थी तथा आंतरराष्ट्रीय तलवारबाजी खेळाडू श्वेतांबरी मालप-होमकर यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.

यावेळी माजी कुलगुरू तथा सीआरटीडीचे संचालक प्रा. एस. एच. पवार, प्राचार्य डॉ. शंकर नवले, उपप्राचार्य



डॉ. आर. टी. व्यवहारे, निबंधक डॉ. डी. आय. नवले, पब्लिक स्कूलच्या प्राचार्या शाहीन शेख, उपप्राचार्य प्रकाश नवले यांची उपस्थिती होती.

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी क्रीडा व शारीरिक तंदुरुस्तीला महत्त्व देण्याच्या उद्देशाने या क्रीडा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. यात मुलींचा उत्स्फूर्त सहभाग दिसून आला.

सर्व क्रीडा प्रकारात मुलींनी हिरिरीने सहभाग नोंदविला आहे. या महोत्सवात क्रिकेट, व्हॉलीबॉल, कबड्डी, फुटबॉल, खो-खो, हॉकी, टेबल टेनिस, कॅरम, बुद्धिबळ, अॅथलेटिक्स आदी क्रीडा प्रकारांचे आयोजन केले आहे.

### महाविद्यालयाच्या योगदानामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर

उद्घाटक मालप- होमकर म्हणाल्या, याच महाविद्यालयातून इंजिनिअरिंग पूर्ण केले. महाविद्यालयाच्या योगदानामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहचले. क्रीडा स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांमध्ये संघभावना, शिस्त, नेतृत्वगुण व क्रीडावृत्ती विकसित होण्यास मदत होते. कॅम्पस डायरेक्टर संजय नवले, प्राचार्य डॉ. शंकर नवले यांच्यासह सर्व विभाग प्रमुखाचे सहकार्य लाभले.

## सांगोला महाविद्यालयाच्या तिघींची विद्यापीठ बास्केटबॉल संघात निवड

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. १ जानेवारी-**

सांगोला महाविद्यालयात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ आयोजित आंतर महाविद्यालयीन बास्केटबॉल स्पर्धा झाल्या.

यातून सांगोला महाविद्यालयातील मुलींच्या संघाने उल्लेखनीय कामगिरी केल्यामुळे महेक इरफान मुलाणी, शितल अंकुश बाबर आणि सुप्रिया बाळासो भुईटे या तिघींची निवड झाली.

एल.एन.आय.पी.इ. ग्वाल्हेर येथे होणाऱ्या पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ स्पर्धेसाठी त्यांची निवड झाली. त्यांनी स्वामी रामानंद तीर्थ



मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथे होणाऱ्या क्रीडा महोत्सव स्पर्धेतही भाग घेतला होता.

त्यांचे संस्थेचे अध्यक्ष बाबुराव गायकवाड, उपाध्यक्ष तात्यासाहेब केदार, प्रा.पी.सी. झपके, खजिनदार नागेश गुळमिरे, सचिव अॅड. उदयबापू घोंगडे, सहसचिव साहेबराव ढेकळे, बास्केटबॉल संघास मार्गदर्शन करणारे प्र.प्राचार्य डॉ. सुरेश भोसले, क्रीडा शिक्षक प्रा.जगदीश चेडे व क्रीडा समिती सदस्य यांनी संघाचे अभिनंदन केले. कार्यकारिणी सदस्य सुरेश फुले यांच्या हस्ते विद्यार्थिनींचा सन्मान करण्यात आला.

## साबळे नेत्र रुग्णालयातर्फे दिव्यांग क्रिकेटपटू गंगा कदमचा सन्मान



**सोलापूर, दि. १ जानेवारी-**

एच.व्ही देसाई आय हॉस्पिटल, पुणेचा प्रकल्प असलेल्या येथील शंकरशेठ साबळे नेत्ररुग्णालय बाळे येथे भारताच्या अंध महिला क्रिकेट संघाची उपकर्णधार गंगा कदम हिचा सत्कार झाला. रुग्णालयाच्या मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. रेश्मा मेहता, मुख्य प्रशासकीय अधिकारी सुधीर सुधाळ आणि मुख्य कामकाज अधिकारी डॉ.सुशीला कवाडे हे मान्यवर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. नर्सिंग प्रमुख अमलदास घोडके म्हणाले, रुग्णालयाच्या स्थापनेपासून आजपर्यंत २००० पेक्षा अधिक यशस्वी नेत्र शस्त्रक्रिया करण्यात आल्या आहेत. यानंतर डॉ. सुशीला कवाडे यांच्या हस्ते गंगा कदम व प्रशिक्षक अनिल सांब्राणी यांचा सत्कार करण्यात आला. डॉ. श्रीकांत जाधव यांनी आभार मानले. सूत्रसंचालन प्रथमेश कासार यांनी केले.

# महाराष्ट्राच्या कुमार व मुली संघाची विजयी सलामी



### ४४वी कुमार राष्ट्रीय अजिंक्यपद खो-खो स्पर्धा

**बेंगलुरू, दि. १ जानेवारी-**

महाराष्ट्राच्या कुमार व मुलींनी ४४व्या राष्ट्रीय अजिंक्यपद खो-खो स्पर्धेची विजयी सलामी दिली.

कर्नाटका खो-खो असोसिएशनच्या वतीने बेंगलुरू शहरातील गुंजर मैदानावर सुरू झालेल्या या स्पर्धेत जितेंद्र वसावेने (४.१० मि. व ६ गुण) व राज जाधव (१.२० मि. व ६ गुण) यांच्या अष्टपैलू खेळामुळे महाराष्ट्राच्या कुमारांनी राजस्थानवर ३८-८ असा एक डाव राखून ३० गुणांनी दणदणीत विजय मिळविला. हरद्या वासावेनेही २ मिनिटे पळती करीत संरक्षणाची बाजू सांभाळली. राजस्थानकडून नरेशने (१ मि. व २ गुण) एकाकी लढत दिली.

मुलींनीही झारखंडचा ६२-८ असा धुव्वा उडविला. श्रावणी तामखेडे (३.३० मि. व २ गुण), श्रुती चोरमारे (२.४० मि. व ६ गुण) व धनश्री कंक (२,५० मि. व ८ गुण) हे महाराष्ट्राच्या विजयाचे शिल्पकार ठरले. झारखंडच्या नंदिनीकुमार व चंदीराणी यांचे प्रयत्न अपुरे पडले.

### विदर्भच्या कुमारांची चंदीगडवर मात

राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्रातील विदर्भ व कोल्हापूरचे संघही स्वतंत्रपणे भाग घेत असतात. विदर्भच्या कुमार संघाने चंदीगडवर ३३-१६ अशी एक डाव राखून १७ गुणानी मात केली. विदर्भच्या सुजक खंदारेने (४ मि.व ४ गुण) अष्टपैलू खेळी केली. हर्षल मोरे (१.३०, ४.२० मि.) व झैद खान (२.२०) यांनी संरक्षणाची बाजू सांभाळली.

### कोल्हापूरच्या दोन्ही संघाचे शानदार विजय

कोल्हापूरच्याही कुमार व मुली संघाने दणदणीत विजय मिळविले. कुमारांनी दोन शानदार विजयाची नोंद केलवी. योगेश मंचीकट्टाचा (२.४५मि. व २ गुण) अष्टपैलू खेळ आणि सिद्धेश माने (४.४० मि.) व राजेश मांगलेकरच्या (२.४५मि.) शानदार संरक्षणाच्या खेळीमुळे कुमार संघाने चंदीगडला ४२-४ असे एक डाव राखून ३८ गुणांनी नमविले. दुसऱ्या सामन्यात गोव्यावर ४४-८ अशी डावानी पराभूत केले. कोल्हापूरकडून प्रसाद शेळके (४.३० मि.), श्रावण वाडेकर (२.५० मि. व ६ गुण) व उदय पडाळकर ( ८ गुण) तर गोव्याकडून रजत वेलीप (१मि.) व क्रीश गावकर (२गुण) यांची कामगिरी उल्लेखनीय ठरली.

मुलींनी आंध्रप्रदेशला ५०-१० असे एक डा राखून ४० गुणांनी हरविले. कोल्हापूरच्या विजयात चैत्राली अवधूत (४.२० मि.), श्रावणी पाटील (३.२० मि.व ६ गुण)व भक्ती तुरंभेकर (२.२० मि. व ३ गुण) यांच्या महत्वपूर्ण वाटा आहे.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा,
छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली,
जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर
(कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# वाशिंबे येथे प्रस्तावित सौर ऊर्जा प्रकल्पाला धरणग्रस्त शेतकऱ्यांचा तीव्र विरोध

**तभा वृत्तसेवा,**
**जेऊर दि.१ जानेवारी २०२६**

वाशिंबे ता.करमाळा येथील गायरान गट क्रमांक १४३ मध्ये प्रस्तावित सौर ऊर्जा प्रकल्पामुळे धरणग्रस्त शेतकरी व ग्रामस्थांमध्ये तीव्र संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. उजनी जलाशयातून धरणग्रस्त शेतकऱ्यांच्या शेतीला पाणीपुरवठा करणाऱ्या अंदाजे ६० पाईपलाईन या परिसरातून जात असून, सौर प्रकल्पामुळे या पाईपलाईन काढाव्या लागणार आहेत.

**शेतीला पाणीपुरवठा धोक्यात**

या पाईपलाईनच्या माध्यमातून वाशिंबे व राजुरी गावातील धरणग्रस्त शेतकऱ्यांची शेती सिंचनाखाली आहे. पाईपलाईन हटवल्यास पाणीपुरवठा पूर्णपणे बंद होऊन शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होण्याची भीती व्यक्त होत आहे.

**ग्रामदैवताच्या रस्त्यावर कायमस्वरूपी अडथळा**

सौर ऊर्जा प्रकल्पामुळे वाशिंबे गावचे ग्रामदैवत भैरवनाथ मंदिराकडे जाणारा रस्ता कायमस्वरूपी बंद होणार असल्याने ग्रामस्थांमध्ये नाराजी आहे. धार्मिक व सामाजिक दृष्टिकोनातून हा रस्ता अत्यंत महत्त्वाचा असल्याचे ग्रामस्थ सांगतात.



**फळबागा व निर्यातक्षम शेती धोक्यात**

वाशिंबे परिसरात ऊस, केळी, पेरू, वेलची केळी तसेच विविध फळबागांचे मोठ्या प्रमाणावर उत्पादन घेतले जाते. विशेषतः वाशिंबे येथील वेलची केळीला आखाती देशांमध्ये तसेच मोठ्या रिटेल मॉलमध्ये मोठी मागणी आहे. सौर प्रकल्पामुळे या फळबागांचे अस्तित्व संपुष्टात येण्याची शक्यता असून शेतकऱ्यांचे उपजीविकेचे मुख्य साधन बंद होणार आहे.

**पशुधन चाऱ्याचा गंभीर प्रश्न**

सदर गायरान जमिनीचा वापर गावातील गुरे चारण्यासाठी केला जातो. पशुवैद्यकीय विभागाच्या आकडेवारीनुसार वाशिंबे गावात ३,१४४ इतकी पशुधन संख्या आहे. सौर प्रकल्प उभारल्यास चाऱ्याची तीव्र टंचाई निर्माण होऊन पशुपालक शेतकऱ्यांवर मोठे संकट ओढवणार आहे.

**आधीच मोठ्या प्रमाणात भूसंपादन**

यापूर्वी उजनी धरणामुळे वाशिंबे परिसरातील ९०० एकरहून अधिक जमीन संपादित झाली आहे. तसेच पुणे-सोलापूर रेल्वे लोहमार्गासाठीही मोठ्या प्रमाणात भूसंपादन झाले आहे. अशा परिस्थितीत नव्याने प्रस्तावित सौर ऊर्जा प्रकल्प शेती व पशुधनासाठी अधिक त्रासदायक ठरत असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.

**प्रकल्प रद्द करण्याची जोरदार मागणी**

या सर्व कारणांमुळे धरणग्रस्त शेतकरी व ग्रामस्थांकडून वाशिंबे येथील प्रस्तावित सौर ऊर्जा प्रकल्प तात्काळ रद्द करण्यात यावा, अशी जोरदार मागणी करण्यात येत आहे. प्रशासनाने याची दखल न घेतल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही शेतकऱ्यांनी दिला आहे.

## महत्वाचे...



### लोकसेवा विद्यामंदिरच्या प्राचार्यपदी बसप्पा घाटे

**तभा वृत्तसेवा,**
**दक्षिण सोलापूर, दि. १ जानेवारी-**

मंद्रूप येथील लोकसेवा विद्यामंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्य तथा मुख्याध्यापकपदी बसप्पा घाटे यांची निवड करून नवीन वर्षाची भेट दिली. शिक्षण प्रसारक मंडळ, मंद्रूप संस्थेचे सचिव तथा माजी सभापती गुरूसिध्द म्हेत्रे यांनी ही निवड केली. लोकसेवा शाळेतील शिक्षक व विद्यार्थीप्रिय हिंदी शिक्षक सर्व धार्मिक, राजकीय, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रामध्ये हिरीरीने काम करणारे म्हणून घाटे यांची ख्याती आहे. यावेळी उपप्राचार्य म्हणून बसप्पा कुमठेकर यांची नियुक्ती करण्यात आली. नवीन वर्षाच्या पहिल्याच दिवशी या निवडी प्रसंगी संस्थेचे सहसचिव तथा माजी युवा सरपंच अप्पासाहेब म्हेत्रे, पर्यवेक्षक मदगोंडा मलकारी, श्रीधर टेळे, प्रा.अडवीतोटे आदी उपस्थित होते. श्री. घाटे यांचा माजी सभापती म्हेत्रे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. नियुक्तीबद्दल प्राचार्य घाटे यांचे संस्थेचे अध्यक्ष शिवशरण अण्णा पाटील, संचालक मंडळ, ग्रामदैवत मळसिध्दप्पाचे पुजारी व शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, मल्लिकार्जुन वस्तीगृहाचे अधिक्षक व समस्त शिक्षक, शिक्षिका, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आदींनी त्यांचे अभिनंदन केले. या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन व आभारप्रदर्शन धानप्पा बंगले यांनी केले.

### मोडनिंब येथे नववर्षाचे दुग्धपानाने स्वागत

**मोडनिंब, दि.१ जानेवारी-**

मोडनिंब (ता.माढा) येथे नववर्षाच्या स्वागतानिमित्त शहरात दुग्धपान उपक्रम राबविण्यात आला. दुग्धपान उपक्रमात तरुणांसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. तरुणांनी व्यसनांपासून दूर राहून शिक्षण, क्रीडा याबरोबरच सामाजिक उपक्रमांमुळे समाजात व्यसनमुक्तीचा संदेश प्रभावीपणे पोहोचतो, असे मत ग्रामपंचायत सदस्य बालाजी पाटील यांनी व्यक्त केले. तरुणांनी सुदृढ व सकारात्मक जीवनशैली स्वीकारावी, असे आवाहन उदयकीर्ती उद्योग समूहाचे उदय माने यांनी केले. यावेळी तरुणांनी व्यसनापासून दूर राहण्याचा संकल्प करत नववर्षाचे जल्लोषात स्वागत केले. या उपक्रमामुळे सामाजिक जागृतीला चालना मिळाल्याचे मत ग्रामस्थांनी व्यक्त केले.

### महाराष्ट्र राज्य पोलीस मित्र संपर्क प्रतिनिधीपदी अमोल जाधव



**करमाळा,दि.१ जानेवारी-**

महाराष्ट्र राज्य पोलीस मित्र परिवार संघटनेच्या संपर्क प्रतिनिधीपदी समाजकारण, जनसंपर्क आणि लोकसेवा क्षेत्रात कार्य करणारे अमोल जाधव यांची निवड करण्यात आली आहे. त्यांच्या निवडीमुळे संघटनेला सक्षम, दूरदृष्टी असलेले आणि समाजहिताच्या कामाला सदैव प्राधान्य देणारे नेतृत्व लाभले असल्याची भावना कार्यकर्त्यांमध्ये व्यक्त होत आहे. अमोल जाधव यांनी अनेक कायदा-सुव्यवस्था बळकटीकरण, युवकांना दिशा देणारे प्रयत्न तसेच समाजातील वंचित घटकांसाठी सातत्याने कार्य केले आहे. त्यांच्या कामामुळे समाजात पोलीस प्रशासनाबद्दल जनतेत विश्वास, संवाद व सहकार्याची भावना बळकट झाली आहे. याच उल्लेखनीय कार्याचा गौरव म्हणून त्यांची या प्रतिष्ठित पदावर निवड झाली आहे.



### मैंदर्गी ते दुधनी रस्त्याची दयनीय अवस्था, वाहन चालकातून तीव्र संताप

**अक्कलकोट, दि. १ जानेवारी-**

अक्कलकोटच्या दुधनी, गाणगापूरकडे जाणाऱ्या राज्य मार्गावर प्रवास करणे जीवघेणे ठरत आहे. मैंदर्गी ते दुधनी पर्यंतच्या रस्त्याची दयनीय अवस्था झाली असून वाहन चालकांतून तसेच नागरिकांतून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. सदरचा खराब रस्ता हा लवकरात लवकर नवीन तयार करून वाहनधारकांसह नागरिकांना दिलासा देण्याची मागणी केली जात आहे. अक्कलकोटच्या दुधनी तसेच कर्नाटकातील तीर्थक्षेत्र गाणगापूर कडे जाणाऱ्या भाविक भक्तांच्या वाहनांची संख्या प्रचंड आहे. तसेच अक्कलकोट ते अफजलपुर कर्नाटकात जाणाऱ्या वाहनांची संख्या प्रचंड आहे. अक्कलकोट - मैंदर्गी, दुधनी राज्य मार्ग हा रहदारीचा असून हा मार्ग सध्या धोकादायक बनला आहे. या खराब रस्त्यावरूनच महाराष्ट्रातील भाविकांना गाणगापूर तीर्थक्षेत्री श्री दत्त दर्शनासाठी जावे लागत आहे.

## निधन वृत्त...

### सागर गाढवे



**बार्शी दि.१ जानेवारी-**

सागर डेकोरेटर्सचे संचालक सागर सुधीर गाढवे (वय ४५, रा. नाळे प्लॉट, बार्शी) यांचे मंगळवारी रात्री पुण्यातील पुना हॉस्पिटल येथे दु:खद निधन झाले. विविध सामाजिक, धार्मिक व कौटुंबिक कार्यक्रमांमध्ये त्यांच्या कामाची विशेष दखल घेतली जात होती. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, मुलगा व बहीण असा परिवार आहे.

## खांडवी गावाजवळ भीषण अपघात; दोघांचा मृत्यू, तिघे जखमी

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.१ जानेवारी-**

तालुक्यातील खांडवी गावाच्या पुढे कुर्डुवाडी रोडवर मंगळवारी सायंकाळी झालेल्या भीषण रस्ते अपघातात दोघांचा मृत्यू झाला असून, तीन जण गंभीर जखमी झाले आहेत.

या अपघातात चालक नामदेव शिवाजी पालखे (वय ४३) व निलेश भिकाजी केकाण (वय ४५, रा. शेलगाव वांगी, ता. करमाळा) यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला तर शिवशाला परमेश्वर होंगे (वय ५५), मिकाजी केरबा केकाण (वय ६०) व नीशा निलेश केकाण (वय ३३) हे तिघे जखमी असून, त्यांच्यावर उपचार सुरु आहेत. याबाबत कुलदीप मुरलीधर काळे (वय ३९, रा. पानगांव, सध्या राऊत चाळ, बार्शी) यांनी बार्शी तालुका पोलीस ठाण्यात खबरी जबाब दिला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी यांच्या मालकीची इर्टीगा कार (क्र. एमएच-१३ डीई ९३१२) त्यांचे मित्र नामदेव शिवाजी पालखे (रा. पिंपळगाव दे., ता. बार्शी) हे पुणे येथे मित्रांना सोडण्यासाठी घेऊन गेले होते. दरम्यान, सायंकाळी सुमारे ७.१५ वाजण्याच्या सुमारास खांडवी गावाच्या पुढे इर्टीगा कार व सळईने भरलेल्या ट्रॅक्टर-ट्रॉलीचा अपघात झाल्याची माहिती मिळाली.

घटनास्थळी पाहणी केली असता, इर्टीगा कार रस्त्याच्या डाव्या बाजूस पश्चिमेकडे तोंड करुन उभी असून ती मोठ्या प्रमाणात नुकसानग्रस्त झाली होती. समोर सळयांनी भरलेली ट्रॅक्टर ट्रॉली उभी होती, ज्यातील सळया पाठीमागील बाजूस बाहेर आलेल्या होत्या. सदर ट्रॅक्टरला क्रमांक नसल्याचेही निदर्शनास आले. अपघातातील सर्व जखमींना उपचारासाठी बार्शी येथील जगदाळे मामा हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले.

मात्र, या गंभीर अपघाताबाबत बार्शी तालुका पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक दत्तात्रय भालेराव व हेड कॉन्स्टेबल रुपेश शेलार पुढील तपास करीत आहेत.



## आ.डॉ.देशमुख यांची बदनामी केल्याप्रकरणी शेकापकडून सांगोला पोलिसांना निवेदन

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.१ जानेवारी-**

सांगोल्याचे आमदार डॉ.बाबासाहेव देशमुख व त्यांच्या कुटुंबाची बदनामी केल्याबाबत शेकापने सांगोला पोलीस निरीक्षक विनोद घुगे यांना निवेदन देण्यात आले.

यावेळी समाधान पाटील, माणिक वाघमारे, नंदकुमार शिंदे, समाधान पवार, आबासाहेब बाबर, मुकेश काशीद, आबासाहेब बंडगर, कल्याण भोसले, नंदकुमार यादव, दत्ता जाधव, सोमनाथ शिंदे, नरेश बनसोडे, अमजद बागवान, शिवाजी शेजाळ, हेमंत शिंदे, आबासाहेब मोटे, नवनाथ शिंगाडे, आकाश व्हटे, सूरज लवटे यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते. आ.डॉ. देशमुख यांची बदनामी व राजकीय हेतूने प्रेरित दोन समाजात तेढ निमणिाचे षडयंत्र रचले. या षडयंत्रामधील सर्वांची नावे जनतेसमोर येणे आवश्यक आहे. कायदा व सुव्यवस्था भंग करणाऱ्या या सुनियोजित षडयंत्राच्या सखोल चौकशीची मागणी निवेदनाद्वारे शेकापने केल्याची माहिती चिटणीस दादासाहेब बाबर यांनी दिली.

## सरपडोह शाळेत माजी विद्यार्थी संघाची कार्यकारिणी बिनविरोध

**तभा वृत्तसेवा,**
**जेऊर, दि.१ जानेवारी-**

सरपडोह (ता. करमाळा) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या माजी विद्यार्थी संघाची कार्यकारिणी नुकतीच बिनविरोध निवडण्यात आली. या निवडीत दत्तात्रय खराडे यांची अध्यक्षपदी, तर बाळासाहेब भिताडे यांची उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. शरद घोगरे यांच्याकडे खजिनदारपदाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

कार्यकारिणी सदस्य म्हणून अरूण चौगुले सर, नाथाराव रंदवे सर, हरिश्चंद्र गवारे साहेब, हनुमंत खरात साहेब, दिपक गायकवाड, प्रदीप भिताडे साहेब, इंद्रजित रंदवे सर, गणपत घोगरे, संदीप चोरमले, शिवाजी वाळके, मोहन पाटील, भारत भिताडे, महेश बोंद्रे व अर्चना भंडारे यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे.

नूतन कार्यकारिणीच्या माध्यमातून शाळेच्या शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी तसेच शाळेच्या भौतिक व शैक्षणिक सुविधांच्या वृद्धीसाठी विविध उपक्रम राबविण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

या निवडीबद्दल ग्रामस्थ, शिक्षकवृंद व माजी विद्यार्थ्यांकडून नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

## चंद्रशेखर विद्यालयाच्या आठवडी बाजारात २५ हजारांची उलाढाल

**तभा वृत्तसेवा,**
**श्रीपूर, दि.१ जानेवारी-**

श्रीपूर (ता. माळशिरस) येथील चंद्रशेखर विद्यालय व नारायणकाका आगाशे कनिष्ठ महाविद्यालय स्नेहसंमेलनानिमित्त युवोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. यानिमित्त विविध मनोरंजनात्मक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून त्याचाच एक भाग म्हणून आठवडी बाजाराचे आयोजन करण्यात आले होते . यामध्ये सुमारे २५ हजार रुपयांची उलाढाल झाली.



विद्यार्थीना व्यवहारिक पातळीवर ज्ञान व्हावे या उद्देशाने या बाजाराचे आयोजन करण्यात आले होते यात विद्यार्थ्यांनी जीवनावश्यक वस्तू बरोबर पाणीपुरी, मिसळ, भेळ, वडापाव यांचे ही स्टॉल लावले होते. पालकांनी आवर्जुन या बाजारात भाजी खरेदी करून विद्यार्थ्यांचा उत्साह वाढविला.

बुधवार दि ३१ डिसेंबर गुरुवार दि. १ जानेवारी असे दोन दिवस हा युवोत्सव झाला. विद्यार्थ्यांच्या अंगी असणाऱ्या सुप्तगुणांच्या माध्यमातून विविध गुणदर्शनाचे सादरीकरण झाले.

अध्यक्ष तथा आबासाहेब देशमुख चॅरिटेबल ट्रस्ट चे अध्यक्ष डॉ. रामदास देशमुख यांच्या संकल्पनेतून होत असलेल्या आठवडी बाजाराचे उद्घाटन इम्रान शेख व शिक्षक पालक संघाचे उपाध्यक्ष अनिल सावंत यांचे हस्ते करण्यात आले. यावेळी प्राचार्य पांडुरंग बनसोडे, उपमुख्याध्यापक सुनिल गवळी , पर्यवेक्षक सिताराम गुरव, जेष्ठ शिक्षक सुहास शेन्डे, सुनिल हासबे, मो. कृ. लाळे, ता. दे. बिचुकले, ह. म. मोरे, विद्यार्थी प्रतिनिधी व.सं. रेडे, मौ, अ. द. नाईकनवरे, विद्यार्थीनी प्रतिनिधी प्रि.प्र. शेळके, मौ. का. हाके उपस्थित होते.

## नाळेवस्ती शाळेस पालकांकडून नववर्षाची अनोखी भेट

**तभा वृत्तसेवा**
**टेंभुर्णी, दि.१ जानेवारी-**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नाळेवस्ती या शाळेसनाळेवस्ती वेणेगाव चे प्रसिद्ध बागायतदार श्री.संतोष दादा नाळे यांच्या वाढदिवसानिमित्त शाळेतील विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी एलईडी टीव्ही भेट दिला. सध्याच्या तंत्रज्ञानाच्या युगात स्पर्धेत टिकून राहण्यासाठी, विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी आणि मराठी शाळा टिकवून ठेवण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर करणेगरजेचे आहे ही गरज ओळखून त्यांनी वाढदिवसानिमित्त शाळेला ही नववर्षानिमित्त अनोखी भेट दिली..



यावेळी शाळेत मुख्याध्यापक सुमन कुटे मॅडम, रणजीत नाळे ,केलास नाळे,सुशिलकुमार नाळे ,रतन खोटे उपस्थित होते. सर्वांनी दादांचे या सहकार्याबद्दल आभार मानले व समाजातील इतर घटकांनीही प्रेरणा घ्यावी अशी इच्छा व्यक्त केली.

## मोडनिंबच्या शाळेत व्यवस्थापन समितीचे पुनर्गठन

**तभा वृत्तसेवा**
मोडनिंब, दि.१ जानेवारी-

मोडनिंब ( ता. माढा) येथील पीएमश्री जिल्हा परिषद प्राथमिक मुलींची शाळा येथे बुधवारी रोजी सन २०२६-२८ कालावधीसाठी शाळा व्यवस्थापन समिती पुनर्गठन संबंधी पालक सभा पार पडली.या सभेत गणेश शहाजी नाईक यांची शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी तर विजयनाथ अशोक पवार यांची उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली.

प्रत्येक वर्गातून जस्मिन नवाज शेख, प्रियंका महेश सरवदे, तृप्ती अनिल शिंदे, शहाजी संदिपान माळी, पिंकू समाधान चव्हाण, विजयनाथ अशोक पवार, किरण हरी खडके, दिपाली बालाजी गायकवाड, धनश्री अमर ओहोळ, अनिल शामराव शिंदे, रेश्मा औदुंबर मोहिते, सिद्धेश्वर केशव साळुंखे, गणेश शहाजी नाईक व सुजाता सतीश ओहोळ यांची सदस्यपदी बिनविरोध निवड करण्यात आली.याशिवाय शिक्षणप्रेमी सदस्य म्हणून बालाजी वाघमारे यांची पालक सभेमधून गुप्त मतदान पद्धतीने निवड करण्यात आली. शिक्षक प्रतिनिधी म्हणून रत्नप्रभा जाधव, तर विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून आरुषी पाटील व सृष्टी जाडकर यांची निवड करण्यात आली.यावेळी विस्ताराधिकारी ढाले मुख्याध्यापक राजन सावंत उपस्थित होते. ही निवड प्रक्रिया यशस्वीपणे पार पाडण्यासाठी मुख्याध्यापक हरिभाऊ जाधव व सर्व शिक्षकवृंद यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमादरम्यान पोलीस कॉन्स्टेबल देवकर यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

## वेळापूर जि.प. मुलींच्या शाळेस हँडवॉश बेसिन भेट

### रोटरी क्लब व भक्ती कॉम्प्युटर टायपिंग इन्स्टिट्यूटचे योगदान

**तभा वृत्तसेवा,**
**वेळापूर, दि.१ जानेवारी-**

नवीन वर्षारंभदिनी अकलूजच्या रोटरी क्लब आणि भक्ती कॉम्प्युटर टायपिंग इन्स्टिट्यूटच्या बॅच जून २०२५ तर्फे येथील जिल्हा परिषद मुलींच्या शाळेस उत्तम दर्जाचे हँडवॉश बेसिन भेट देण्यात आले.

यावेळी रोटरी क्लबचे अध्यक्ष केतन बोरावके यांनी वॉश बेसिनची ही भेट म्हणजे केवळ एक वस्तू नसून स्वच्छता आरोग्य आणि चांगल्या सवयींचा संदेश असल्याचे मत व्यक्त केले. मुख्याध्यापक युन्नुस तांबोळी यांनी प्रास्ताविक केले. अजिंक्य जाधव व गजानन जवंजाळ यांनी मनोगत व्यक्त केले. सर्व विद्यार्थिनींना रोटरी क्लब व भक्ती कॉम्प्युटर या दोन्ही संस्थेच्या वतीने खाऊचे वाटप करण्यात आले. यावेळी रोटरी क्लबचे सचिव अजिंक्य जाधव, रोटरी संचालक राजीव बनकर, प्रकल्प प्रमुख व भक्ती कॉम्प्युटरचे प्राचार्य गजानन जवंजाळ, सुशांत



वगरे, अर्चना शिंदे-शेळके, सुचित्रा इंगळे-विभुते, प्रियांका होनमाने, केंद्रप्रमुख बापूसाहेब नाईकनवरे, करिष्मा मुलाणी, मनीषा भानवसे, अण्णासाहेब मगर विद्यार्थीनी व पालक वर्ग उपस्थित होते. नितीन चव्हाण यांनी सूत्रसंचालन केले. जीवन रननवरे, प्रवीणकुमार पांगे यांनी आभार मानले. सराबाई जैन, किरण घाडगे, कविता आवटे यांनी परिश्रम घेतले.

## राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचा आज कार्यकर्ता संवाद मेळावा

**तभा वृत्तसेवा**
**मोडनिंब,दि.१ जानेवारी-**

माढा तालुका राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाच्या वतीने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कार्यकर्ता संवाद मेळावा व पदाधिकारी नियुक्तीपत्र प्रदान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

हा मेळावा आज दुपारी १ वाजता शुभम मंगल कार्यालय वरवडे (ता. माढा) येथे होणार असल्याची माहिती तालुकाध्यक्ष बाळासाहेब पाटील यांनी पत्रकार परिषदेत दिली.

या मेळाव्यास प्रमुख मार्गदर्शक म्हणून खासदार धैर्यशील भैय्या मोहिते-पाटील,आमदार अभिजीत पाटील उपस्थित राहणार आहेत. माढा लोकसभा व माढा विधानसभा मतदारसंघातील आगामी निवडणुकांच्या दृष्टीने कार्यकर्त्यांना दिशा देणे, संघटन मजबूत करणे तसेच नव्याने नियुक्त होणाऱ्या पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्रांचे वितरण करणे हा या मेळाव्याचा मुख्य उद्देश आहे. या कार्यक्रमास माढा तालुक्यातील सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते व पक्षप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

## महत्वाचे...



### सोलापूर इंडस्ट्रीज असोसिएशनच्या २०२६ दिनदर्शिकेचे अनावरण

**सोलापूर, दि. १ जानेवारी-**

सोलापूर इंडस्ट्रीज असोसिएशनच्या वतीने सन २०२६ साठी तयार करण्यात आलेल्या दिनदर्शिकेचे अनावरण दि. ३० डिसेंबर रोजी सायंकाळी ४.३० वाजता सोलापूर येथील जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद (भा.प्र.से.) यांच्या हस्ते संपन्न झाले. या प्रसंगी सोलापूर इंडस्ट्रीज असोसिएशनचे अध्यक्ष डी. राम रेड्डी, उपाध्यक्ष गणेश सुत्रावे, तसेच कार्यकारिणी सदस्य जयपाल महिंद्रकर उपस्थित होते.



### 'धनश्री' बँकेच्या दिनदर्शिकेचे सपोनि गोकुळ ठाकूर यांच्या हस्ते प्रकाशन

**सोलापूर, दि. १ जानेवारी-**

तुळजापूर तालुक्यातील तामलवाडी येथील धनश्री मल्टिस्टेट को. ऑप. क्रेडिट सो. लि. मंगळवेढा, शाखा तामलवाडीच्या दिनदर्शिकेचे तामलवाडी पोलिस स्टेशनचे सहाय्यक पोलिस निरीक्षक गोकुळ ठाकूर यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. यावेळी सुयोग फाऊंडेशनचे अध्यक्ष डॉ. रविराज गायकवाड, दै. तरुण भारतचे वरिष्ठ उपसंपादक अविनाश गायकवाड, डॉ. रविकांत गुरव, माजी सरपंच दत्तात्रय वडणे, सोसायटी सचिव सुधाकर लोंढे, सोने-चांदी व्यापारी त्रिंबक दिक्षीत, पत्रकार संतोष मगर, माजी उपसरपंच हमीद पठाण, उद्योजक विजयसिंह फंड, दत्ता शिंदे, तुकाराम सुरवसे, प्रविण शिंदे, प्रशांत राऊत, अशपाक बेगडे, विनोद चुंगे, तिजा तिलघर, बिरूदेव साखरे, बाळू डोलारे, द्राक्ष बागायदार जाधव, अविनाश गंजे, रामा काशिद, महादेव दळवे यांच्यासह धनश्री मल्टिस्टेट तामलवाडी शाखाप्रमुख धनंजय बुरकुल, वनिता धपाटे, करिश्मा पटेल, कोतवाल एजाज शरीफ, प्रविण जांबुवंत शिंदे आदींची उपस्थिती होती.

### आजपासून सोलापुरात उत्सव शॉपिंग मेळाचे आयोजन

**सोलापूर, दि. १ जानेवारी-**

नवीन वर्ष आणि मकर संक्रांतीनिमित्त उत्सव शॉपिंग मेळा या प्रदर्शन आणि विक्रीचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती अनुशा बागडी यांनी पत्रकार परिषदेत दिली. कस्तुरबा मार्केट समोरील लिंगशेट्टी मंगल कार्यालय, सोलापूर येथे हा मेळावा होणार आहे.नवीन वर्ष व मकर संक्रांतीच्या निमित्ताने महिलांना खरेदीसाठी एकाच ठिकाणी सोय व्हावी व महिलांनी उत्पादन केलेल्या विविध वस्तुंना व्यासपीठ मिळावे यासाठी उत्सव शॉपिंग मेळाव्याचे आयोजन केले आहे. या उत्सवात संक्रांतीचे वाण, ट्रेंडी कुर्ती आणि सेट्स, नावीन्यपूर्ण साड्या आणि रेडीमेड ब्लाऊज पारंपरिक जाणि रियल पर्ल्सचे दागिने, ॲंटीक कोरियन ज्वेलरी आणि हेयर ॲक्सेसरीज, हँडबॅग्स आणि पर्स, होमडेकोर आणि पूजा साहित्य, परफ्यूम आणि नेलआर्ट, हेयर आणि स्किनकेअर प्रॉडक्ट, पापड, मसाले आणि लोणचे, चॉकलेट्स, बिस्कीट आणि पॅकिंग फराळ, फूड स्टॉल्स, अस्सल सोलापुरी हुरडा, कडक भाकरी, बाजरी भाकरी, शेंगा पोळी, धपाटे, तिळगुळ, गावरान बोर, रान मेवा मिळणार आहे. या उत्सवात सहभागी सर्वांना लकी ड्रॉ द्वारे आकर्षक बक्षीस व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले व राजमाता जिजाऊ जयंती निमित्त विविध क्षेत्रातील मान्यवर महिलांचा सन्मान करण्यात येणार आहे.

# नववर्षानिमित्त श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात आकर्षक फुलांची आरास

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१ जानेवारी -**

नववर्षाच्या प्रारंभानिमित्त गुरुवारी श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर व गाभाऱ्यात विविध प्रकारच्या फुलांची अत्यंत आकर्षक सजावट करण्यात आली होती. या फुलांच्या सजावटीमुळे श्रींचा गाभारा अधिकच मनमोहक व प्रसन्न दिसत होता.

या सजावटीसाठी ऑर्किड, लिव्हडेजी, ड्रॅसेना, झेंडू, शेवंती आदी विविध प्रकारची सुमारे एक टन फुले वापरण्यात आली असल्याची माहिती मंदिर समितीचे व्यवस्थापक संदेश भोसले यांनी दिली. ही संपूर्ण फुलांची सजावट विठ्ठल भक्त प्रदीपसिंह ठाकूर (रा.आळंदी देवाची, पुणे) यांनी सेवाभावी वृत्तीने मोफत करून दिली आहे. यासाठी सुमारे १२ कामगारांनी परिश्रम घेतले. श्री संत नामदेव पायरी, श्री




विठ्ठल चौखांबी व सोळाखांबी, श्री रुक्मिणी चौखांबी आदी प्रमुख ठिकाणी ही फुलांची आरास करण्यात आली आहे. नववर्षानिमित्त मंदिरात दर्शनासाठी भाविकांची मोठ्या प्रमाणावर गर्दी झाली आहे. भाविकांची संख्या लक्षात घेता मंदिर समितीमार्फत आवश्यक त्या सर्व सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. भाविकांना जलद व सुलभ दर्शन मिळावे यासाठी टोकन दर्शन पास बुकिंग व्यवस्था तात्पुरती बंद ठेवण्यात आली असून, व्हीआयपी दर्शनावर निर्बंध, पूजेची संख्या कमी करणे तसेच इतर अनुषंगिक उपाययोजना राबविण्यात आल्या आहेत. दरवर्षी महत्त्वाचे सण, उत्सव व विशेष दिवसांच्या निमित्ताने श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरात फुलांची आरास व सजावट करण्यात येते. नववर्षाच्या स्वागतासाठी मंदिर फुलांनी सजले असून, या आकर्षक सजावटीमुळे विठुरायाचे सावळे साजिरे रूप अधिकच खुलून दिसत आहे. नववर्षाची सुरुवात श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या दर्शनाने व्हावी, या भावनेतून हजारो भाविक श्रीक्षेत्र पंढरपूरमध्ये दाखल झाले आहेत. पहाटेपासूनच दर्शन रांगेत भाविकांची गर्दी असून, विठ्ठल रुक्मिणी मातेच्या नाम घोषाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला आहे. या फुलांच्या सजावटीमुळे दर्शन घेताना भाविक अधिक समाधान व भक्तिभाव अनुभवत असल्याचे दिसून येत आहे.

## भावसार व्हिजन सोलापूर सेंट्रलला १५ राष्ट्रीय पुरस्कारांसह 'बेस्ट क्लब' सन्मान

**सोलापूर, दि. १ जानेवारी-**

भावसार व्हिजन इंडिया संस्थेचे राष्ट्रीय अधिवेशन बेंगलोर येथे उत्साहात पार पडले. या अधिवेशनात उत्कृष्ट व सातत्यपूर्ण कार्याची दखल घेत भावसार व्हिजन सोलापूर सेंट्रल क्लबला १५ राष्ट्रीय पुरस्कारांसह 'बेस्ट क्लब' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. या यशामागे राष्ट्रीय संचालक अश्विन डोईजोडे, एरिया गव्हर्नर श्रीकांत रंगदाळ तसेच राष्ट्रीय कमिटी सदस्य सुहास क्षीरसागर, दीपक आकुडे, राजेश झिंगाडे व प्रभाकर जवळकर यांचे मार्गदर्शन लाभले. राष्ट्रीय अधिवेशनादरम्यान भावसार व्हिजन सोलापूर सेंट्रल क्लबचे श्रेयस श्रीकांत रंगदाळ यांनी विकसित केलेल्या 'भावसार उद्योग' या ॲपचे भव्य लाँचिंग करण्यात आले.



श्रेयस रंगदाळ

**यांना सन्मानित करण्यात आले**

गव्हर्नर ॲंबॅसॅडर लक्ष्मीकांत मुसळे, प्रेसिडेंट रविकिरण वायचळ, बेस्ट सर्विस डायरेक्टर ॲड. किरण रणसुबे, वुमन वेल्फेअर श्वेता मुसळे, चाइल्ड वेल्फेअर आरती खमीतकर (उत्कृष्ट योगदानाबद्दल वैयक्तिक पुरस्कार), यूथ गटामध्ये निखिल क्षीरसागर, सोहम रंगदाळ, अमरनाथ कुसुमकर, हर्षदा जवळकर व स्वप्नील पुकाळे (उल्लेखनीय कार्य) राष्ट्रीय संचालक अश्विन डोईजोडे व एरिया गव्हर्नर श्रीकांत रंगदाळ (नेतृत्वगुण, संघटनात्मक कार्य व समाजसेवेतील योगदान), श्रेयस श्रीकांत रंगदाळ (विशेष पुरस्कार),

## अधिकृत उमेदवारी नसलेल्या भाजपा कार्यकर्त्यांनी माघार घ्यावी; अन्यथा कारवाई

**भाजपा शहराध्यक्ष रोहिणी तडवळकर यांचा इशारा**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ जानेवारी-**

महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ करीता भारतीय जनता पार्टीच्या अनेक कार्यकर्त्यांनी उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. यापैकी ज्या कार्यकर्त्यांना पक्षाकडून अधिकृत उमेदवारी मिळालेली नाही, अशा सर्व कार्यकर्ता उमेदवारांनी पक्षहित लक्षात घेऊन आपली उमेदवारी माघार घ्यावी व पक्षाला सहकार्य करावे; अन्यथा जे कार्यकर्ते उमेदवारी माघार घेणार नाहीत, त्यांच्यावर पक्षशिस्तीनुसार नाईलाजाने शिस्तभंगाची कारवाई करावी लागेल, असा इशारा शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर यांनी दिला आहे.



दरम्यान,जे कार्यकर्ते आपली उमेदवारी माघार घेऊन पक्षाशी निष्ठा राखतील, अशा सर्व कार्यकर्त्यांची पक्षाकडून योग्य दखल घेण्यात येईल सर्व भाजपा कार्यकर्त्यांनी पक्षाची जबाबदारी ओळखून आपापल्या प्रभागातील भारतीय जनता पार्टीच्या अधिकृत उमेदवारांचा प्रचार करावा व पक्षाचे उमेदवार विजयी करण्यासाठी सक्रिय सहभाग घ्यावा. तसेच सोलापूर शहरातील तीनही विधानसभा मतदारसंघांतील विद्यमान आमदारांनी व पक्षाच्या प्रदेश नेतृत्वाने जास्तीत जास्त कार्यकर्त्यांना उमेदवारी देण्याचा प्रामाणिक प्रयत्न केलेला आहे. प्रदेश पातळीवरून प्रवेश देऊन ज्यांना उमेदवारी देण्यात आली आहे, त्याबाबत कोणताही गैरसमज किंवा अन्यायाची भावना न बाळगता सर्व भाजप कार्यकर्त्यांनी पक्षाच्या निर्णयाला पाठिंबा द्यावा व एकसंघपणे सहकार्य करावे, असे आवाहनही तडवळकर यांनी केले आहे.

# छाननीनंतरच्या उमेदवार यादीतून अमोल शिंदे यांचे नाव गायब

**महापालिका निवडणूक कार्यालयाचा अजब कारभार**

**चूक लक्षात येताच दुसरी दुरुस्त यादी प्रसिद्ध**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ जानेवारी**

सोलापूर महापालिका सार्वत्रिक निवडणुकीच्या अर्ज छाननी प्रक्रियेनंतर निवडणूक प्रशासनाचा अजब कारभार समोर आला आहे. शिवसेना शिंदे गटाचे जिल्हाप्रमुख तथा उमेदवार अमोल शिंदे यांचे नाव छाननीनंतर प्रसिद्ध करण्यात आलेल्या उमेदवारांच्या यादीतून चक्क वगळण्यात आल्याने खळबळ उडाली.

चूक लक्षात येताच दुसरी दुरुस्त यादी प्रसिद्ध करण्यात आली. प्रभाग क्रमांक ७-ड (सर्वसाधारण) येथून अमोल शिंदे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला असून छाननी प्रक्रियेत त्यांचा अर्ज वैध ठरला होता. मात्र, निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयाकडून जाहीर करण्यात आलेल्या सद्यस्थितीतील उमेदवारांच्या यादीत त्यांच्या नावाऐवजी अन्य उमेदवाराचे नाव असल्याचे आढळून आले. त्यामुळे निवडणूक कार्यालयात गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. हा प्रकार लक्षात येताच शिवसेना शिंदे गटाच्या कार्यकर्त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. परिस्थिती तणावपूर्ण झाल्याने पोलीस बंदोबस्तही तातडीने तैनात करण्यात आला. दरम्यान, अमोल शिंदे यांच्या मदतीला काँग्रेस शहराध्यक्ष चेतन नरोटे, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे शहराध्यक्ष संतोष पवार यांच्यासह विरोधी पक्षातील पदाधिकारीही धावून आले.



अमोल शिंदे व त्यांच्या समर्थकांनी निवडणूक निर्णय अधिकारी क्रमांक दोन विजया पांगारकर यांची भेट घेऊन हा प्रकार निदर्शनास आणून दिला. पाहणीनंतर टायपिंग करताना अनावधानाने चूक झाल्याचे स्पष्टीकरण देण्यात आले. यामध्ये तातडीने दुरुस्ती करून अमोल शिंदे यांचे नाव समाविष्ट असलेली नवी यादी प्रसिद्ध करण्यात येणार असल्याचे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले. आधी एबी फॉर्म प्रकरण आणि आता उमेदवार यादीतील ही चूक यामुळे प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

**ठळक घडामोडी**

- ✻ छाननीनंतरच्या उमेदवार यादीतून अमोल शिंदे यांचे नाव वगळल्याने खळबळ
- ✻ शिवसेना शिंदे गटासह काँग्रेस व राष्ट्रवादीही अमोल शिंदे यांच्या पाठीशी
- ✻ टायपिंगमधील अनावधानाने चूक झाल्याचे निवडणूक अधिकाऱ्यांचे स्पष्टीकरण
- ✻ दुरुस्ती करून नव्याने उमेदवार यादी प्रसिद्ध करण्याचे प्रशासनाचे आश्वासन
- ✻ अखेर काही वेळानंतर चूक लक्षात येताच दुसरी दुरुस्त यादी प्रसिद्ध

**या प्रकारामुळे उलटसुलट चर्चेला उधाण**

महापालिका निवडणुकीसाठी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी भाजपाने वेळेनंतर ए-बी फॉर्म दिले. यावर सावरासावरी करण्याचा प्रकार होत आहे. तर आता उमेदवार यादीतून नाव गायब करण्याचा हा प्रकार म्हणजे प्रशासनाचा अजब कारभार सुरू आहे. अनावधानाने इतकी मोठी चूक राहत नाही शिवाय हा प्रकार इतका सहजासहजी होत नाही असे आरोप होत असून यामुळे उलट सुलट चर्चा कार्यकर्त्यांमध्ये आणि इच्छुकांमध्ये सुरू होती.

## पुणे विभागीय सुलेखन स्पर्धेत कुमठे प्रशालेचे शिक्षक परमेश्वर कोळी प्रथम

**सोलापूर, दि. १ जानेवारी-**

महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र, पुणे यांच्या मार्फत घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय सुलेखन स्पर्धेत ९० स्पर्धकांनी भाग घेतला होता त्यातून कुमठे प्रशालेचे शिक्षक परमेश्वर कोळी यांनी प्रथम क्रमांक पटकावला आहे. राष्ट्रीय स्तरावर होणाऱ्या स्पर्धेकरिता त्यांची निवड करण्यात आली आहे. त्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे प्रमुख विश्वस्त जयकुमार माने व एस. पी.एम. चे विश्वस्त. स्वातीताई माने, मुख्याध्यापक, पर्यवेक्षक व इतर सहकारी यांनी अभिनंदन केले.



## भारत-रत्न इंदिरा गांधी अभियांत्रिकीमध्ये राष्ट्रीय कार्यशाळा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ जानेवारी-**

भारत-रत्न इंदिरा गांधी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (बीआयजीसीई) केगाव येथील संशोधन व विकास विभागाच्या वतीने राष्ट्रीय स्तरावरील सर्वसमावेशक संशोधन कार्यशाळा हायब्रिड पद्धतीने यशस्वीपणे झाली.

''लेखन कौशल्ये, गॅप ॲनालिसिस, प्लॅजिअरिझम, संशोधन साधने व प्रकाशन तंत्रे'' या विषयावर आयोजित या एफडीपीला देशभरातील विविध अभियांत्रिकी शाखांतील प्राध्यापक, संशोधक व पदव्युत्तर विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.



कार्यक्रमाचे आयोजन संस्थेचे अध्यक्ष इंजि. रवींद्रजी गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. प्राचार्य डॉ. अनिल देशमाने यांनी संशोधनातील नैतिकता, दर्जेदार प्रकाशने तसेच संशोधन संस्कृतीचे महत्त्व अधोरेखित केले. या एफडीपीचे संयोजन डॉ. स्नेहलता नाईक, अधिष्ठाता (संशोधन व विकास) यांनी केले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे डॉ. सोमा एस., सहयोगी प्राध्यापक व अधिष्ठाता, संगणक विज्ञान व अभियांत्रिकी विभाग, सीएमआर टेक्निकल कॅम्पस, हैदराबाद यांनी संशोधनातील गॅप शोध, प्रकाशन नैतिकता तसेच उच्च दर्जाच्या जर्नल्समध्ये प्रकाशनासाठी सखोल मार्गदर्शन केले. तसेच डॉ. अल्ताफ मुधोळ (प्रमुख), डॉ. ए. डी. कुलकर्णी (सिव्हिल अभियांत्रिकी विभाग प्रमुख), डॉ. स्नेहलता नाईक ( प्रमुख) व डॉ. सचिन गाडे (बायोमेडिकल अभियांत्रिकी विभाग प्रमुख) यांनी संशोधन लेखन, प्लॅजिअरिझम प्रतिबंध व प्रकाशन प्रक्रियेवर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या सूत्रसंचालन प्रा. रश्मी पीनाबत्ती, प्रा. मीनल कपाळे व प्रा. नेहा ईनामदार यांनी केले. डॉ. स्नेहलता नाईक यांनी आभार केले.




# श्री सिद्धेश्वर मंदिरात संकल्पपूर्तीसाठी भाविकांची मांदियाळी

**नव्या वर्षांच्या पहिल्या दिवशी घेतले श्रींचे दर्शन**

**सोलापूरसह जिल्ह्यातील भाविकांची उपस्थिती**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१ जानेवारी-**

नव वर्षाच्या सुरुवातीला असंख्य भाविकांनी श्री सिद्धेश्वर मंदिरात जाऊन श्रींचे दर्शन घेऊन नव्या वर्षाची सुरुवात केली. यावेळी पहाटेपासूनच श्रींचे दर्शन घेण्यासाठी अनेक भाविकांची मोठी मांदियाळी होती. यावेळी श्रींचे दर्शन घेऊन नव्या वर्षात संकल्प केल्याचे भाविकांनी सांगितले.


सोलापूरचे ग्रामदैवत श्री सिद्धेश्वर मंदिरात सालाबाद प्रमाणे यंदाच्या वर्षी देखील अबालवृद्ध भाविकांनी श्रीच्या दर्शनासाठी गर्दी केली होती. नव वर्षाच्या सुरुवातीला श्रींचे दर्शन घेतले. स्त्री पुरुष दर्शनरांगा लांब पर्यंत लागल्या होत्या. यावेळी सर्वत्र प्रसन्नमय वातावरण निर्माण झाले होते. दरवर्षी भाविक श्रींच्या दर्शनासाठी मंदिरात येत असतात. नव्या वर्षांच्या संकल्पपूर्तीसाठी दर्शन घेऊन जातात. यावेळी सोलापुरसह राज्यातून आणि आंध्र प्रदेश, कर्नाटक, येथील अनेक भाविक या महिन्यात येत असतात. असेही मंदिराचे पुजारी शिवशंकर हब्बू यांनी सांगितले.

## राज्य प्रश्नमंजुषा स्पर्धेत सोशल महाविद्यालय चौथे



**सोलापूर, दि. १ जानेवारी-**

भिवंडी येथे बज्म-ए-रेख्ता फाऊंडेशनतर्फे झालेल्या उर्दू भाषेसंदर्भात राज्यस्तरीय प्रश्नमंजुषा स्पर्धेत एस.एस.ए उर्दू हायस्कूल अँड ज्युनियर कॉलेज ऑफ सायन्सच्या अब्दुल्लाह इरफान वड्डो आणि शोएब मुश्ताक शेख आणि जैनब खालिद काझी यांनी चौथा क्रमांक मिळविला. त्यांना सहशिक्षक वजाहत सगरी व रिदा राहीन सगरी यांनी मार्गदर्शन केले. त्याचे मुख्याध्यापक रिजवान शेख. उपमुख्याध्यापक इम्तियाज शाब्दी, पर्यवेक्षक रसूल चौधरी, पर्यवेक्षिका यास्मिन शेख आणि पर्यवेक्षक अल्ताफ कुमठे यांनी अभिनंदन केले.




हे पत्र मुद्रक व प्रकाशक दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, श्री. मसलेकर निवास, जिल्हा न्यायालय पाठीमागे, समर्थ नगर, धाराशिव (उस्मानाबाद) ४१३५०१, कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ९७६७०९९७११ / ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. ● मुख्य संपादक : प्रशांत वसंतराव माने (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. RNI No. MAHMAR/2023/86468. E-mail starunbharatgmail.com. ● Websate:http://dainiktarunbharat/ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by DILIP SHIVMURTI DULANGE Printed at SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003.Publised at TARUN BHARAT OFFICE Mr. Maslekar Residence, Behind District Court, Samarth Nagar, Dharashiv. PIN - 413501 | RNI No. MAHMAR/2023/86468
● CHIEF GROUP EDITOR : DILIP YASHWANT PETHE ● CHIEF EDITOR : PRASHANT VASANTRAO MANE

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## शिराढोणमध्ये तरुणीवर लैंगिक अत्याचार

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१ जानेवारी -**

शिराढोण पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एका गावात २० वर्षीय तरुणीवर (नाव व गाव गोपनीय) लैंगिक अत्याचार झाल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी संबंधित तरुणाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, दि.१५ जानेवारी २०२५ रोजी दुपारी सुमारे १२ वाजण्याच्या सुमारास एका गावातील तरुणाने पीडित तरुणीस तुला मोटारसायकलवरून घरी सोडतो असे सांगून तिला तुर व हरभरा लागवड असलेल्या शेतात नेले. तेथे तिच्यावर जबरदस्तीने लैंगिक अत्याचार करण्यात आला. तसेच या घटनेची माहिती कुणाला सांगितल्यास जिवे ठार मारण्याची धमकी दिल्याचेही तक्रारीत नमूद आहे. या प्रकरणी पीडित तरुणीने दि. ३१ डिसेंबर २०२५ रोजी शिराढोण पोलीस ठाण्यात प्रथम खबर दिली.

त्यानुसार गुन्हा नोंदविण्यात आला असून, पुढील तपास पोलीस करीत आहेत.

### संक्षिप्त वृत्त...



### कस्तुरी अॅकडमीचा ग्रँड सन्मान सोहळा; महिलांच्या स्वावलंबनाला नवी दिशा

**धाराशिव, दि.१ जानेवारी -**

प्रत्येक महिला सक्षम आहे, फक्त योग्य मार्गदर्शनाची गरज असते. कस्तुरी अॅक्डमीच्या क्लासेसमध्ये विविध ब्युटी आणि सेल्फकेअर कौशल्य शिकवले जातात, ज्यामुळे महिलांना स्वतंत्र रोजगाराची संधी मिळते. आमचा उद्देश फक्त ब्युटी ट्रेनिंग देणे नाही, तर तरुणींना आत्मविश्वास, कौशल्य आणि स्वावलंबन मिळवून देणे हाचं असे मत आयोजक शलाका जाधव यांनी व्यक्त केले. महिलांसाठी स्वावलंबन आणि ब्युटी इंडस्ट्रीत करिअर घडवण्यासाठी कार्यरत कस्तुरी अॅक्डमीतर्फे किंग्ज गार्डन हॉटेलमध्ये यंदा ग्रँड सन्मान सोहळा पार पडला. या उपक्रमामुळे धाराशिवसह आसपासच्या ग्रामीण भागातील महिलांना स्वावलंबी बनण्याचे प्रेरक उदाहरण मिळाले आहे. कस्तुरी अॅक्डमीने मागील १२ वर्षांपासून आयएसओ प्रमाणित अॅक्डमी महिलांना कौशल्य विकासाच्या माध्यमातून सक्षम करण्यासाठी विविध प्रशिक्षण कार्यक्रम राबवत आहेत. या वर्षी ४० महिलांसह युवतींनी मास्टर कोर्स पूर्ण केल्यानंतर प्रमाणपत्र तसेच सन्मानचिन्ह अॅक्डमी प्रमुख शलाका जाधव यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.



### उमरगा येथे डॉ. संतुजी लाड सामाजिक सभागृहाचा भूमिपूजन सोहळा संपन्न

**उमरगा, दि.१ जानेवारी -**

उमरगा शहरातील चिंचोले प्लॉट परिसरात हिंदू खाटीक समाजभूषण डॉ. संतुजी रामजी लाड यांच्या नावाने उभारण्यात येणाऱ्या सामाजिक सभागृहाचा भूमि पूजन सोहळा मंगळवार, दि.३० डिसेंबर रोजी उत्साहात पार पडला. या कार्यक्रमास माजी खासदार रविंद्र गायकवाड, नवनिर्वाचित नगराध्यक्ष किरण गायकवाड, माजी सभापती जितेंद्र शिंदे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. डॉ. संतुजी लाड यांच्या नावाने राज्यातील पहिले सामाजिक सभागृह उभारले जात असून, हा उमरगा शहरासाठी व समाजासाठी अभिमानाचा क्षण असल्याचे मान्यवरांनी सांगितले. मा.आ. ज्ञानराज चौगुले यांच्या कार्यकाळात मंजूर झालेल्या या सभागृहाच्या कामाचे उद्घाटन दि.३१ रोजी नगराध्यक्ष किरण गायकवाड यांच्या हस्ते करण्यात आले. सभागृहाचा उपयोग सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रमांसाठी होणार आहे.

### सिद्धाराम गावडे यांचे निधन

**इटकळ, दि.१ जानेवारी -**



तुळजापुर तालुक्यातील केशेगाव येथील रहिवाशी व दौंड येथे कर्तव्यावर असलेले पोलीस कॉन्स्टेबल सिध्दाराम आप्पाराव गावडे (वय ३६) यांचे ३१ डिसेंबर रोजी मुंबई येथील खाजगी रुग्णालयात उपचारा दरम्यान निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर केशेगाव येथे सकाळी ११ वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात आई, वडील, आजी, भाऊ, पत्नी, मुलगा व मुलगी असा परिवार आहे. केशेगाव येथील सरपंच मल्लिनाथ गावडे यांचे ते वडील बंधू होत.

## धाराशिव जिल्हा विकासाचे राष्ट्रीय महामार्ग...

# राष्ट्रीय महामार्गामुळे धाराशिव जिल्ह्याच्या विकासाला मिळणार गती



**तभा वृत्तसेवा / अनिल आगलावे**
**धाराशिव, दि.१ जानेवारी -**

धाराशिव जिल्हा हा दुष्काळग्रस्त व आकांक्षित जिल्हा म्हणून ओळखला जात असला, तरी गेल्या काही वर्षांत राष्ट्रीय महामार्गांच्या वाढत्या जाळ्यामुळे जिल्ह्याच्या विकासाला नवी दिशा मिळत आहे. केंद्र सरकारच्या रस्ते पायाभूत सुविधांवरील भरामुळे धाराशिव जिल्हा आज महाराष्ट्राच्या चारही दिशांशी अधिक प्रभावीपणे जोडला जात आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय दळणवळण मंत्री नितीन गडकरी आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीपूर्ण धोरणांमुळे देशासह महाराष्ट्रात पायाभूत सुविधांचा विकास वेगाने होत आहे. विशेषतः राष्ट्रीय महामार्ग, द्रुतगती मार्ग आणि ग्रीनफिल्ड कॉरिडॉरमुळे दळणवळण अधिक सक्षम होत असून, त्याचा थेट फायदा ग्रामीण व मागास भागांना मिळत आहे. या नेतृत्वामुळे विकासाचे मार्ग केवळ तयार होत नाहीत, तर रोजगारनिर्मिती, उद्योगवाढ आणि सर्वांगीण प्रगतीसाठी भक्कम पायाभरणी होत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

पूर्वी मर्यादित दळणवळणामुळे औद्योगिक गुंतवणूक, व्यापार आणि पर्यटनाच्या संधी कमी होत्या. मात्र आता शेकडो किलोमीटर लांबीचे राष्ट्रीय महामार्ग धाराशिव जिल्ह्यातून जात असल्याने वाहतूक अधिक सुलभ व वेगवान झाली आहे. याचा थेट परिणाम शेतीमालाची वाहतूक, बाजारपेठांपर्यंत पोहोच आणि रोजगारनिर्मितीवर होताना दिसत आहे. केंद्र सरकारमुळे जिल्ह्यातुन जाणारा सातवा महामार्ग मिळाला आहे.

धाराशिव जिल्ह्यातून सर्वप्रथम एकच नॅशनल हायवे जात होता. मुंबई-हैदराबाद राष्ट्रीय महामार्ग (पुणे-सोलापूर-नळदुर्ग-उमरगा), त्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी सरकारच्या काळात सोलापूर-धुळे महामार्ग (धाराशिव-बीड-छत्रपती संभाजीनगर-जालना), तसेच कोल्हापूर-नागपूर या महत्त्वाच्या मार्गांचा समावेश आहे. यामुळे पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा व विदर्भ यांमधील संपर्क अधिक मजबूत झाला आहे.

याशिवाय सुरत-चेन्नई महामार्ग, शेगाव-पंढरपूर महामार्ग, शक्तीपीठ महामार्ग, लातूर-कल्याण महामार्ग आणि प्रस्तावित नाशिक-सोलापूर ग्रीनफिल्ड कॉरिडॉर यामुळे जिल्ह्याचे राष्ट्रीय पातळीवरील महत्त्व वाढत आहे. विशेषतः तुळजापूरसारख्या धार्मिक स्थळांमुळे शक्तीपीठ महामार्ग हा भाविकांसाठी सोयीचा ठरणार आहे.

या महामार्गांमुळे जिल्ह्यात लॉजिस्टिक्स, वेअरहाऊसिंग, हॉटेल व वाहतूक व्यवसायाला चालना मिळत आहे. शेतकऱ्यांना आपला माल कमी वेळेत मोठ्या बाजारपेठांमध्ये पोहोचवणे शक्य होत असून, खर्चात बचत होत आहे. रस्ते विकासामुळे दळणवळण अधिक सुलभ होत असून त्याचा सकारात्मक परिणाम शेती, उद्योग, व्यापार, पर्यटन आणि सेवा क्षेत्रावर होत आहे. तसेच रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

राष्ट्रीय महामार्गांमुळे बाजारपेठांपर्यंत पोहोचण्याचा वेळ कमी झाला असून वाहतूक खर्चात बचत होत आहे.

यामुळे शेतकऱ्यांना योग्य दर मिळण्यास मदत होत असून औद्योगिक गुंतवणुकीसाठीही अनुकूल वातावरण तयार होत आहे. तसेच धार्मिक व ग्रामीण पर्यटनाला चालना मिळत असल्याने स्थानिक पातळीवर रोजगारनिर्मितीच्या संधी वाढत आहेत.

रस्ते विकासामुळे सर्वांगीण प्रगतीच्या वाटा खुल्या होत असून जिल्ह्याच्या आर्थिक व सामाजिक विकासाला नवे बळ मिळत आहे.

राष्ट्रीय महामार्गांमुळे धाराशिव जिल्हा हळूहळू विकासाच्या मुख्य प्रवाहात सामील होत आहे. भविष्यात या पायाभूत सुविधांचा योग्य वापर झाल्यास जिल्ह्याच्या आर्थिक व सामाजिक प्रगतीला अधिक गती मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

### धाराशिव जिल्ह्यातून जाणारे प्रमुख राष्ट्रीय महामार्ग..

**मुंबई-हैदराबाद राष्ट्रीय महामार्ग...** (पुणे-सोलापूर-नळदुर्ग-उमरगा-हैदराबाद) या महामार्गामुळे पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा व तेलंगणामधील दळणवळण अधिक वेगवान झाले आहे. **सोलापूर-धुळे राष्ट्रीय महामार्ग** (धाराशिव-बीड- छत्रपती संभाजीनगर-जालना-धुळे) उत्तर महाराष्ट्राशी थेट संपर्क निर्माण झाल्याने व्यापारी हालचालींना चालना मिळत आहे. **कोल्हापूर-नागपूर महामार्ग** (कोल्हापूर-सांगली-पंढरपूर-सोलापूर-तुळजापूर-लातूर-बुटीबोरी-नागपूर महामार्ग) या मार्गामुळे पश्चिम महाराष्ट्र ते विदर्भ असा महत्त्वाचा दुवा तयार झाला आहे. **शेगाव-पंढरपूर महामार्ग** (केज-कळंब-येरमाळा-बार्शी) धार्मिक पर्यटनाच्या दृष्टीने हा महामार्ग उपयुक्त ठरत आहे. **सुरत-चेन्नई महामार्ग** (सुरत-मुंबई-पुणे-सोलापूर-धाराशिव-अक्कलकोट-चेन्नई महामार्ग) उत्तर व दक्षिण भारत जोडणारा हा मार्ग उद्योग व लॉजिस्टिक्ससाठी अत्यंत महत्त्वाचा ठरत आहे. **नागपूर-गोवा शक्तीपीठ महामार्ग** तुळजापूरसारख्या शक्तीपीठांमुळे हा महामार्ग भाविकांसाठी वरदान ठरणार आहे. या महामार्गामुळे राज्यातील अनेक प्रसिद्ध तीर्थक्षेत्र जोडली जाणार आहेत. **लातूर-कल्याण महामार्ग** (लातूर-कळंब-भूम-जामखेड-अहिल्यानगर-कल्याण) मराठवाडा ते मुंबई महानगर क्षेत्राशी थेट संपर्क साधणारा हा मार्ग विकासासाठी महत्त्वाचा आहे. **नाशिक-सोलापूर ग्रीनफिल्ड कॉरिडॉर** (नाशिक-धाराशिव-सोलापूर-अक्कलकोट) आधुनिक ग्रीनफिल्ड महामार्गामुळे वेगवान व सुरक्षित प्रवास शक्य होणार आहे.

### ऊसाचे ३ कोटी ९० लाख २२ हजार ७८९ रुपये शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा...

## शेतकऱ्यांनी ऊस गाळपास देऊन सहकार्य करावे : नानासाहेब पाटील



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१ जानेवारी -**

धाराशिव तालुक्यातील जागजी शिवारातील एनव्हीपी शुगरच्या वतीने चाचणी गळीत हंगामापासून ऊस उत्पादक शेतकऱ्यांना अवघ्या पंधरा दिवसांत ऊसाचे बिल अदा करण्याची परंपरा एन.व्ही.पी.शुगर परिवाराने सुरू केली आहे. यंदाच्या गळीत हंगामात देखील गाळपास आलेल्या ६३,०९० मे.टन ऊसाचे बिल अवघ्या पंधरा दिवसात पहिला हप्ता प्रतिटन २५०० रूपये प्रमाणे संबंधित शेतकर्यांच्या बँक खात्यात वर्ग करण्यात आला असल्याची माहिती कारखान्याचे चेअरमन नानासाहेब पाटील यांनी दिली आहे.



आज नववर्षाच्या पहिल्याच दिवशी १ जानेवारी २०२६ रोजी १६ डिसेंबर ते ३१ डिसेंबर २०२५ या कालावधीत गाळपास आलेल्या ऊसाचे बिल पवनराजे लोकसमृद्धी मल्टीस्टेट को-ऑप. सोसायटी आणि जनता सहकारी बँकेतील शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्यात आलेले आहे.

गळीत हंगाम संपल्यावर कारखान्याचा मागील दोन वर्षी प्रमाणे याही वर्षी शेतकऱ्याना योग्य असा ऊस भाव देण्याची परंपरा एनव्हीपी शुगर परिवार कायम ठेवणार आहे. तसेच जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी कारखान्यास ऊस देऊन सहकार्य करावे असे आवाहनही चेअरमन नानासाहेब पाटील यांनी केले आहे.

### स्व. विजयकुमार गायकवाड पुण्यतिथीनिमित्त रक्तदान शिबिर

**तभा वृत्तसेवा**
**इटकळ, दि.१ जानेवारी -**

इटकळ येथे स्वर्गीय विजयकुमार गायकवाड यांच्या चौथ्या पुण्यतिथीनिमित्त भव्य रक्तदान शिबिर व जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेतील मुला-मुलींना खाऊ वाटप असे सामाजिक उपक्रम राबविण्यात आले. रक्तदान शिबिरास तरुणांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळून तब्बल ४५ रक्तदात्यांनी रक्तदान केले. रक्तसंकलन मल्लिकार्जुन ब्लड बँक, सोलापूर यांनी केले. सदर उपक्रमांचे आयोजन विजयकुमार गायकवाड प्रतिष्ठानचे दयानंद गायकवाड व मित्रपरिवाराच्या वतीने करण्यात आले होते.

## मुस्लिम असूनही खंडोबा देवाची अखंड सेवा; याकुब चांदसाहब नगारेवाले यांचे धार्मिक सलोख्याचे उदाहरण



**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१ जानेवारी -**

अणदुर (ता. तुळजापूर) येथील याकुब चांदसाहब नगारेवाले हे मुस्लिम समाजातील असूनही गेल्या अनेक वर्षांपासून श्री खंडोबा देवाची अत्यंत श्रद्धेने सेवा करत आहेत.

खंडोबाच्या आरतीदरम्यान नगारा वाजविण्याचा मान त्यांच्याकडे असून ही परंपरा त्यांना त्यांच्या आजोबा व वडिलांकडून लाभली आहे. याकुब चांदसाहब यांचे आजोबा व वडील यांनीही खंडोबा देवाच्या सेवेत नगारा वाजविण्याचे कार्य केले होते.

ही परंपरा त्यांनी आजतागायत जपली असून धार्मिक सलोख्याचे ते जिवंत उदाहरण ठरत आहेत. आरतीनंतर खंडोबा मंदिरासमोरील कट्ट्यावर बसण्याचा मानही त्यांना मिळतो.

दर्शनासाठी येणारे भाविक येथे येऊन नतमस्तक होतात. यावेळी मोठ्या प्रमाणावर भंडारा व खोबऱ्याची उधळण होत असून याकुब चांदसाहब अक्षरशः भंडाऱ्याने माखून जातात.

सध्या नळदुर्ग येथील श्रीक्षेत्र मैलारपुरात श्री खंडोबा देवाचे वास्तव्य असल्याने याकुब चांदसाहब तेथे नित्यनियमाने सेवा करत आहेत.

सुमारे ८० वर्षांचे वय असतानाही ते दररोज मनोभावे सेवा करत असून त्यांच्या या भक्तीभावाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# स्वर्गीय हिराबेन यांच्या त्यागामुळे व कष्टामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी घडले : विजया रहाटकर

### नवी दिल्लीत पहिला 'वंदे मातृशक्ती महोत्सव' संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१ जानेवारी -**

दिल्ली येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर इंटरनॅशनल सेंटर, जनपथ, नवी दिल्ली येथे रूपामाता फाउंडेशन, धाराशिव व श्री गणेश सेवा मंडळ दिल्ली (रजि.), लक्ष्मीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने दि.३० डिसेंबर २०२५ रोजी पहिला वंदे मातृशक्ती महोत्सव मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

वंदे मातृशक्ती माता पूजन दिन २०२५ हा मातृभूमीप्रेम, मातृसंस्कार व मातृत्वाच्या गौरवशाली परंपरेचा राष्ट्रीय स्तरावरील महत्त्वपूर्ण उपक्रम ठरला. मातृत्वाच्या तेजस्वी मूल्यांचा सन्मान आणि गौरव वृद्धिंगत करण्यासाठी देशभरातील आदर्श मातांना एका मंचावर सन्मानित करण्याचा प्रयत्न या कार्यक्रमातून करण्यात आला. या भव्य कार्यक्रमाचे संयोजन रूपामाता फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष अॅड. व्यंकट विश्वनाथ गुंड पाटील व श्री गणेश सेवा मंडळ दिल्ली (रजि.) चे संस्थापक अध्यक्ष महेंद्र लड्डा यांनी केले.

कार्यक्रमास राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर, खासदार बांसुरी स्वराज, सुप्रीम कोर्टाच्या माजी न्यायमूर्ती ज्ञानसुधा मिश्रा, अहिंसा विश्वभारतीचे संस्थापक आचार्य लोकेश मुनी, पोलीस आयुक्त अजय चौधरी, कालीपुत्र कालीचरण महाराज, भाजपाचे माजी राष्ट्रीय उपाध्यक्ष श्याम जाजू, हभप. प्रकाश महाराज बोधले, हभप. पुरुषोत्तम महाराज पाटील, हभप. सोपान महाराज सानप शास्त्री, धाराशिव जनता बँकेचे अध्यक्ष वसंतराव नागदे, उद्योजक व्ही.पी. पाटील, हभप.पांडुरंग लोमटे, जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुधाकर गुंड गुरुजी, व्यंकट मरगणे तसेच रूपामाता परिवाराचे कार्यकारी संचालक अजित गुंड पाटील आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे विशेष आकर्षण कालीपुत्र कालीचरण महाराज यांनी सादर केलेले शिव तांडव व वंदे मातरम् हे सादरीकरण ठरले. प्रारंभी झालेल्या भजनसंध्येत उपस्थितांनी भावपूर्ण सहभाग नोंदवला. हभप. पुरुषोत्तम महाराज पाटील यांनी सादर केलेल्या 'आई माझी' या कवितेने सभागृह भावनाविवश झाले.

त्यानंतर हभप विशाल खोले महाराज यांच्या पिंगळा या विशेष किर्तनप्रकारामुळे सभागृहात नवचैतन्य निर्माण झाले. हभप. सोपान महाराज सानप शास्त्री यांच्या संबोधनातून ज्ञानोबा-तुकारामांच्या महाराष्ट्राची अनुभूती दिल्लीकरांना मिळाली. यावेळी डॉ. किरण झरकर लिखित 'वंदे मातृशक्ती' या सांस्कृतिक पुस्तकाचे प्रकाशन सर्व साधुसंत व मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमात आचार्य लोकेश मुनी यांच्या मातोश्री मैना देवी, माजी जनरल रविंद्र सिंह यांच्या मातोश्री चंद्रावती रुढ, क्रिकेटपटू राजवर्धन सुहास हंगरगेकर यांच्या मातोश्री अनिता हंगरगेकर, कृष्णा बंग यांच्या मातोश्री मीरा कमलकिशोर बंग, हभप. पुरुषोत्तम महाराज पाटील यांच्या मातोश्री लक्ष्मीबाई भुतेकर, हभप. सोपान महाराज सानप शास्त्री यांच्या मातोश्री प्रयागबाई सानप तसेच हभप. विशाल खोले महाराज यांच्या मातोश्री बेबीआई खोले यांचा आदर्श माता म्हणून गौरव करण्यात आला. त्यांना शाल, श्रीफल, स्मृतिचिन्ह व सन्मानपत्र प्रदान करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षा विजया रहाटकर म्हणाल्या की, राजमाता जिजामाता या छत्रपती शिवाजी महाराजांच्या पहिल्या गुरु होत्या. देशातील अनेक राष्ट्रभक्त व्यक्तिमत्त्वे त्यांच्या मातांच्या संस्कारातूनच घडली आहेत. यावेळी त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मातोश्री हिराबेन यांच्या पुण्यतिथीचा उल्लेख करत त्यांच्या त्यागमय जीवनाचे भावपूर्ण वर्णन केले. बोलताना त्यांचा कंठ दाटून आला. पुढील वर्षी वंदे मातृशक्ती माता पूजन दिन देशभर साजरा व्हावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. खासदार बांसुरी स्वराज यांनी देशभरातील मातांच्या सन्मानार्थ असा उपक्रम राबविल्याबद्दल आयोजकांचे अभिनंदन केले. महिलांच्या सशक्तीकरणाला व मातांच्या गौरवाला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सर्वोच्च प्राधान्य दिले असल्याचे त्यांनी नमूद केले.

संयोजक महेंद्र लड्डा यांनी माता ही संस्कारांची मूळाधार, कुटुंबाचे हृदय व समाजाचा नैतिक केंद्रबिंदू असल्याचा संदेश समाजात दृढ करणे हाच या उपक्रमाचा उद्देश असल्याचे सांगितले.

अॅड. व्यंकट गुंड पाटील यांनी स्पष्ट केले की, 'वंदे मातृशक्ती माता पूजन दिन' हा केवळ सांस्कृतिक किंवा धार्मिक कार्यक्रम नसून मातृत्वाचे स्थान, महत्त्व व गौरव पुनर्स्थापित करणारे मूल्यनिष्ठ राष्ट्रीय अभियान आहे.

या कार्यक्रमासाठी महाराष्ट्रातून शेकडो नागरिकांनी दिल्लीत उपस्थिती लावली होती. रूपामाता फाउंडेशनच्या वतीने नववर्षानिमित्त दिल्ली दर्शन, उज्जैन महाकाल दर्शन, वृंदावन व मथुरा येथे आध्यात्मिक सहलींचेही आयोजन करण्यात आले.

समाजातील विविध स्तरांतून या उपक्रमाचे स्वागत होत असून वंदे मातृशक्ती माता पूजन दिन ही संकल्पना राष्ट्रीय पातळीवर रुजण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# रेणापूर नगराध्यक्षा शोभा अकनगिरेंनी स्वीकारला पदभार

**त.भा. वृत्तसेवा,**

**रेणापूर, १ जानेवारी :** तब्बल गेली तीन वर्षे प्रशासकांच्या ताब्यात असलेल्या रेणापूर नगरपंचायतीच्या लोकनियुक्त भारतीय जनता पक्षाच्या नगराध्यक्षा शोभाताई शामराव अकनगिरे यांनी आज गुरुवारी अधिकृतपणे पदभार स्वीकारला. यावेळी झालेल्या कार्यक्रमात रेणापूर शहराचा सर्वांगीण विकास हेच आमचे ध्येय असे प्रथम नगराध्यक्ष तथा नगरसेवक अभिषेक आकनगिरे यांनी बोलून दाखविले.

रेणापूर नगरपंचायतीच्या नगराध्यक्ष आणि नगरसेवक पदासाठी गेल्या २० डिसेंबर रोजी पार पडलेल्या निवडणुकीत लातूर ग्रामीणचे आमदार रमेशआप्पा कराड यांच्या नेतृत्वातील भारतीय जनता पार्टीच्या नगराध्यक्ष उमेदवारासह दहा नगरसेवक बहुमताने विजयी होऊन रेणापूर नगरपंचायतीवर पुन्हा एकदा भाजपाचा झेंडा फडकला. नवनिर्वाचित लोकनियुक्त नगराध्यक्ष शोभा शामराव आकनगिरे यांचा पदग्रहण सोहळा गुरुवार दि. १ जानेवारी २०२६ रोजी सकाळी संपन्न झाला. मोठ्या उत्साहाच्या वातावरणात फटाक्यांची आतिषबाजी करण्यात आली.

यावेळी रेणापूरचे तहसीलदार प्रशांत थोरात, नगरपंचायतीचे मुख्याधिकारी रोहित आरबोळे, अहमदपूरचे प्रतीक लंबे, प्रशासकीय अधिकारी प्रदीप पाटील, ज्योती वलांडे, अंकुश फड, अमोल बाजुळगे, महमूद शेख या अधिकारी कर्मचाऱ्यासह नवनिर्वाचित नगरसेवक अभिषेक आकनगिरे, सुमन मोटेगावकर, सुनिता बसतापुरे, दत्ता सरवदे, धरती गाडे, रबियाबी




शेख, हुसेना शेख, खैरोनिसा आत्तार, ज्योती चव्हाण, वाहेद शेख, प्रदीप राठोड त्याचबरोबर अधिकारी, भाजपचे पदाधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. पदभार स्वीकारल्यानंतर अनेकांनी शोभाताई आकनगिरे यांचे पुष्पगुच्छ देऊन पेढा भरून अभिनंदन केले.

यावेळी नगरपंचायत प्रशासनाच्या वतीने नगराध्यक्षा शोभा आकनगिरे यांच्यासह सर्व नवनिर्वाचित

### शहराचा सर्वांगीण विकास हेच ध्येय : आकनगिरे

नगरसेवकांचा यथोचित सत्कार करण्यात आला. याप्रसंगी बोलताना रेणापूरचे प्रथम नगराध्यक्ष तथा विद्यमान नगरसेवक अभिषेक आकनगिरे म्हणाले की, गेल्या तीन वर्षात प्रशासकीय कार्यकाळात नागरिकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागले. केंद्र आणि राज्यातील भाजपा शासनाच्या माध्यमातून आ. रमेशआप्पा कराड यांच्या मार्गदर्शनाखाली विविध विकास कामासाठी मोठ्या प्रमाणात निधी आणू. येणारी पाच वर्षे ही जनतेची असतील, नागरी सुविधासह रेणापूर शहराचा सर्वांगीण विकास हेच आमचे ध्येय आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नगरपंचायतीचे ज्ञानदेव दहिफळे यांनी केले. लोकप्रतिनिधी आणि प्रशासन दोघे मिळून निश्रि्चतपणे रेणापूरच्या विकासाला गती देण्याचे काम करू अशी ग्वाही दिली.

याप्रसंगी भाजपाचे बापूसाहेब कुलकर्णी, अच्युत कातळे, श्रीनिवास अकनगिरे, चंद्रकांत कातळे, दिलीप आकनगिरे, विजय चव्हाण, श्रीकृष्ण मोटेगावकर, उज्वल कांबळे, दिलीप राजे, राजकुमार आलापुरे, महेश काळे, हनुमंत भालेराव, उमेश सोमाणी, धनराज बरुरे, बंडू एचवाड, प्रभाकर बोरुडे, सुरेश भंडारे, उत्तम चव्हाण, दिलीप चव्हाण, गणेश चव्हाण, सुभाष राठोड, शेख अजीम, नरसिंग येलगटे, शिवाजी भावे, अंगद काळे, संजय वीरुळे, राजकुमार आकनगिरे, शेख शहंशाह, साधू लोकरे, खुद्दुस शेख, अंकित हाके, शंकर चक्रे, नंदकुमार बंडे, जगन्नाथ कातळे, सलीम शेख, शरद चक्रे, अंकुश मोटेगावकर, योगेश राठोड, कुमार आकनगिरे, धम्मानंद घोडके, ज्ञानेश्वर शिंदे, निलेश हुलगुंडे, मुनाफ शेख, सुरेश खोबरे, मनोज चक्रे, साताप्पा खोबरे, फारूक कुरेशी यांच्यासह भाजपाचे कार्यकर्ते पदाधिकारी लोकप्रतिनिधी रेणापूर येथील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# किल्लारी निळकंठेश्वर कारखान्याचे विक्रमी गाळप

**तभा वृत्तसेवा**

**औसा दि. १ जानेवारी :** गेल्या अनेक वर्षांपासून बंद अवस्थेत असलेला



औसा तालुक्यातील किल्लारी येथील श्री निळकंठेश्वर सहकारी साखर कारखाना आमदार अभिमन्यू पवार यांच्या दृष्टीपूर्ण नेतृत्वामुळे पुन्हा एकदा सहकार क्षेत्रात सक्षमपणे उभा राहिला आहे. आज यशाच्या शिखरावर पोहोचला असून या हंगामात एका दिवसात ३१०४.७७८ मे. टनाचे गाळप करुन आजपर्यंतचे सर्व विक्रम मोडित काढून नवा विक्रम केला आहे. बंद पडलेला कारखाना सुरू करताना आर्थिक, तांत्रिक व प्रशासकीय स्वरूपाच्या अनेक अडचणी समोर उभ्या राहिल्या होत्या. मात्र या सर्व

### एका दिवसात ३१०४.७७८ मेट्रिक टन ऊस गाळप

अडथळ्यांवर मात करत आ. अभिमन्यू पवार यांनी राज्य व केंद्र सरकारच्या सहकार्याने कारखान्याचे व्यापक नूतनीकरण करून तो पूर्ण क्षमतेने कार्यान्वित केला.

२०२५-२६ या गळीत हंगामात कारखान्याने गाळप सुरू करतानाच आपल्या इतिहासात नवा अध्याय लिहिला आहे. या हंगामात एका दिवसात तब्बल ३१०४.७७८ मेट्रिक टन ऊस गाळप करून कारखान्याने आजवरचा सर्वाधिक एकदिवसीय गाळपाचा उच्चांक प्रस्थापित केला आहे. हा विक्रम केवळ आकड्यांपुरता मर्यादित नसून उत्कृष्ट नियोजन, सक्षम व्यवस्थापन आणि शेतकरी-केंद्रित धोरणांचे ते जिवंत उदाहरण आहे.तर यावर्षी कारखाना गळीत हंगाम सुरु झाल्यापासून ९० हजार मे. टन ऊसाचे गाळप झाले आहे.

या कामगिरीबद्दल कारखाना व्यवस्थापनाच्या वतीने सर्व ऊस उत्पादक शेतकरी, तोडणी-वाहतूकदार, अधिकारी, कर्मचारी, कामगार व हितचिंतकांचे हार्दिक अभिनंदन व मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले आहेत. भविष्यातही अशीच एकजूट, गुणवत्ता व कार्यक्षमता कायम ठेवत सहकार क्षेत्रात नवे विक्रम प्रस्थापित करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. किल्लारी साखर कारखान्याच्या या यशामुळे परिसरातील शेतकरी वर्गात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून सहकार चळवळीला नवी उभारी मिळाली आहे.

### भविष्यात नवे विक्रम प्रस्थापित करणार : आ. पवार

किल्लारी साखर कारखान्याने प्रस्थापित केलेला हा ऐतिहासिक उच्चांक सर्वांच्या सामूहिक प्रयत्नांचा परिणाम असून बंद पडलेला कारखाना पुन्हा सुरू करताना अनेक अडचणी आल्या. मात्र केंद्र व राज्य सरकारच्या मदतीने तसेच शेतकरी, कामगार, अधिकारी व सहकारी संस्थांच्या विश्वासामुळे हे शक्य झाले. शेतकरी हित केंद्रस्थानी ठेवून कारखान्याचा विकास करण्यात आला असून भविष्यात आणखी नवे विक्रम प्रस्थापित करू, असा विश्वास आ. अभिमन्यू पवार यांनी व्यक्त केला आहे.

# अहमदपूर मधील टवाळखोरांचा बंदोबस्त करण्याची मागणी

**त.भा. वृत्तसेवा,**

**अहमदपूर, १ जानेवारी :** शिक्षण पंढरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अहमदपूर

### राष्ट्रवादी महिला काँग्रेसचे पोलीसांना निवेदन

शहरात गेल्या काही दिवसांपासून शाळा, महाविद्यालये आणि खाजगी शिकवणी परिसरात टवाळखोरांचा उपद्रव वाढला आहे. या गुंड प्रवृत्तीच्या तरुणांमुळे विद्यार्थिनींच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला असून, या प्रकाराला तात्काळ आळा घालण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसच्या (लातूर जिल्हा) महिला आघाडी जिल्हाध्यक्षा तथा नगरसेविका मिनाक्षी दिपकराव शिंगडे यांनी उपविभागीय पोलीस अधिकारी



यांना उद्देशून असलेले निवेदन पोलीस निरीक्षक विनोद मेत्रेवार यांची भेट घेऊन पोलीस स्टेशन अहमदपूर येथे दिले.

निवेदनात नमूद केल्यानुसार, अहमदपूर शहरात शिक्षणासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या मोठी आहे. मात्र, शाळा आणि शिकवणी सुटण्याच्या वेळी परिसरात अनेक टवाळखोर तरुण विनाकारण गर्दी करतात. हे तरुण येणाऱ्या-जाणाऱ्या विद्यार्थिनींची छेड काढणे, अश्लील भाषेत बोलणे, हावभाव करणे अशा कृत्यांत सामील आहेत.

इतकेच नाही तर, भरधाव वेगात दुचाकी चालवणे, कर्कश हॉर्न वाजवणे सारखे आवाज काढून परिसरात दहशत निर्माण करण्याचे प्रकार खुलेआम सुरू आहेत. यामुळे विद्यार्थिनींमध्ये भीतीचे वातावरण आहे.

# स्वामी विवेकानंद विद्यालयास स्मार्ट टीव्ही भेट

**त.भा. वृत्तसेवा,**

**अहमदपूर, १ जानेवारी :** स्वामी विवेकानंद माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय जानवळ



या शाळेतील कर्मचारी स्व. भारत गंगाधर पाटील यांच्या स्मरणार्थ ५५ इंची स्मार्ट टीव्ही भेट देण्यात आला. स्व. भारत गंगाधर पाटील यांनी आपल्या सेवाकाळातील सर्वाधिक सेवा याच शाळेत अतिशय प्रामाणिकपणे केली. आज नूतन वर्षाचे औचित्य साधून त्यांचे चिरंजीव तथा किलबिल नॅशनल स्कूलचे प्राचार्य संतोष भारत पाटील यांनी वडिलांच्या स्मरणार्थ शाळेस ५५ इंची स्मार्ट टीव्ही भेट देऊन आदरांजली अर्पण केली. आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे शिक्षण अधिक प्रभावी, व गुणवत्तापूर्ण व्हावे या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. या स्मार्ट टीव्हीच्या सहाय्याने विद्यार्थ्यांना डिजिटल शैक्षणिक साहित्य, व्हिडिओ लेक्चर्स, प्रात्यक्षिके तसेच विविध शैक्षणिक उपक्रमांचा लाभ मिळणार आहे.

या प्रसंगी मुख्याध्यापक रामेश्वर कदम, साळुंखे मॅडम, विजयकुमार बिरादार, पी टी साबदे, शिंदे, धाकपडे यांच्यासह शाळेतील शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. शाळेच्या वतीने प्राचार्य संतोष पाटील यांच्या या योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. या उपक्रमातून स्व. भारत गंगाधर पाटील यांच्या स्मृतीस भावपूर्ण आदरांजली अर्पण करण्यात आली.

# ज्ञानदीप स्कॉलर नॅशनल स्कूलमध्ये फॅन्सी ड्रेस स्पर्धा

**त.भा. वृत्तसेवा,**

**चाकूर, १ जानेवारी :** चाकूर येथील ज्ञानदीप स्कॉलर नॅशनल स्कूल हे चाकूर व चाकूर परिसरात गुणवत्तेत व विविध कलागुणात नेहमीच अग्रेसर असणाऱ्या या शाळेत विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव मिळावा म्हणून दि.०१ जानेवारी रोजी नवीन वर्षानिमित्त फॅन्सी ड्रेस स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

या स्पर्धेत शाळेतील विद्यार्थ्यांनी विविध पारंपारिक वेशभूषा, सामाजिक संदेश देणारे देखावे त्यात छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, संत बसवेश्वर, महात्मा ज्योतिबा फुले, राष्ट्रमाता जिजामाता, सावित्रीबाई फुले, वारकरी, महादेव पार्वती, राधा-कृष्ण, सरस्वती, डॉक्टर, वकील, पायलट, परी, नायक, शेतकरी, सिनेअभिनेते,



ट्रफिक सिग्नल, पोलीस, सैनिक व विविध सामाजिक संदेश देणाऱ्या वेशभूषा परिधान करून सामाजिक सलोखा राखण्याचा प्रयत्न या फॅन्सी ड्रेस स्पर्धेत साकारण्यात आला.

वृक्षतोड थांबवणे, शेती मालाला योग्य भाव, गुड हॅबिट, बॅड हॅबिट, मुलांना संस्कार, शिक्षणाचे महत्त्व, महापुरुषांचे विचार, शेतकऱ्यांच्या व्यथा, सिने अभिनेत्यांचे सादरीकरण आदी बाबींवर प्रकाश टाकला.

सावित्रीबाई, जिजामाता, छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा बसवेश्वर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंदींचे विचारही विद्यार्थ्यांनी मांडले. तसेच या फॅन्सी ड्रेस स्पर्धेच्या माध्यमातून विविध सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक संदेश देण्यात आले.

या कार्यक्रमाचे उद्घाटन पत्रकार सतिश गाडेकर यांच्या हस्ते करण्यात आले आणि प्रमुख पाहुणे म्हणून रवी पालापुरे, अमोल हाळे,राम सांगवे, शेख लतिफ आदि मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि आभार प्रदर्शन संचालक परमेश्वर ढगे यांनी मांडले. तर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रदीप शंकरे, विश्ववंदन सोनकांबळे, एकता ढगे, यमुना शिंदे, हिरा वर्मा, आश्विनी जाधव, इशराक सय्यद, रेखा कदम, भिमाळे वैष्णवी, नरवटे प्रांजली, महानंदा शेकडे आदींनी परिश्रम घेतले.

# दैठणा ग्रामपंचायतीची स्वच्छतेकडे भक्कम वाटचाल

**त.भा. वृत्तसेवा,**

**शिरूर अनंतपाळ, १ जानेवारी :** दैठणा (ता. शिरूर अनंतपाळ) ग्रामपंचायतीने स्वच्छतेच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलत गावातील प्रत्येक घराला कचराकुंडी वाटप करण्याचा निर्णय घेतला आहे. ग्रामपंचायतीच्या या उपक्रमाचे गावातील तरुण वर्ग, महिला तसेच ज्येष्ठ नागरिकांकडून मोठ्या प्रमाणात कौतुक होत आहे.

घरगुती कचऱ्याचा प्रश्न्न हा रोजचा आणि कायमस्वरूपी असतो. विशेषतः सकाळच्या वेळी घरातील कचरा कुठे टाकायचा, हा प्रश्न महिलांसाठी मोठी डोकेदुखी ठरत असतो. या समस्येवर प्रभावी उपाय म्हणून दैठणा ग्रामपंचायतीने घेतलेला कचराकुंडी वाटपाचा निर्णय अत्यंत स्वागतार्ह असल्याचे नागरिकांचे मत आहे.



नवीन वर्षाच्या स्वागतानिमित्त दैठणा ग्रामपंचायतीने गावातील प्रत्येक घराला एक कचराकुंडी देण्याचा संकल्प केला असून, या निर्णयामुळे गावातील स्वच्छता व्यवस्थेला मोठी चालना मिळणार आहे. विशेषतः महिला वर्गातून या उपक्रमाबद्दल समाधान व्यक्त केला जात आहे.

या उपक्रमाबद्दल दैठणा गावाचे सरपंच शेषरावजी कांबळे, उपसरपंच आशिष बिरादार तसेच ग्रामपंचायत सदस्य तोटे मॅडम उर्फ पन्नू आणि संपूर्ण ग्रामपंचायत टीमचे गावकऱ्यांकडून आभार मानले जात आहेत.

दिनांक ३० डिसेंबर २०२५ रोजी कचराकुंडी वाटपाला अधिकृत सुरुवात करण्यात आली. यावेळी गावातील अनेक नागरिक व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमास उपसरपंच योगेशजी बिरादार, सरपंच शेषरावजी कांबळे, ग्रामसेवक तोटे मॅडम, छायाबाई पेंटमशेटे, सदानंद पाटील, अमोल बिरादार, परमेश्र्वर बिरादार, कुमार बिरादार, सिद्धार्थ तोटे, ओमकार येडले, माधव येडले, आकाश स्वामी आदी मान्यवर उपस्थित होते.

# उष्टी बोरांतून प्रकटले निष्कलंक भक्तीचे अमृत

**त.भा. वृत्तसेवा,**

**वलांडी, १ जानेवारी :** देवणी तालुक्यातील धनेगाव येथे सुरू असलेल्या भव्य हरिनाम सप्ताह व भव्य-दिव्य संगीत तुलसी रामायण कथेमध्ये रामायणातील शबरी प्रसंगाने उपस्थित भाविकांची मने जिंकली. निष्ठावान भक्ती, निस्वार्थ प्रेम आणि जाती-धर्माच्या पलीकडील मानवी मूल्यांचे दर्शन घडविणारा हा प्रसंग रामायणाचार्य गोपाळ थोटे यांनी आपल्या संगीतमय कथेत अत्यंत हृदयस्पर्शी पद्धतीने सादर केला.



रामकथेतील भिल्ल कन्या शबरी हिने प्रभू श्रीरामांच्या आगमनाची अनेक वर्षे अखंड प्रतीक्षा केली. आपल्या निष्कलंक भक्तीने, निस्वार्थ सेवाभावाने तिने प्रभू श्रीरामांचे हृदय जिंकले. शबरी ही मातंग ऋषींची शिष्या होती. विवाहप्रसंगी संसाराचा त्याग करून तिने मातंग ऋषींना शरण जात आश्रमात सेवा स्वीकारली. तिच्या सेवाभावाने प्रसन्न झालेल्या मातंग ऋषींनी, एक दिवस श्रीराम तुझ्या आश्रमात येतील, त्यांच्या आगमनाची प्रतीक्षा कर, अशी आज्ञा दिली.

मातंग ऋषींनी समाधी घेतल्यानंतरही शबरीने त्यांची आज्ञा अक्षरशः पाळली. राम-लक्ष्मणांच्या प्रतीक्षेत तिने संपूर्ण आयुष्य घालवले. प्रभू श्रीरामांच्या आगमनासाठी ती रोज जंगलातील वाटा स्वच्छ करत असे. काटे-कुटे दूर करून श्रीरामांच्या कोमल पावलांना कोणताही त्रास होऊ नये, याची ती विशेष काळजी घेत असे.

ज्या प्रेमाने व भक्तीने ही बोरे दिली आहेत, त्यापुढे कोणतेही अमृत श्रेष्ठ नाही, असे सांगत प्रभू श्रीरामांनी शबरीची उष्टी बोरे आनंदाने स्वीकारली. या प्रसंगातून भक्तीत कोणताही भेदभाव नसतो; शुद्ध प्रेम, निष्ठा व समर्पणालाच परम महत्त्व असते, हा संदेश भाविकांच्या मनात ठसवण्यात आला.

या परम सेवाभावामुळे शबरीला मोक्षप्राप्ती झाली. रामायणानुसार ती पम्पासरोवरात विलीन झाली. धनेगावातील हरिनाम सप्ताहात सादर झालेल्या या शबरी प्रसंगाने उपस्थित भाविकांना प्रेम, समता आणि भक्तीचा अमर संदेश दिला. या कथेला माऊली मोहीते, महेश लोनकर, तेजस चाळक व बाबुराव गुरव यांनी सुरेल संगीतबद्ध साथ दिली. कथाश्रवणासाठी भाविकांची लक्षणीय उपस्थिती होती.

सप्ताहादरम्यान दररोज ज्ञानेश्र्वर महाराज, बंडा महाराज अलगरवाडीकर, संजय महाराज खडकउमरगेकर, राजेश पाटील गुंजरगेकर, प्रशांत महाराज खानापुरकर, ज्ञानेश्वर महाराज कदम (आळंदी) यांची कीर्तने झाली.

शुक्रवारी शरद महाराज जकेकुरकर यांच्या कीर्तनानंतर शनिवारी सकाळी संदीपान महाराज सुमठाणकर यांच्या काल्याच्या कीर्तनानंतर महाप्रसादाने सप्ताहाची सांगता होणार आहे.

# एसटीआय पदसंख्येत खुल्या प्रवर्गाला समाविष्ठ करण्याचे मुख्यमंत्र्यांचे आदेश

**त.भा. वृत्तसेवा,**

**औसा, १ जानेवारी :** महाराष्ट्र अराजपत्रित सेवा गट-ब परीक्षा २०२५ अंतर्गत होणाऱ्या एसटीआय भरती प्रक्रियेबाबत हजारो परीक्षार्थींना दिलासा देणारी अत्यंत महत्त्वाची घडामोड समोर आली आहे. जुलै २०२५ मध्ये प्रसिद्ध झालेल्या जाहिरातीत एसटीआय पदांच्या एकूण २७९ जागांचा समावेश करण्यात आला होता. मात्र या सर्व जागा केवळ आरक्षित प्रवर्गांसाठी राखीव ठेवण्यात आल्याने खुल्या प्रवर्गावर अन्याय होत असल्याची बाब आ. अभिमन्यू पवार यांनी निदर्शनास आणुन दिली. यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी खुल्या प्रवर्गास एसटीआय मध्ये जागा वाढवून समाविष्ठ करण्याचे आदेश बुधवार दि. ३२ रोजी दिले आहेत.

या प्रवर्गामध्ये खुल्या प्रवर्गासाठी एकही पद नसल्याची बाब समोर आली होती. यामुळे राज्यभरातील खुल्या प्रवर्गातील परीक्षार्थींमधून नाराजी होती. तसेच अन्यायकारक व गंभीर बाब असल्याचे आ.

### एसटीआय पदसंख्येत वाढ; आ. आभिमन्यू पवारांचा पाठपुरावा

अभिमन्यू पवार यांच्या निदर्शनास परीक्षार्थींनी आणून दिले. त्याची तात्काळ दखल घेत महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांची भेट घेऊन या विषयावर सविस्तर चर्चा केली. महाराष्ट्र अराजपत्रित सेवा गट-ब परीक्षा २०२५ च्या भरती प्रक्रियेसाठी एसटीआय पदसंख्येत तात्काळ वाढ करावी तसेच वाढीव पदांमध्ये खुल्या प्रवर्गासाठी जास्तीत



जास्त जागांचा समावेश करावा, अशी ठाम व स्पष्ट मागणी त्यांनी यावेळी मांडली.

आमदार अभिमन्यू पवार यांनी परीक्षार्थी युवकांच्या भावना, त्यांनी घेतलेली मेहनत तसेच स्पर्धात्मक परीक्षांमधील समान व न्याय्य संधीचे महत्त्व अधोरेखित केले. या मागणीची गांभीर्याने दखल घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सदर प्रकरण तत्काळ मार्गी लावण्याच्या सूचना दिल्या. अप्पर मुख्य सचिव (सामान्य प्रशासन विभाग) तसेच वित्त विभाग यांना तात्काळ कार्यवाही करण्याचे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत.या निर्णयामुळे एसटीआय पदसंख्या वाढण्याचा मार्ग मोकळा झाला असून खुल्या प्रवर्गातील परीक्षार्थींनाही न्याय मिळण्याची आशा बळावली आहे. राज्यातील लाखो युवक-युवतींसाठी ही बाब अत्यंत दिलासादायक ठरणार असून, लवकरच याबाबत अधिकृत व सकारात्मक निर्णय जाहीर होण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे.

धाराशिव
# जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## लोहारा तालुक्यात बदनामीकारक मजकूर लिहिणारी टोळी सक्रिय

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.१ जानेवारी -**

शहर व परिसरात सार्वजनिक ठिकाणी बदनामीकारक मजकूर लिहिणारी टोळी सक्रिय झाली असून याबाबत गंभीर कारवाई करण्याची मागणी नागरिकांतून होत आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, लोहारा शहरात बसस्थानक परिसर, लोहारा तुळजापूर रोडवरील सरकारी नामफलक व बेंडकाळ येथील मुख्य चौकात गेल्या दोन महिन्यांपासून बदनामीकारक मजकूर लिहिणारी टोळी सक्रिय झाली आहे. ही टोळी दोन महिन्यांपासून सतत मजकूर लिहीत असल्याने नागरिकांत संताप व्यक्त केला जात आहे. याबाबत काही नागरिकांनी पाळत ठेवल्यानंतर सुद्धा अशा पध्दतीनच्या घटना घडत आहेत. ही टोळी इतर गुन्ह्यातील असून मानसिक संतुलन ढासळलेली असून याला काही दलाल गुन्हेगारांची साथ असण्याची चर्चा सद्या सर्वत्र सुरू आहे. त्यामुळे याबाबत तात्काळ चौकशी करून सदरील गुन्हेगारांवर तात्काळ कडक कारवाई करण्याची मागणी सर्व नागरिकांतून होत आहे.

# तेरखेडा-कडकनाथवाडी रस्त्याची दयनीय अवस्था; अपघातांची मालिका, जबाबदारी कोणाची?

**तभा वृत्तसेवा / सुधीर घोलप**
**वाशी, दि.१ जानेवारी -**

धाराशिव जिल्ह्यातील वाशी तालुक्यातील तेरखेडा ते कडकनाथवाडी दरम्यानचा रस्ता सध्या अत्यंत दयनीय अवस्थेत असून नागरिकांच्या जीविताला धोका निर्माण झाला आहे. रस्त्यावर ठिकठिकाणी मोठमोठे खड्डे पडले असून रस्त्यात खड्डे की खड्ड्यात रस्ता, हे ओळखणेही कठीण झाले आहे. सद्यस्थितीत हा मार्ग शेतरस्ता आहे की डांबरी रस्ता, असा प्रश्न नागरिक उपस्थित करत आहेत.

तेरखेडा-कडकनाथवाडी-बार्शी हा मार्ग अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्रातील जिल्ह्यांना जोडणारा हा प्रमुख रस्ता असून सोलापूर जिल्ह्यातील बार्शी येथे अत्याधुनिक वैद्यकीय सुविधा उपलब्ध असल्याने वाशी तालुक्यातील नागरिक उपचारासाठी याच मार्गाचा मोठ्या प्रमाणावर वापर करतात.

मात्र रस्त्याच्या खराब अवस्थेमुळे रुग्णांना वेळेत उपचार मिळण्यात अडथळे येत असून नागरिकांना आर्थिक व मानसिक त्रास सहन करावा लागत आहे.

बार्शी ही मोठी बाजारपेठ असल्याने धाराशिव जिल्ह्यातील शेतकरी शेतमाल विक्रीसाठी याच रस्त्याने प्रवास करतात. मात्र रस्त्याच्या दुर्दशेमुळे वाहतूक खर्च वाढला असून अपघाताचा धोका कायम आहे.

रस्त्याचे अरुंद स्वरूप आणि खराब अवस्था यामुळे गेल्या काही दिवसांपासून या मार्गावर अपघातांची मालिका सुरू आहे.

२९ डिसेंबर रोजी कडकनाथवाडी येथे झालेल्या अपघातात दोघांचा मृत्यू झाला होता, तर यापूर्वी १० नोव्हेंबर रोजीही एका व्यक्तीला आपला जीव गमवावा लागला होता. या सततच्या अपघातांमुळे परिसरातील नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

दरम्यान, कडकनाथवाडी शिवारात पवनऊर्जा प्रकल्पाची कामे सुरू असून या रस्त्यावरून अवजड वाहनांची मोठ्या प्रमाणावर वाहतूक होत आहे. त्यामुळे रस्त्याची अवस्था आणखी खालावली असून अपघातांचे प्रमाण वाढल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

या पार्श्वभूमीवर अपघातांसाठी जबाबदारी नेमकी कोणाची, याबाबत वेगवेगळी मते मांडली जात आहेत. काही नागरिकांचा आरोप आहे की संबंधित रस्ते विभागाच्या दुर्लक्षामुळे निष्पाप नागरिकांचे बळी जात आहेत. तर काहींच्या मते पवनचक्की कंपन्यांची अवजड व बेदरकार वाहतूक अपघातांना कारणीभूत ठरत आहे.

तसेच काही रस्ता अभ्यासकांचे म्हणणे आहे की रस्त्यालगतच्या काही शेतकऱ्यांनी पवनचक्की कंपन्यांना अडचण निर्माण करण्याच्या उद्देशाने रस्त्याच्या कडेला चर खोदल्याने रस्ता अधिक अरुंद झाला आहे. त्यामुळे समोरासमोर येणाऱ्या वाहनांना वाट देणे कठीण होत असून अपघात अटळ ठरत आहेत.

यापूर्वी संबंधित रस्ते विभागाने अशा प्रकारे चर खोदणाऱ्या शेतकऱ्यांना नोटिसा बजावून जीवितहानी होऊ शकते, असा इशाराही दिला होता.

एकूणच अरुंद व खराब रस्ता, पवनचक्की कंपन्यांची अवजड वाहतूक आणि प्रशासनाचे दुर्लक्ष या तिन्ही कारणांमुळे कडकनाथवाडी रस्त्यावर अपघात होत असल्याचे स्पष्ट होत आहे.

आता तरी संबंधित विभाग, पवनऊर्जा कंपन्या आणि नागरिकांनी सामूहिक जबाबदारी स्वीकारून तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून होत आहे.




## परंडा-पाथरूड राज्य महामार्गाची दुरवस्था; बेमुदत 'रस्ता रोको'

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.१ जानेवारी -**

परंडा-पाथरूड राज्य महामार्ग क्रमांक २१० ची अवस्था अत्यंत दयनीय झाली असून, वारंवार निवेदने व सूचना देऊनही सार्वजनिक बांधकाम विभागाकडून याकडे दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

या निषेधार्थ आणि रस्त्याच्या तातडीच्या दुरुस्तीच्या मागणीसाठी सोनारी ग्रामस्थांनी आंदोलनाचा इशारा दिला आहे.

येत्या ६ जानेवारीपर्यंत रस्त्याचे प्रत्यक्ष काम सुरू न झाल्यास बेमुदत 'रस्ता रोको' आंदोलन छेडण्यात येईल, असा ठाम इशारा ग्रामपंचायतीच्या वतीने देण्यात आला आहे.

ग्रामपंचायतीने दिलेल्या निवेदनात प्रशासनाने येत्या पाच दिवसांत (६ जानेवारीपर्यंत) या मागणीची दखल घेऊन रस्त्याच्या दुरुस्तीचे काम सुरू करावे, अन्यथा समस्त सोनारी ग्रामस्थांच्या वतीने बेमुदत रस्ता रोको आंदोलन करण्यात येईल, असे स्पष्ट करण्यात आले आहे. आंदोलनादरम्यान होणाऱ्या सर्व परिणामांची जबाबदारी सार्वजनिक बांधकाम विभागावर राहील, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

हे निवेदन देताना रवी मांडवे, सचिन पवार, अविनाश हांगे, गणेश फले आदी उपस्थित होते.

या निवेदनाच्या प्रती जिल्हाधिकारी धाराशिव, पोलीस अधीक्षक धाराशिव, तहसीलदार परंडा व आंबी पोलीस स्टेशन यांना माहितीसाठी पाठवण्यात आल्या आहेत.

## व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालयात 'गझल लेखन-तंत्र व प्रकार' कार्यशाळा संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१ जानेवारी -**

येथील व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालयात 'गझल लेखन - तंत्र व प्रकार' या विषयावर एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेचे उद्घाटन पुणे विद्यापीठातील माजी मराठी विभागप्रमुख प्रा.डॉ. अविनाश सांगोलकर यांच्या हस्ते झाले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा.डॉ. प्रशांत चौधरी होते. यावेळी व्यासपीठावर संस्था सदस्य डॉ. अभय शहापूरकर, प्रा.डॉ. सुलभा देशमुख, प्रा. डॉ. अनार साळुंके, युवराज नळे आदी मान्यवर उपस्थित होते.

ही कार्यशाळा मराठी विभाग, अक्षरवेल साहित्य मंडळ धाराशिव, साहित्य भारती शाखा धाराशिव, मराठवाडा साहित्य परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियान (रुसा) यांच्या सहयोगाने आयोजित करण्यात आली होती.

उद्घाटनपर भाषणात प्रा.डॉ. अविनाश सांगोलकर यांनी मराठी साहित्यातील गझल प्रकाराचे महत्त्व, तिचे सौंदर्य, भावसूत्रे आणि साहित्यिक योगदान याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी डॉ. अनार साळुंके व डॉ. अभय शहापूरकर यांनीही आपली मनोगते व्यक्त केली. प्रास्ताविकात प्राचार्य प्रा.डॉ. प्रशांत चौधरी यांनी कार्यशाळेच्या आयोजनामागील भूमिका स्पष्ट केली. कार्यशाळेत डॉ. राज रणधीर, श्री वैभव कुलकर्णी, श्री दास पाटील व श्रीमती स्नेहलता झरकर अंदुरे यांनी गझल लेखन तंत्र या विषयावर मार्गदर्शन केले. या प्रसंगी कवी राजेंद्र अत्रे, भागवत घेवारे, युवराज नळे, डॉ. अरविंद हंगरगेकर, सौ. अपर्णा चौधरी, किरण देशमाने, रविंद्र शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. प्रशांत गुरव व प्रा.डॉ. कृष्णा तेरकर यांनी केले, तर आभार प्रा.डॉ. सहदेव रसाळ यांनी मानले. कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी प्रा.डॉ. सहदेव रसाळ, प्रा.डॉ. मारुती गोरे, प्रा.डॉ. कृष्णा तेरकर, प्रा. प्रमोद पाटील यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक व कर्मचारी वर्गाने परिश्रम घेतले.

या कार्यशाळेला विद्यार्थी तसेच गझलप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मनोज हुडगे यांच्या प्रामाणिकपणाचा आदर्श

**खात्यावर १५ हजारांऐवजी चुकीने आलेले २५ हजार रुपये केले परत...**



**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.१ जानेवारी -**

आजच्या काळात आर्थिक व्यवहारांमध्ये गैरप्रकार वाढताना दिसत असताना, लोहारा तालुक्यातील माकणी येथील एल.आय.सी. एजंट मनोज हुडगे यांनी आपल्या प्रामाणिकपणाने समाजासमोर प्रेरणादायी आदर्श घालून दिला आहे.

मनोज हुडगे हे रूपामाता अर्बन बँक, लोहारा शाखेत आपल्या मुदतठेवीवरील (एफ.डी.) व्याजाची रक्कम घेण्यासाठी गेले होते. मात्र बँकेच्या ऑनलाईन व्यवहारातील तांत्रिक त्रुटीमुळे त्यांच्या खात्यात १५ हजार रुपयांऐवजी चुकून २५ हजार रुपये जमा झाले. ही बाब त्यांच्या लक्षात येताच त्यांनी तत्काळ बँकेत जाऊन जादा जमा झालेले १० हजार रुपये बँकेचे कॅशियर मंगेश माळवदकर यांच्याकडे सुपूर्द केले.

आजच्या स्पर्धात्मक व स्वार्थी युगात अशी इमानदारी दुर्मिळ होत चालली असताना, मनोज हुडगे यांच्या या कृतीचे बँक प्रशासनासह परिसरातील नागरिकांनी मनापासून कौतुक केले. त्यांच्या प्रामाणिक व जबाबदार वर्तनामुळे सामाजिक मूल्यांना नवी दिशा मिळाली आहे.

मनोज हुडगे हे सुसंस्कृत कुटुंबप्रमुख असून त्यांचा मुलगा सोहम हुडगे हा सातारा सैनिक शाळेतून प्रशिक्षण घेऊन सध्या डेहराडून येथे लेफ्टनंट (क्लास वन) या पदावर कार्यरत आहे. यावरूनच कुटुंबातूनच संस्कार, शिस्त व प्रामाणिकपणाची शिकवण मिळाल्याचे स्पष्ट होते.

या प्रसंगी बँकेचे शाखा व्यवस्थापक व सर्व कर्मचारी उपस्थित होते.

नवीन वर्षाच्या निमित्ताने रूपामाता अर्बन बँकेच्या वतीने मनोज हुडगे यांचा सत्कार करण्यात आला तसेच त्यांना कॅलेंडर भेट म्हणून देण्यात आले.

मनोज हुडगे यांच्या या स्तुत्य कृतीमुळे समाजात इमानदारी, माणुसकी व सामाजिक जबाबदारीचे महत्त्व पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे.

## खंडोबा यात्रेत महिलांच्या नाचगाण्यांना परवानगी न देण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१ जानेवारी -**

नळदुर्ग येथील श्रीक्षेत्र मैलारपुर येथे भरणारी श्री खंडोबा देवाची यात्रा सुरळीत व शांततेत पार पडावी यासाठी पोलिस प्रशासनाने यात्रेदरम्यान तमाशा तसेच महिलांच्या नाचगाण्यांच्या कार्यक्रमांना परवानगी देऊ नये, अशी मागणी भाविक व नागरिकांकडून होत आहे.

श्रीक्षेत्र मैलारपुर येथील खंडोबा यात्रेला शेकडो वर्षांची परंपरा असून ही यात्रा महाराष्ट्रात प्रसिद्ध आहे. यात्रेदिवशी येथे किमान ५ ते ६ लाख भाविक उपस्थित राहतात. त्यामुळे भाविकांच्या सुरक्षेची मोठी जबाबदारी पोलिस प्रशासनावर असते.

मागील काळात यात्रेदरम्यान तमाशांना परवानगी देण्यात आली होती. मात्र काही वर्षांपूर्वी तमाशाच्या कार्यक्रमावेळी मोठ्या प्रमाणात दगडफेक झाल्याची घटना घडली होती. या घटनेत अनेकजण जखमी झाले होते, तसेच तमाशाच्या वाहनांचेही मोठे नुकसान झाले होते. दगडफेकीमुळे यात्रेकरूंमध्ये भीतीचे वातावरण निर्माण होऊन यात्रा विस्कळीत झाली होती. या घटनेनंतर पोलिस प्रशासनाने यात्रेत तमाशांना परवानगी देणे बंद केले होते.

मात्र सध्या यात्रेदरम्यान महिलांच्या नाचगाण्यांच्या कार्यक्रमांना परवानगी दिल्याची माहिती मिळत आहे. अशा कार्यक्रमांचा गैरफायदा घेऊन काही हुल्लडबाज व टपोरी प्रवृत्तीचे लोक गोंधळ घालण्याची शक्यता नाकारता येत नाही.

त्यामुळे मागील कटू अनुभव लक्षात घेऊन यात्रा शांततेत व सुरक्षित वातावरणात पार पडावी यासाठी पोलिस प्रशासनाने अशा प्रकारच्या कार्यक्रमांना परवानगी देऊ नये, अशी मागणी केली जात आहे.

## डॉ. येळापूरे म्हणजे उमरग्याच्या आरोग्यसेवेतील विश्वासाचे प्रतीक : माजी मंत्री बसवराज पाटील



**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.१ जानेवारी -**

उमरगा शहरातील संगमेश्वर हॉस्पिटलच्या माध्यमातून हजारो रुग्णांना नवजीवन देणारे डॉ. सुभाष येळापूरे हे केवळ डॉक्टर नसून सेवाभाव, समाजनिष्ठा आणि माणुसकी यांचे चालते-बोलते उदाहरण आहेत. उमरग्याच्या आरोग्यसेवेत त्यांचे नाव म्हणजे विश्वास, आधार आणि श्रद्धेचे प्रतीक असल्याची भावना माजी मंत्री तथा भाजप लातूर ग्रामीण जिल्हाध्यक्ष बसवराज पाटील यांनी व्यक्त केली.

याप्रसंगी व्यासपीठावर पंढरपूर मंदिर समितीचे सह-अध्यक्ष हभप. गहिनीनाथ महाराज औसेकर, आमदार प्रविण स्वामी, माजी खासदार रविंद्र गायकवाड, माजी आमदार ज्ञानराज चौगुले, रामकृष्ण खरोसेकर, अहमदपूरचे नगराध्यक्ष स्वप्नील व्हते, सभापती बसवराज कस्तुरे, माजी सभापती जितेंद्र शिंदे, संताजी चालुक्य, अभय चालुक्य, मदन पाटील, विश्वनाथ भरमशेट्टी आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला वाराणसी येथून आलेल्या पंडितांनी मंत्रोच्चारात सादर केलेल्या गंगा आरतीने उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते सत्कारमूर्ती डॉ. सुभाष येळापूरे व ललिता सुभाष येळापूरे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी आमदार प्रविण स्वामी व माजी खासदार रविंद्र गायकवाड यांनी मनोगत व्यक्त करत, ग्रामीण भागात अत्यंत अल्प दरात वैद्यकीय सेवा देत डॉ. सुभाष येळापूरे यांनी सामाजिक बांधिलकी जपत असंख्य रुग्णांना दिलेल्या आधाराचे कौतुक केले व त्यांना शुभेच्छा दिल्या.

या सोहळ्याचे विशेष आकर्षण म्हणजे गोळ्या-औषधांनी करण्यात आलेला डॉ. सुभाष येळापूरे यांचा तुलाभार. यावेळी राज्यभरातील वैद्यकीय, सामाजिक, शैक्षणिक व विविध क्षेत्रांतील अनेक मान्यवर शुभेच्छा देण्यासाठी उपस्थित होते. कार्यक्रमाची सांगता नाथ संस्थानचे हभप. गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या आशीर्वचनाने झाली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. निलेश येळापूरे यांनी केले, तर सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन शैलजा हसबे यांनी केले.

कार्यक्रमास डॉ. काशिनाथ चिंचोळी, डॉ. मल्लिनाथ मलंग, डॉ. उदय मोरे, मुरूमचे माजी नगराध्यक्ष रशीद शेख, नितीन होळे, मेघराज बरबडे, प्राचार्य उल्हास घुरघुरे, चेअरमन दत्ता चटगे, नगरसेवक गौस शेख, रमेश चव्हाण, सुजित शेळके यांच्यासह वैद्यकीय, शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील मान्यवर आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## 'नो व्हिस्की, नो बियर'च्या घोषणेत येडाई व्यसनमुक्ती केंद्रात 'व्यसनमुक्ती गुणगौरव पुरस्कार २०२५' उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१ जानेवारी -**

येडाई व्यसनमुक्ती व पुनर्वसन केंद्र, येरमाळा येथे दि.३१ डिसेंबर २०२५ रोजी व्यसनमुक्ती गुणगौरव पुरस्कार २०२५ कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. नववर्षाच्या पार्श्वभूमीवर आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात व्यसनमुक्त जीवन जगणाऱ्या परिवर्तनवादी रुग्णमित्रांचा सन्मान करण्यात आला.




या कार्यक्रमास उपविभागीय पोलीस अधिकारी संजय पवार, येरमाळा पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक तात्याराव भालेराव, येरमाळा प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. बिराजदार, येडाई व्यसनमुक्ती केंद्राचे संचालक डॉ. संदीप तांबारे, डॉ. पल्लवी तांबारे व सुमन तांबारे यांची प्रमुख उपस्थिती होती.

गुणगौरव सोहळ्यानिमित्त केंद्रामध्ये दिवसभर विविध सांस्कृतिक व कलागुणांचे प्रात्यक्षिके घेण्यात आली. यामध्ये गायन, नृत्य, एकांकिका, नाट्यप्रयोग तसेच विविध खेळांचे आयोजन करण्यात आले. याचबरोबर येडाई व्यसनमुक्ती केंद्रातून उपचार घेऊन ३, ५, ७ व १० वर्षे यशस्वीरीत्या व्यसनमुक्त जीवन जगणाऱ्या परिवर्तनवादी रुग्णमित्रांचा विशेष सत्कार करण्यात आला.

यावेळी मार्गदर्शन करताना उपविभागीय पोलीस अधिकारी संजय पवार म्हणाले, फक्त स्वतः व्यसन सोडणे पुरेसे नाही, तर आपल्या समाजातील, गावातील, तालुक्यातील व जिल्ह्यातील लोकांनाही व्यसनमुक्तीसाठी प्रवृत्त करणे हीच खरी समाजसेवा आहे.

येरमाळा पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक तात्याराव भालेराव यांनी आपल्या संदेशात सांगितले, आपण केलेल्या कष्टांचे योग्य फळ कुटुंबाला आणि समाजाला द्यायचे असेल, तर व्यसनमुक्त जीवन जगणे अत्यावश्यक आहे. यावेळी त्यांनी येडाई व्यसनमुक्ती केंद्रात राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांचे कौतुक करत डॉ. संदीप तांबारे, डॉ. पल्लवी तांबारे व संपूर्ण कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले. डॉ. बिराजदार यांनी आपल्या भाषणात सांगितले, व्यसनामुळे शरीराची व मनाची होणारी दुर्दशा टाळायची असेल, तर विचारांना योग्य दिशा देण्याची हीच योग्य वेळ आहे. याचा लाभ केवळ व्यक्तीलाच नव्हे, तर संपूर्ण कुटुंबालाही होतो.

कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी डॉ. संदीप तांबारे यांनी मनोगत व्यक्त करताना म्हणाले, व्यसनमुक्तीचा लढा सोपा नाही; मात्र या परिवर्तनवादी रुग्णमित्रांकडूनच आम्हाला नवी ऊर्जा आणि प्रेरणा मिळते. 'व्यसनमुक्त भारत - सशक्त भारत' हेच आमचे ध्येय आहे. यावेळी त्यांनी नो व्हिस्की, नो बियर-हॅपी न्यू इयर, दारू सोडा दूध प्या असा प्रभावी संदेश दिला.

या यशस्वी कार्यक्रमासाठी येडाई व्यसनमुक्ती केंद्राचे प्रकल्प समन्वयक गणेश परदेशी यांच्यासह बापूराव हुलुळे, संजय कांबळे, ऋषिकेश लोभे, सुदर्शन तामाने, राजकुमार मुंडे, समीर फरताडे, प्रियंका शिंदे, कल्पना कोठावळे, कविता तांबारे, कानिफनाथ डाखोरे व भारत सातपुते यांनी विशेष परिश्रम घेतले.

कार्यक्रमाच्या शेवटी संपूर्ण परिसरात नो व्हिस्की, नो बियर या घोषवाक्याने दणाणून सोडत उपस्थितांनी व्यसनमुक्त नववर्षाचा संकल्प केला.

लातूर
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## अपघात रोखण्यासाठी वाहतूक नियमांचे पालन आवश्यक

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १ जानेवारी :** प्रत्येक व्यक्तीचा जीव मौल्यवान असतो, मात्र वाहतूक नियमांचे पालन न केल्याने आपण आपला आणि इतरांचाही जीव धोक्यात टाकतो. देशात जवळपास एक ते दीड लाख व्यक्तींचा दरवर्षी अपघातात मृत्यू होतो, यामध्ये सुमारे दहा ते अकरा टक्के मृत्यू आपल्या राज्यात होतात. हे मृत्यू टाळण्यासाठी प्रत्येकाने वाहतूक नियमांचे पालन करण्याची गरज आहे. विशेषतः युवा वर्गाने यासाठी पुढाकार घ्यायला हवा, युवक-युवतींनी वाहतूक नियमांचे पालन करून इतरांनाही त्याबाबत जागरूक करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी केले. लातूर जिल्हा रस्ता सुरक्षा समिती, परिवहन विभाग व पोलीस विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्य रस्ता सुरक्षा अभियान २०२६ चे उद्घाटन जिल्हाधिकारी कार्यालय येथील नियोजन समिती सभागृहात जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांच्या हस्ते झाले. जिल्हा पोलिस अधीक्षक अमोल तांबे, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव व्यंकटेश गिरवलकर, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता बाबासाहेब थोरात, प्रादेशिक परिवहन अधिकारी विनोद चव्हाण, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. प्रदीप ढेले, अश्वजीत जानराव, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता देवेंद्र निळकंठ, आशिषकुमार अय्यर यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.



# भरधाव वेगात येणाऱ्या कारने घेतला तरुणीचा बळी

## लातूरच्या नाईक चौकातील दुर्दैवी घटना । संतप्त नातेवाईक-नागरिकांचा रस्ता रोको

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १ जानेवारी :** लातूर शहरातील वसंतराव नाईक चौकात दि. ३१ डिसेंबरच्या रात्री साडे अकरा वाजता भरधाव वेगात येणाऱ्या कारने एका दुचाकीला दिलेल्या भीषण धडकेत एका २४ वर्षीय तरुणीचा बळी गेल्याची घटना घडली. तरुणीच्या मृतदेहाची उत्तरीय तपासणी करण्यात आल्यानंतर मृतदेह घरी नेत असताना रुग्णवाहिका थांबवून संतप्त नातेवाईकांनी रस्ता रोको आंदोलन करून आरोपींच्या अटकेची मागणी केली. रास्ता रोको आंदोलनामुळे काही काळ या महामार्गावरील वाहतूक पूर्णतः ठप्प झाली होती.

लातूरच्या एलआयसी कॉलनी, इंद्रायणी नगरमध्ये राहणारी कु. प्रतिक्षा ताराचंद राठोड ही दि. ३१ डिसेंबर २०२५ रोजी रात्री साधारणतः साडे अकराच्या सुमारास आजारी असलेल्या आपल्या आईला रुग्णालयात डबा देऊन



दुचाकीवरून घरी परतत होती. त्यावेळी वसंतराव नाईक चौकात महात्मा बसवेश्र्वर चौकाकडून भरधाव वेगात येणाऱ्या स्विफ्ट कार क्रमांक एमएच ४३ एएफ १०५५ च्या चालकाने दुचाकीला जोराची धडक दिली.

ही धडक एवढी भीषण होती की, सदर तरुणी दुचाकीवरून फेकली जाऊन गंभीर जखमी होऊन मरण पावली. तिच्या सोबत असणारी कु. शिवानी अमोल जाधव वय ४ वर्ष ही जखमी झाली. सदर अपघात होताच घाबरलेल्या कार चालकाने कार अपघातस्थळी सोडून पळ काढला. कारमध्ये चालकांसह एकूण चार जण असल्याचे सांगण्यात आले. कारमध्ये दारूच्या बाटल्यांचे बॉक्स असल्याचे आढळून आले आहे.

या तरुणीच्या अपघाती निधनाचे वृत्त समजताच एलआयसी कॉलनी, इंद्रायणी नगर परिसरात एकच खळबळ उडाली. सदर तरुणी अतिशय मनमिळावू स्वभावाची असल्याने तिच्या दुर्दैवी मृत्यूबद्दल परिसरातील सर्वच नागरिकांनी हळहळ व्यक्त केली. तरुणीचा मृतदेह शव विच्छेदनानंतर आणला जात असताना गुरुवारी दुपारी नातेवाईकांनी नाईक चौकात जोरदार निदर्शने करून रास्ता रोको आंदोलन केले. त्यावेळी मोठ्या प्रमाणात नागरिकांच्या भावनांचा उद्रेक झाला. मात्र, विवेकानंद चौक पोलीस ठाण्याच्या पोलीस अधिकारी -कर्मचाऱ्यांनी परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. या रास्ता रोको आंदोलनात माजी उपमहापौर चंद्रकांत बिराजदार, विवेक साळुंके, राठोड यांच्यासह हजारो कार्यकर्त्यांनी सहभाग घेतला. यावेळी चंद्रकांत बिराजदार यांनी नाईक चौकात गतिरोधक निर्माण करण्याची मागणी मागच्या अनेक वर्षांपासून केली जात असून प्रशासन या मागणीकडे जाणीवपूर्वक डोळेझाक करत असल्याचा आरोप केला. नाईक चौकात नेहमीच अशा प्रकारचे छोटे मोठे अपघात घडत असून अनेक निष्पाप लोकांचे बळी जात आहेत.

कु. प्रतिक्षा राठोड हिच्या अपघाती मृत्यूने नाईक चौकातील गतिरोधक आणि सिग्नलचा विषय पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला आहे. या प्रकरणी विवेकानंद चौक पोलीस ठाण्यात करण गंगाराम राठोड यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक मुळे करत आहेत.



# रोटरी आधार रुग्णसेवा केंद्राला ऑक्सिजन कॉन्सन्ट्रेटर भेट

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १ जानेवारी :** लातूर शहरातील रुग्णांच्या विविध गरजा पुरविण्यासाठी रोटरी आधार रुग्ण सेवा केंद्राची निर्मिती नुकतीच करण्यात आली आहे. या केंद्राद्वारे रुग्ण, नातेवाईक आणि कुटुंबीयांना उपचारानंतरच्या आरोग्य विषयक वस्तू व साधने मोफत आणि अल्प दरामध्ये उपलब्ध करून दिल्या जातात. तसेच आरोग्य सेवा सुद्धा रुग्णांना पुरविण्यात येते. आधार रुग्ण सेवा केंद्रामध्ये सर्व पदाधिकारी हे रोटरी क्लबचे सर्व सदस्य आहेत. अशा या अत्यंत महत्त्वपूर्ण केंद्राला नुकतेच रो. विश्वनाथ स्वामी (सावळे) यांनी ऑक्सिजन कॉन्सन्ट्रेटर डोनेट केले आहे.

यावेळी कॉपच्या अध्यक्ष डॉ. मायाताई कुलकर्णी आणि सचिव तथा रोटरी क्लब ऑफ लातूर होरायझनचे अध्यक्ष रो. डॉ. गुणवंत बिरादार, रो. माधव पांडे आणि रो. विश्र्वनाथ स्वामी (सावळे) यांचे कुटुंबीय यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी रो. विश्वनाथ स्वामी (सावळे) यांनी रोटरी आधार रुग्णसेवा केंद्राला ऑक्सिजन कॉन्सन्ट्रेटरची भेट देऊन भविष्यातही आवश्यक असणाऱ्या बाबी डोनेट करण्याचे आश्वासन त्यांनी यावेळी दिले.

यावेळी डॉ. मायाताई कुलकर्णी यांनी आणि रो. डॉ. गुणवंत बिरादार यांनी रो. विश्वनाथ स्वामी (सावळे) यांचे अभिनंदन करून त्यांनी दिलेल्या डोनेशन बद्दल समाधान व्यक्त केले तसेच समाजातील दानशूर व्यक्तींनी या केंद्राला अर्थसाह्य करावे असे आवाहनही त्यांनी याप्रसंगी केले.

# लातूर शहरातील अनेक मुस्लीम बांधवाचा भाजपात प्रवेश



**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ३० डिसेंबर :** लातूरसह देशामध्ये पंतप्रधान मोदींनी मुस्लिम समाजाला विविध योजना लागू केल्याचे कार्य केले. हज, मक्का, मदिना आदी धार्मिक स्थळांना जाण्यासाठी लागणाऱ्या तिकीटावर लावलेला १८ टक्के जीएसटी रद्द करून ५ टक्क्यावर आणण्याचे कार्य केलेले आहे. मरशांना शासकीय ग्रँट दिले. कर्नाटक, काश्मीर व इतर मुस्लीम अभ्यासकांना पद्श्री अवार्ड देऊन त्यांचा सन्मान केला. त्यामुळे आम्ही भाजपामध्ये प्रवेश करीत आहोत. त्यामुळे लातूर महानगरपालिका प्रचंड मताधिक्याने विजयी होणार असल्याची प्रतिक्रियाही व्यापारी इम्रान बागवान व इरशाद बागवान यांनी यावेळी बोलताना व्यक्त केली.

सर्वांना समान न्याय देऊन देशात आणि राज्यामध्ये एकोपा ठेवण्याचे काम भारतीय जनता पार्टीने केलेले आहे. त्यामुळे भाजपा नेते, माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर, शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर व आदिती पाटील कव्हेकर, रंजित पाटील कव्हेकर, विश्वजीत पाटील कव्हेकर यांच्या कार्यावर विश्वास ठेवून पटेल नगर भागातील शेकडो कार्यकर्त्यांनी भाजपामध्ये जाहीर प्रवेश करण्यात आला. यावेळी पटेल नगर भागातील गणी बागवान, विश्वंभर घार, इम्रान बागवान, इरसाद बागवान, जुनीद बागवान, समीर बागवान, कैफ बागवान, मुन्ना बागवान यांच्यासह शेकडो पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## व्यंकटराव देशमुख महाविद्यालयात भाषा समन्वय मंडळाची स्थापना

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १ जानेवारी :** लातूरपासून जवळच असलेल्या बाभळगाव येथील दयानंद शिक्षण प्रसारक मंडळद्वारा संचलित कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालयात मराठी, हिंदी आणि इंग्रजी या तिन्ही भाषांचा समन्वय साधण्यासाठी भाषा समन्वय मंडळाची स्थापना केली आहे.

विद्यार्थ्यांमध्ये भाषिक कौशल्य, अभिव्यक्ती क्षमता व बहुभाषिक संवाद वाढविण्याच्या उद्देशाने सदर मंडळ कार्य्र करणार आहे. नव्यानेच स्थापन करण्यात आलेल्या या मंडळाच्या अध्यक्षपदी ऋषिकेश सुरवसे यांची तर सचिवपदी अपेक्षा मस्के यांची निवड करण्यात आली आहे. उपाध्यक्षपदी सना महेबूब शेख, सहसचिव सोनम सगर, प्रसिद्धी प्रमुख ऐश्वर्या भोसले, सदस्य पूजा सुनील सगरे, कविता कांबळे, यश कांबळे यांची निवड केली गेली आहे. कार्यकारिणीत विद्यार्थी प्रतिनिधी व इतर सदस्यांचीही निवड केली आहे. भाषा समन्वय मंडळाच्या माध्यमातून वक्तृत्व स्पर्धा, वाचन उपक्रम, निबंध लेखन, भाषांतर कार्यशाळा तसेच सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे.

भाषा समन्वय मंडळाच्या सर्व पदाधिकाऱ्यांचे प्राचार्य डॉ. दुश्यंत कटारे, भाषा समन्वय प्रभारी प्रा. डॉ. अजित भांजी, प्रा. डॉ. एम.एन. गायकवाड, प्रा.डॉ. नानाजाधव, प्रा. डॉ. इंद्रजित शिंदे आदींनी अभिनंदन केले आहे.

## 'कमला नेहरू'मध्ये गणित दिन साजरा

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १ जानेवारी :** लातूर तालुक्यातील बोरी येथील कमला नेहरू विद्यालयात जागतिक कीर्तीचे गणितज्ञ श्रीनिवास रामानुजन यांचा जयंती दिन गणित दिन म्हणून साजरा करण्यात आला.

या छोटेखानी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ए.जी. पटेल हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून आर. एस. शिंगडे, जी.जी. रातोळे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डी. व्ही. कराड यांनी केले. प्रास्ताविकात त्यांनी या उपक्रमाच्या आयोजनामागची भूमिका विशद केली. शेख अब्दुल, शिंगडे , रातोळे यांनीही गणिताचे महत्व विशद केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन बी.के. शिंदे यांनी तर आभार प्रदर्शन व्ही. आर. मोरे यांनी केले.

# 'गांजा तपासणी'च्या बहाण्याने रक्कम चोरणारा आरोपी गजाआड

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १ जानेवारी :** तब्बल २० वर्षांपूर्वी 'गांजा तपासणी'च्या बहाण्याने खिशातील रक्कम चोरणारा आरोपीला अखेर गजाआड करण्यास पोलीस पथकाला यश आले आहे. लातूर पोलिसांच्या विशेष पथकाची या उल्लेखनिय कामगिरीचे कौतुक होत आहे.

लातूर शहरातील गांधी चौक पोलीस ठाण्याच्या हद्दीत २० वर्षांपूर्वी हा गुन्हा घडला होता. या गुन्ह्यातील आरोपी नामे राजेंद्र ऊर्फ राजू निवृत्ती बनसोडे (वय ५४ वर्षे), रा. प्रकाशनगर, लातूर, सध्या रा. विकासनगर, लातूर हा गेल्या २० वर्षांपासून फरार होता. फिर्यादी सोमनाथ शामराव मुळे, रा. तेर, ता. जि. उस्मानाबाद हे दि. २५ फेब्रुवारी २००५ रोजी तेरणा इंजिनिअरिंग महाविद्यालयात बी.ई. (आयटी) फायनल इयरचे शिक्षण घेत असताना, मोटार खरेदीसाठी लागणाऱ्या सबमर्सिबल मोटारीचे साहित्य खरेदी करण्यासाठी लातूर येथे आले



होते. त्यांनी सोबत दहा हजार रुपये आणले होते. खरेदी केल्यानंतर उरलेली रक्कम व दुकानांच्या पावत्या त्यांनी पॅन्टच्या खिशात ठेवलेल्या होत्या.

रात्री अंदाजे आठ वाजण्याच्या सुमारास, मध्यवर्ती बसस्थानक, लातूर येथे एस.टी.डी. कॉईन बॉक्सवरून फोन करून बाजूला जात असताना, दोन अनोळखी इसम त्यांच्याजवळ आले व तुझ्या खिशात गांजा आहे, तपासणी करू दे असे सांगून, फिर्यादीच्या पॅन्टच्या खिशातील साडेचारशे रुपये व खरेदीच्या पावत्या जबरदस्तीने काढून घेतल्या.

फिर्यादीने आरडाओरड करताच बसस्थानकावरील पोलिसांनी तत्काळ हस्तक्षेप करून एका आरोपीस पकडले व त्याच्याकडून साडेचारशे रुपये व पावत्या जप्त केल्या. त्यावरून पोलीस स्टेशन गांधी चौक येथे गुन्हा दाखल करण्यात आला.

अपर पोलीस अधीक्षक यांच्या विशेष पथकास गोपनीय माहिती प्राप्त झाली की, सदर आरोपी सध्या विकासनगर, लातूर येथे वास्तव्य करत आहे. ही माहिती तात्काळ वरिष्ठ अधिकाऱ्यांना कळविण्यात आली. त्यानंतर विशेष पथकाने नियोजनपूर्वक

### लातूर पोलिसांच्या विशेष पथकाची उल्लेखनिय कामगिरी

कारवाई करत, आरोपी राजेंद्र ऊर्फ राजू निवृत्ती बनसोडे यास त्याच्या राहत्या घरातून ताब्यात घेतले.

ही संपूर्ण कारवाई पोलीस अधीक्षक अमोल तांबे, अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी, लातूर शहर समीरसिंह साळवे यांच्या मार्गदर्शनाखाली लातूर पोलिसांच्या विशेष पथकातील सपोनि शिवशंकर मनाळे, पोलीस उपनिरीक्षक संजय भोसले, पोलीस अमलदार दत्तात्रय शिंदे, योगेश गायकवाड, श्रीकांत कुंभार यांनी सदर उल्लेखनीय कामगिरी बजावली.

# लातुरात दृष्टी दिव्यांग व्यक्तींसाठी ब्रेल महोत्सवाचे आयोजन

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १ जानेवारी :** बियांड़ व्हिजन फाउंडेशन, रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३२, नॅशनल असोसिएशन फॉर दि ब्लाइंड, लातूर शाखा, अंधजन विकास मंडळ, लातूर यांच्यावतीने दि. ०४ जानेवारी विश्र्व ब्रेल दिनाचे औचित्य साधून दि. २ ते ४ जानेवारी २०२६ या कालावधीमध्ये बालाजी मंदिर, मंगल कार्यालय, पाप विनाश रोड, लातूर येथे दृष्टी दिव्यांगांच्या कलागुणांना वाव मिळावा आणि त्यांना प्रोत्साहन मिळावे यासाठी ब्रेल महोत्सव २०२६चे आयोजन करण्यात आले आहे.

या महोत्सवात राज्यातील विविध जिल्ह्यातून दोनशेहून अधिक दृष्टी दिव्यांग व्यक्ती सहभागी होणार आहेत. या महोत्सवात दि. ०२ जानेवारी २०२६ रोजी राज्यस्तरीय ऑनलाईन ब्रेल वाचन स्पर्धेचे आयोजन केले आहे.

दि. ३ जानेवारी २०२६ रोजी कनिष्ठ व वरिष्ठ अशा दोन गटात राज्यस्तरीय सुगम संगीत स्पर्धेचे आयोजन केले आहे. या स्पर्धेचा उद्घाटन समारंभ स. १० वाजता श्रीमती तृप्तीताई अंधारे, शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद लातूर, डॉ. विजयभाऊ राठी, अध्यक्ष, नॅशनल असोसिएशन फॉर दि ब्लाइंड, लातूर शाखा तथा माजी प्रांतपाल रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३२, डॉ. संजय गवई, प्रोफेसर, समाजकार्य विभाग, महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न होणार आहे.

## प्रा. अर्चना शिंदे यांना पीएच.डी. प्रदान

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ३० डिसेंबर :** येथील दयानंद कनिष्ठ वाणिज्य महाविद्यालयातील इंग्रजी विषयाच्या प्रा. अर्चना शिंदे - गुंजाळ यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने इंग्रजी विषयातील पीएच.डी. पदवी प्रदान केली आहे.

प्रा. डॉ. शिंदे यांनी अत्यंत सखोल, सूक्ष्म अभ्यास करून प्रा. डॉ. अनिल कट्टे यांच्या मार्गदर्शनाखाली 'वुमन सबज्युगेशन अँड अमॅन्सिपेशन इन द सिलेक्ट वर्क ऑफ बुची इमेचेटा : अ स्टडी' या विषयावर शोध प्रबंध सादर केला होता.

पीएच.डी. प्रदान करण्यात आल्याबद्दल अणे मार्गदर्शक डॉ. अनिल कट्टे, डॉ. पांडुरंग शितोळे, डॉ. मुस्तजीब खान, डॉ. रमेश चौगुले, डॉ. समाधान पवार, प्राचार्य बाबासाहेब गुंजाळ,सतीश पवार, रणधीर निंबाळकर यासह अनेकांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

# भादा जि.प. कन्या शाळेसह विविध कामांना मंजुरी

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ३० डिसेंबर :** लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील मौजे भादा येथील जिल्हा परिषद कन्या शाळेच्या दुमजली नवीन वर्ग खोल्या बांधकामास ९० लाखाचा निधी मंजूर केल्याबद्दल तसेच गावांतर्गत विविध कामे मंजूर केल्याबद्दल भाजपाचे नेते लातूर ग्रामीणचे आ. रमेशआप्पा कराड यांचा यथोचित सत्कार करून भादा येथील ग्रामस्थांनी आभार व्यक्त केले.

लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील वर्षानुवर्ष विकास कामापासून कोसो दूर असलेल्या औसा तालुक्यातील




मौजे भादा येथील रस्त्यांच्या विविध कामाबरोबरच शासनाच्या विविध योजनेतून गावांतर्गत अनेक विकास कामे मोठ्या प्रमाणात भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या माध्यमातून झाली. या सर्व कामांना लाखो नव्हे तर कोट्यावधी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला आणि भादा गावच्या विकासाला गती दिली.

परवाच जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाच्या माध्यमातून मौजे भादा येथील जिल्हा परिषद कन्या प्रशाला या शाळेच्या जुन्या वर्ग खोल्या पाडून त्याच जागेवर दोन मजली नवीन सहा वर्ग खोल्या

### भादा ग्रामस्थांच्या वतीने आ. कराडांचे आभार व्यक्त

बांधणे, ग्रंथालय, प्रयोगशाळा, स्वच्छतागृह, विद्युतीकरण यासह इतर नव्याने बांधकाम करण्यात यावे यासाठी ९० लक्ष रुपयाचा निधी मंजूर केल्याबद्दल आ. रमेशआप्पा कराड यांचा भादा ग्रामस्थांच्या वतीने यथोचित सत्कार करून आभार व्यक्त केले आहे.

लातूर येथील भाजपाच्या संवाद कार्यालयात झालेल्या या कार्यक्रमास भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष नवनाथ भोसले, प्रदेश भाजपाचे भागवत सोट, पद्माकर चिंचोलकर, मंडलाध्यक्ष उद्धव काळे, बालाजी शिंदे, रेवण पाटील, योगेश लटूरे, दीपक शिवलकर, प्रेम लटुरे यांच्यासह अनेकांची प्रमुख उपस्थिती होती. आ. कराड यांनी यावेळी उपस्थित भादा ग्रामस्था समवेत गावातील आणि परिसरातील विविध विकास कामाच्या अनुषंगाने चर्चा केली.



# ऋषिकेश कराडांकडून शिंदे परिवाराचे सांत्वन

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ३० डिसेंबर :** लातूर तालुक्यातील मौजे बोकनगाव येथील हभप निवृत्ती महाराज शिंदे यांचे हृदयविकाराच्या झटक्याने नागेश दादाराव शिंदे यांचे नुकतेच दुःखद निधन झाले. सदरील निधनाचे वृत्त समजल्याने भारतीय जनता युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष ऋषिकेश रमेशआप्पा कराड यांनी बोकनगाव येथे जाऊन दोन्ही शिंदे कुटुंबीयांची भेट घेऊन सांत्वन केले.

भाजपाचे युवा नेते ऋषिकेश कराड यांनी लातूर तालुक्यातील मौजे बोकनगाव येथे मंगळवारी शिंदे कुटुंबीयांची भेट घेतली. याप्रसंगी शिंदे कुटुंबियातील स्व. निवृत्ती महाराज यांचे चिरंजीव इंद्रजीत शिंदे, भाऊ गिरीधर शिंदे, भागवत शिंदे, माऊली शिंदे तसेच स्व. नागेश शिंदे यांच्या परिवारातील पांडुरंग शिंदे, मुलगा दिनेश शिंदे, बचीरदादा शिंदे इतर अनेक जण होते. यावेळी ऋषिकेश कराड यांच्या समवेत भाजपाचे मंडळ अध्यक्ष प्रताप पाटील, पांडुरंग बालवाड, महादेव साळुंके, संजय ठाकूर, हनुमंत गव्हाणे, संजय सावंत व इतर अनेकजण होते. याप्रसंगी बोकनगाव येथील सरपंच दयानंद स्वामी, चेअरमन अजयकुमार शिंदे, भाजपाचे आत्माराम शिंदे, गंगाधर शिंदे, भालचंद्र दाताळ व इतर अनेक जण होते.